
महाराष्ट्राचे

# शिल्पकार
# पठ्ठे बापूराव



RAJA BADSAL

प्रा. चंद्रकुमार नलगे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

35 A

महाराष्ट्राचे शिल्पकार

# लोकशाहीर पठ्ठे बापूराव

चंद्रकुमार नलगे

महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : ऑगस्ट २००३
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. १७

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : ४५ रु.

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्रातील शिल्पकार" या योजनेअंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील "लोकशाहीर पठ्ठे बापूराव" हा सतरावा ग्रंथ आहे.

मंडळाच्या या चरित्रग्रंथमालेअंतर्गत "पठ्ठे बापूराव" यांचं चरित्र लिहिणं तितकसं सोपं नव्हतं. पठ्ठे बापूराव यांचं सलग चरित्र अद्यापही लिहिलं गेलेलं नाही. चरित्रलेखनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री सहजासहजी उपलब्ध होणं शक्य नाही. महत्प्रयासानं ही साधनसामग्री जमा करावी लागणार होती. ही साधनसामग्री आपण किती कष्टाने व नेटाने मिळविली याची माहिती स्वतः लेखकाने आपल्या मनोगतात सांगितलेली आहे. या चरित्रग्रंथाच्या लेखनासाठी प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी घेतलेले कष्ट खरोखरच वाखाणण्यासारखे आहेत.

प्रा. चंद्रकुमार नलगे यांना पठ्ठे बापूरावांविषयी आत्यंतिक जिव्हाळा व प्रेम आहे. चरित्र लेखनासाठी त्यांनी कथनात्मक पद्धतीचा अवलंब केलेला आहे. त्यामुळे हा चरित्रग्रंथ वाचनीय, रसाळ झाला आहे..

"महाराष्ट्रात एकीकडे राजकीय क्षेत्रात लोकमान्य टिळक गाजत होते. दुसरीकडे राजमान्य बालगंधर्व सगळ्यांच्या गळ्यातील ताईत बनले होते. नाट्यक्षेत्रात राम गणेश गडकरी आपल्या नाटकांनी मराठी रंगभूमीला अलौकिक लौकिक मिळवून देत होते. त्याच काळात तमाशा लोककलेचा राजा लोकशाहीर शीघ्रकवी पठ्ठे बापूराव मराठी मनावर अधिराज्य गाजवत होते." असे प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाने या ग्रंथात सार्थ शब्दात नमूद केले आहे. राम गणेश गडकरी तसेच बालगंधर्व या कला क्षेत्रातील दोन महनीय व्यक्तींवर भरभरून लिहिले गेलेले आहे. अर्थात तेवढं वाङ्मयीन कर्तृत्व या दोनही कलावंतांचं होतं, यात वाद नाही. पण तसं पठ्ठे बापूरावांच्या बाबतीत का घडलेलं नाही, हा खरा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या उत्तरात विदारक सत्यं दडलेली आहेत.

एकदा लिहिलेली लावणी पुन्हा लिहायची नाही; लावणी लिहिण्यासाठी एकदा कागदावर लेखणी टेकविली की ती लावणी लिहून झाल्याशिवाय कागदावरची लेखणी उचलायची नाही; शिळ्या पैशाचं तोंड बघायचं नाही, असा पठ्ठे बापूराव यांचा पण होता; असं बापूरावांच्या संबंधात बोललं जातं. या चरित्रग्रंथातही तसा निर्देश आलेला आहे.

कलानिर्मिती ही उर्मी व वृत्ती यांच्याशी निगडीत असते. त्यामुळे एकटाकी लावणी लिहिणे अथवा लावणी लिहून झाल्यानंतर तिच्यात दुरुस्ती अथवा फेरबदल न करणे आपण समजू शकतो. पण शिळ्या पैशाचं तोंड बघायचं नाही, ही गुर्मी कलावंत कितीही मोठा असला तरी त्याला असू नये. नसता काय होतं याचं प्रत्यक्ष उदाहरण स्वत:च पठ्ठे बापूराव आहेत. पठ्ठे बापूराव यांना आपल्या आयुष्यातले अखेरचे दिवस केवळ हालअपेष्टातच नाही तर ताई परिंचेकर या मजूर स्त्रीच्या घासातल्या अर्ध्या घासावर व्यतीत करावे लागले आहेत.

काळ कोणताही असो, त्या काळात जन्मलेला कलावंत कितीही मोठा असो, रसिकांनी त्याला जे दिलेलं असतं ते उधळण्यासाठी दिलेलं नसतं. पण याचं भान न ठेवता ते कलावंतानं उधळून दिलं व त्यामुळे तो 'उघडा' पडला तर त्याचं फारसं दु:ख त्याच्या रसिकांनी मानू नये. पुढच्याला ठेच लागली तर निदान मागचा तरी शहाणा होईल!

मुंबई
दिनांक : १८ ऑगस्ट २००३

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# मनोगत

ज्या काळात रंजन आणि प्रबोधन लोककलाच करत, त्या काळी लोकसंस्कृती आणि लोकजीवनाला उत्साहवर्धित प्रेरणा देण्याचे आत्यंतिक महत्त्वाचे कार्य तमाशा या मराठमोळ्या लोककलेने केले आहे. खेड्यापाड्यांतील वर्षभराच्या शिणलेल्या, मरगळलेल्या लोकजीवनाला एक नवे चैतन्य लाभे. या लोककलाकारांनी, लोकशाहिरांनी सामाजिक स्तरावर सांस्कृतिक जडणघडण केली आहे. पेशवेकालीन शाहिरांच्यानंतर तमाशा कला मंदावली होती; पण पठ्ठे बापूरावांसारखा शीघ्रकवी या कलेची व्रत म्हणून सेवा करायला लागल्यानंतर त्यांच्या तमाशांनी अवघ्या महाराष्ट्राला वेडे केले. त्यांनी तमाशा कला कळसाला नेऊन पोचवली. त्या कलेला नवा प्राण दिला. तमाशा कला ही त्यांच्या जीवनाचा श्वास बनली होती. त्यांनी लोकरंजनाबरोबर लोकप्रबोधन करण्याचे ध्येय निश्चित केले होते. त्यासाठी त्यांनी घरादारावर तुळशीपत्र ठेवले. संसार मोडला. उच्चवर्णीय असूनही समाजाची पर्वा बाळगली नाही. गावाने बहिष्कृत केले तरी पठ्ठे बापूरावांनी हाती घेतलेला लोकजागराचा डफ खाली ठेवला नाही. त्यांच्या लेखणीने आणि वाणीने तमाशा कलेला बहर आला. एकदा म्हटलेली लावणी उद्या म्हणायची नाही, लावणी लिहिण्यासाठी एकदा कागदावर लेखणी ठेवली, की लावणी संपल्याशिवाय उचलायची नाही, शिळ्या पैशाचे तोंड पाहायचे नाही अशा या लोकविलक्षण शाहिराच्या लोकविलक्षण प्रतिज्ञा होत्या. संपूर्ण आयुष्यच त्यांनी तमाशा कलेला वाहिले होते. त्यांनी दोन लाखांहून जास्त लावण्या लिहिल्या ही घटनाही जगावेगळी होती.

आजही पठ्ठे बापूरावांच्या गण, गौळणी आणि लावण्यांशिवाय तमाशाची भैरवी होत नाही. एवढी कीर्ती, यश, अमाप पैसा मिळूनही त्यांचे अखेरचे दिवस दु:स्थितीत गेले.

त्यांनी दोन लाख चाळीस हजार लावण्या लिहिल्या असे म्हटले जाते. पण त्यांतील फार थोड्याच सध्या उपलब्ध आहेत. पठ्ठे बापूरावांना अखेरच्या

काळात बापूसाहेब जिंतीकर भेटले. त्यांनी पठ्ठे बापूरावांना आधार दिला. त्यांच्या लावण्यांचे पाच संग्रह प्रकाशित केले. त्यांनी वगनाट्याचेही एक पुस्तक प्रकाशित केले. पठ्ठे बापूरावांचे चरित्रही सलग असे उपलब्ध नाही. बापूसाहेब जिंतीकरांनी स्फूट स्वरूपात आठवणी नोंदविल्या आहेत. ज्या पठ्ठे बापूरावांनी मराठी संस्कृतीचे एक अनगड असे भूषण असलेल्या तमाशा या लोककलेला वैभवाच्या शिखरावर नेले, मराठी मनात अवीट अशी गोडी निर्माण केली, लोकरंजनाबरोबरच लोकप्रबोधन केले, तमाशा कलेला एक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, अशा या थोर कलंदर कलावंताचे सलग चरित्र मात्र उपलब्ध नाही. म्हणूनच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेतून पठ्ठे बापूरावांचे जीवनचरित्र लोकांसमोर यावे असे ठरविले व त्याच्या लेखनाची जबाबदारी माझ्यावर सोपवली.

माझा जन्म १९३५ चा आणि पठ्ठे बापूरावांनी १९३६ साली आपल्या तमाशाचा शेवटचा खेळ केला आणि डफ खाली ठेवला. एक जितंजागतं पर्व संपलं. माझ्या वयाच्या दहाव्या वर्षी म्हणजे १९४५ साली त्यांनी या जगाचा निरोप घेतला. माझ्या लहानपणापासूनच पठ्ठे बापूरावांचे नाव माझ्या कानावर होते. अवतीभवतीच्या सर्व गावांच्या जत्रांतून होणाऱ्या तमाशांतून पठ्ठे बापूरावांच्या गण, गौळणी, लावण्या ऐकत आलो होतो. तेव्हापासून पठ्ठे बापूरावांच्याविषयी माझ्या मनात अत्यंत कुतूहल होते. 'ते आपल्याच भागातील आहेत. ब्राह्मण असून तमाशगीर बनले... पवळा या तमाशा कलावंतिणीबरोबर सगळे आयुष्य घालविले... तमाशा पहावा तर पठ्ठे बापूरावांचा... आपल्या कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी त्यांचा सोन्याचं कडं घालून गौरव केला..., अशा गोष्टी लोकही मोठ्या अभिमानाने सांगत. अशा कानावर पडलेल्या वदंतांनी माझ्या बालवयातच माझ्या बालमनात एक अद्‌भुत पेरून ठेवले होते. पठ्ठे बापूरावांच्या अनेक लावण्या मी ऐकल्या होत्या. त्यांच्या चरित्राबद्दल जिज्ञासा होती. माझ्याप्रमाणेच मराठी मनाला त्यांच्याविषयी कौतुक होते, पण त्यांच्या लौकिक जीवनाबद्दल फारशी माहिती नव्हती. बापूसाहेब जिंतीकरांनी प्रकाशित केलेली पुस्तके उपलब्ध नव्हती. इतर साधनसामग्री तर फारच दुर्मिळ. त्यामुळे पठ्ठे बापूरावांचे चरित्र लिहिण्यात अनंत अडचणी होत्या.

पठ्ठे बापूरावांचे नाव परिचित होते. त्यांचे गाव रेठरे हरणाक्ष. आमच्याच मुलखातील. शिवाय माझे साहित्यिक मित्र प्रसिद्ध कादंबरीकार प्रा. देवदत्त पाटील यांनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने आणि 'जागर कला साहित्य मंडळा'च्या वतीने पठ्ठे बापूरावांची पुण्यतिथी साजरी करण्याचे महाराष्ट्रात

प्रथमच धाडस केले होते. ते इस्लामपूर येथे मोठ्या प्रमाणात दरवर्षी पुण्यतिथी साजरी करीत. मीही या समारंभाला हजर राहत असे. त्यानिमित्त लोककलाकारांच्या लोककलांचा आविष्कार मेळावाच भरत असे. प्रा. देवदत्त पाटील यांना पठ्ठे बापूरावांच्या जीवनावर कादंबरी लिहावयाची होती. पण साधनसामग्री उपलब्ध नसल्याने ते लेखनही राहून गेले होते. माझ्यावर चरित्र-लेखनाची जबाबदारी पडल्यावर प्रा. देवदत्त पाटील आणि लोककलांवर प्रेम करणारे श्री. पंढरीनाथ शेवाळे व मी ठरविले की, पठ्ठे बापूरावांच्या जीवन-चरित्राचा धांडोळा घ्यायचाच. त्यासाठी आम्ही सिद्ध झालो आणि आमची शोधयात्रा सुरू झाली.

पठ्ठे बापूराव यांचा वावर जिथे जिथे झाला, तिथे तिथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी करायची असे ठरवून बाहेर पडलो. प्रथम जिने पठ्ठे बापूराव यांना अनेक संघर्षांना सामोरे जावे लागले त्यावेळी धीर दिला, पवळा सोडून गेल्यावर खचलेल्या पठ्ठे बापूरावांना सावरले, त्यांच्या अखेरच्या एकाकी, दारिद्र्यावस्थेतील काळात जपणूक केली, त्या ताई परिंचेकर या तमाशा कलावंतिणीच्या गावी गेलो. परींचे हा तो गाव. पडत्या काळात दैवदुर्विलास वाट्याला आल्यावर ताईंच्या या गावी पठ्ठे बापूराव येऊन राहिले. जिथे त्यांनी झोपडी मारली होती, ती जागा पाहिली. तिथे आता रानझाडांचे उकिरडे वाढले आहेत. त्या गावातील अत्यंत वयस्क लोकांच्या मुलाखती घेतल्या. नवरात्रात तमाशाची हजेरी लावायला आलेल्या जुन्या तमासगिरांची आणि नव्या पिढीतील नृत्यगायिकांची भेट घेतली. येथे काही आठवणी मिळाल्या.

पठ्ठे बापूरावांच्या प्रतिभेवर आणि शाहिरीवर भाळलेल्या, मराठी तमाशा क्षेत्राला प्रथमच स्त्री कलावंत म्हणून लाभलेल्या सौंदर्यवती नामचंद पवळाच्या नगर जिल्ह्यातील हिवरगाव या संगमनेरजवळील जन्मगावी गेलो. जिथे या लावण्यवतीचा जन्म झाला होता, ते घर पाहिले. जीर्ण झालेले. पडलेल्या भिंतीची ती उदासवाणी जागा पाहून अंतःकरण गहिंवरून गेले. त्या जागेचे फोटो घेतले. तिथे पवळाच्या नामदेव या भावाच्या नातसुना भेटल्या. सीताबाई आणि अलका. त्यांनीही लाखात एक अशा रूपवती पवळाच्या ऐकिवातील गोष्टी सांगितल्या. पवळाच्या नाजूक गुलाबी पायांना घुंगरांचा छंद लागला तो इथेच. याच गावात. पण नृत्याचे आणि गायनाचे खरे धडे तिने घेतले ते वाघापूर येथे.

वाघापूर हे संगमनेरपासून ८-१० किलोमीटरच्या अंतरावर प्रवरा नदीच्या

काठावर वसलेले छोटेसे गाव. पवळाच्या बहिणीचे गाव. पवळा बारा-तेरा वर्षांची असताना नृत्य आणि गायन शिकण्यासाठी इथे आली. प्रसिद्ध शाहीर हरीबाबा घोलप आणि राणुजी रोहोम यांच्या हाताखाली ती नाचगाणे शिकली. हरीबाबाच्या तमाशात उभी राहिली. हरीबाबाच्या पैलवान भावाच्या (माधवरावांच्या) प्रेमात पडली. मराठी तमाशाला नृत्याप्सरा मिळाली. तिथे तिने नृत्यगाण्याचे पहिले धडे घेतले ते ठिकाण पाहिले. तेही माधवराव - हरीबाबाचे घर अवकळा पांघरून ढासळत चालले होते. त्या जीर्ण घराला छातीइतक्या उगवलेल्या गवताडाने वेढा दिला होता. भिंतीचा एक एक चिरा निखळून टाकण्याचा क्रूर उद्योग काळाने केला होता. इथेच बाजूला माधवरावांच्या साठ वर्षांची चंद्रभागा आणि दुसरी सत्तर वर्षांची अनसूया या सुना भेटल्या. त्यांनी एका जुनाट पेटीतून काही कागद काढून पुढे ठेवले. शाहीर बाबूराव घोलप यांची काही छापून आलेली कात्रणे होती ती पाहिली. वाचली. काही उतरून घेतली.

भंडारदरा आणि अनंत फंदी या पेशवेकालीन शाहिराचे संगमनेर पाहून परतीच्या वाटेवर राष्ट्रपती पारितोषिकविजेती विठाबाई भाऊ नारायणगावकर यांची भेट घेतली. या घराण्याचे मूळ गुरू पठ्ठे बापूरावच. विठाबाईंनी काही आठवणी सांगितल्या. पठ्ठे बापूरावांच्या लावण्या म्हणून दाखविल्या.

पठ्ठे बापूराव पुण्याला असताना जिथे राहात होते तो भाग डोळ्याखालून घातला. ज्या बापूसाहेब जिंतीकर यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले होते, पठ्ठे बापूरावांच्या लावण्या स्वत: उतरून घेऊन पाच पुस्तके प्रकाशित केली होती, त्यांच्या रविवार पेठेतील फडके हौदाजवळील घरी गेलो. तेथे बापूसाहेब जिंतीकरांच्या थोरल्या चिरंजिवांची भेट झाली. त्यांनी आस्थेने चौकशी केली. पण त्यांच्याकडे काहीच मिळाले नाही. ते पिंपरी-चिंचवडच्या नगरपालिकेकडे पठ्ठे बापूरावांचे सर्व साहित्य दिले गेले असल्याचे बोलले. पठ्ठे बापूरावांची माहिती, काही आठवणी तोंडीरूपाने मिळाल्या. पण प्रत्यक्ष छापील पुस्तके व इतर हस्तालिखिते मिळविण्याचे काम अवघड झाले. माझे एक साहित्यिक मित्र प्रा.डॉ.आनंद घाटुगडे पिंपरी-चिंचवडला होते. त्यांना पठ्ठे बापूरावांच्या कागदपत्रांविषयी कळविले. त्यांनी नगरपालिकेकडे चौकशी केली. तेथे कळले की, पठ्ठे बापूरावांचे चाहते आणि रसिक खासदार श्रीनिवास पाटील यांनी ते दप्तर आपल्याकडे नेले आहे. खासदार श्रीनिवास पाटील यांनी पठ्ठेबापूरावांचे साहित्य नगरपालिकेकडून हरवेल, त्याची योग्य ती काळजी न घेण्याची शक्यता आहे म्हणून मौलिक साहित्याची जपणूक व्हावी यासाठी ते आपल्याकडे नेले आहे.

खासदार श्रीनिवास पाटील दिल्लीला होते. आम्ही त्यांच्या कराड येथील घरी गेलो. खासदारसाहेबांच्या पत्नी सौ. रजनीताई पाटील घरी होत्या. त्यांना आम्ही विनंती केली. त्यांनी दिल्लीला फोन लावला आणि खासदारसाहेबांनी आमची निकड समजून घेऊन साहित्य देण्यास परवानगी दिली. एका भल्या मोठ्या ट्रंकेत पठ्ठे बापूरावांचे साहित्य कुलूपबंद अवस्थेत होते. सौ. रजनीताईंना किल्ली सापडली नाही. त्यांनी सरळ सरळ कुलूप तोडले आणि पठ्ठे बापूरावांचा अमोल ठेवा आम्हाला मिळाला. साऱ्या कागदपत्रांचे झेरॉक्स करून घेतले आणि मोठ्या समाधानाने आम्ही कामाला लागलो.

पठ्ठे बापूरावांचे दत्तकपुत्र गोविंद श्रीधर कुलकर्णी कराडला राहतात. त्यांची भेट घेतली. मारुती पाटील-कवठेकर यांचा शोध घेतला. त्यांच्या मसूर कवठ्याला जाऊन 'पवळाचा कट्टा' पाहिला. पठ्ठे बापूराव यांना गावाने बहिष्कृत केल्यावर ज्या मोरे घराण्याने आपल्या मळ्यातील घरात बापूरावांना आश्रय दिला होता, त्या घराण्यातील शामराव मनोहर मोरे यांची सविस्तर मुलाखत घेतली. पठ्ठे बापूरावांच्या हरणाक्ष रेठरे येथे जाऊन तिथल्या परिसराची पाहणी केली. पडक्या अवस्थेतील, नुसताच दगडी दरवाजा साक्ष म्हणून काळाशी टक्कर देत उभा असलेला पाहिला. त्यांचे चुलत बंधू वासुदेव कुलकर्णी, त्यांची मुले नीलकंठ व सदानंद यांनी आठवणी सांगितल्या. 'लावण्या विकून, आपला वाडा बांधायचा' असा बापूरावांचा निर्धार होता. पण तीनदा प्रयत्न करूनही ते त्यांना शक्य झाले नाही. शेवटी वाड्याची माती झाली. तीही अशीच वाऱ्यावर गेली. आणलेली लाकडे गावच्या मारुती मंदिरासाठी गावकऱ्यांनी वापरली. बापूरावांचे चुलत भावांवर प्रेम होते. त्यांचा देहपिंड चांगला व्हावा म्हणून मुंबईहून खोबऱ्या खारकांच्या गोण्या पाठवून देत. शंभराच्या नोटेत गांजा घालून ती ओढणारे पठ्ठे बापूराव. त्याच्या जीवनाची नशा जगावेगळी होती.

मराठी मनाला वेड लावणारी अस्सल मराठी तमाशा कला या गावात जन्मलेल्या तालेवाराने मराठी मातीत वैभवाला नेली. त्या कलंदर लोकशाहिराच्या अनेक गुणवैशिष्ट्यांची माहितीही सांगितली. बापूरावांच्या अखेरच्या काळातील संबंधित अशी पुण्यातील अनेक ठिकाणे समजून घेतली. लकडीपूल स्मशानभूमी, येरवडा परिसर, आर्यभूषण थिएटर, जंगली महाराज मंदिर येथेही गेलो. मुंबईच्या कामाठीपुऱ्यातील पडत्याझडत्या चाळी पाहिल्या. तिथेच नाथा गोविंदा जाधव हे पठ्ठे बापूरावांचे चाहते भेटले. पठ्ठे बापूरावांच्या काळात ते चहा देण्याचे पोऱ्याचे काम करायचे. मध्यरात्री तमाशा सुटला

की त्या कलाकरांना मोफत चहा द्यायचे. त्यांनी तमाशा जीवन फार जवळून पाहिले होते. त्यांच्याजवळ पठ्ठे बापूरावांची त्यांनी जपून ठेवलेली दोन पुस्तके मिळाली. त्यांनी ती आनंदाने दिली.

याशिवाय तमाशावरील श्री. प्रकाश खांडगे, उत्तम कांबळे, प्रा. भिकाजी दहातोंडे, शाहीर बाबूराव घोलप, प्रा. शिवाजीराव चव्हाण यांचे लेख वाचायला मिळाले. आचार्य अत्रे, न. चिं. केळकर, न्यायमूर्ती विनोद, नामदेव व्हटकर, ग.ल. ठोकळ, राजाभाऊ थिटे, लोककवी मनमोहन नातू, आबासाहेब मुजुमदार, डी. डी. रेगे, रा. शं. वाळिंबे, दत्तो वामन पोतदार, लहरी हैदर, काकासाहेब गाडगीळ यांचे जिंतीकर यांनी घेतलेले अभिप्रायही उपयोगी पडले.

'जी. जी. धर्माधिकारी आणि मंडळी' पुणे यांनी सन १९३०साली प्रसिद्ध केलेले पठ्ठे बापूरावांच्या लावण्यांचे पुस्तक मात्र प्रयत्न करूनही मिळाले नाही. मराठी तमाशातील पहिली स्त्रीनृत्तिका आणि गायिका पवळा हिचा मूळ फोटोही उपलब्ध नाही. सध्या उपलब्ध असलेले चित्रही काल्पनिक आहे असे जिंतीकर यांचे मत आहे. पठ्ठे बापूरावही फोटो काढण्याच्या विशेष मताचे नव्हते. जिंतीकर यांनी सत्काराचे वेळी त्यांचा फोटो काढून घेतला होता.

पठ्ठे बापूरावांचे सलग चरित्र उपलब्ध नाही. पण माझ्या परीने पुरावे मिळतील तेवढे प्रयासाने मिळवून हे छोटेसे सलग चरित्र उभे केले आहे. पठ्ठे बापूरावांच्या जीवनचरित्राचा शोध कसा घेतला, त्यासंबंधीची 'पठ्ठे बापूरावांच्या शोधात' ही नऊ लेखांची मालिका दै. पुढारीच्या रविवार पुरवणीतून लिहिली. रसिकांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला. सदरचे चरित्रही आवडेल अशी आशा आहे. या माझ्या लेखनासाठी जिंतीकर बंधू, नामदार रामकृष्ण मोरे, खासदार श्रीनिवास पाटील, सौ. रजनीताई पाटील, संपादक दै. पुढारी, संपादक दै. महासत्ता, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. रं. बोराडे व मंडळाचे सर्व सदस्य, प्रा. फ. मुं. शिंदे, रामदास फुटाणे, पंढरीनाथ शेवाळे, जागर साहित्य कला मंडळ, इस्लामपूरचे सर्व सदस्य, प्रा. डॉ. आनंद घाटुगडे, विठा भाऊ नारायणगावकर, राजमती देवदत्त पाटील, इत्यादींचे साहाय्य लाभले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

— चंद्रकुमार नलगे

## पठ्ठे बापूराव यांची जीवन-चरित्रपर लावणी

श्रेष्ठ वर्ण मी ब्राह्मण असूनि सोवळे । ठेवले घालूनि घडी ।
मशाल धरली हाती तमाशाची । लाज लावली देशोधडी ॥१॥

पंतप्रतिनिधी धनी सरकार ते गादीवरती न्याय निवडी ।
त्यांच्या आसरी वास मिळाला दैवबळाने बसली घडी ॥२॥

दर्शन झाले महापुरुषाचे सहस्त्र वेळा लक्षघडी ।
पुनीत केले त्या भवानीनें बुद्धी सुचविली कवित्व जडी ॥३॥

जडता जडता दिला अक्षय वर । नित्य लेखणी राहील खडी ।
वाचा होईल सिद्ध रोकडी रंगून वाणी देईल प्रौढी ॥४॥

महत्त्वाकांक्षा मनात एवढी, ठेवुनी बाजूला हजार नडी ।
आपण तरोनी कैक तरावे, भववंधाच्या पैलथडी ॥५॥

असे म्हणूनी घोडा सजविला, पैज लावली चढाओढी ।
चाळीस दिवस केले उपोषण, भूक लागेना रतीएवढी ॥६॥

मंडळ भरता सोडले पारायण, वाराणशीमध्ये गंगाथडी ।
दोन लक्ष आम्ही केली लावणी, केवढी म्हणावी मात बडी ॥७॥

चैन भोगली घडोघडी, पण संसार झाला पडापडी ।
लग्न लावले कुटुंब केले, कळत असोनि टाकली उडी ॥८॥

पायात बेडी बळे अडकवली, येऊन बसल्या बारा नडी ।
दिल्या झुगारुनी सगळ्या एकीकडे त्यामुळे रुसले खेळगडी ॥९॥

हिरा हिराकणी होती जवळी, एक विकली बाजारी तातडी ।
ऋण देउनी महारीण आणली, चक्रवाढीची पतपेढी ॥१०॥

फलगु तीरावरी दिली दाढीडुई विष्णुपदावर सहस्त्र पुडी ।
विश्वेश्वराला केला अभिषेक अतिरुद्राचा त्याच घडी ॥११॥

आसहस्त्रात पंक्ती उठविल्या ब्राह्मणभोजने दिली जेवढी ।
लहान थोराला दिली दक्षणा, मोहोर सोन्याची आली तेवढी ॥१२॥

पन्नास वर्षे केली मुशाफरी लोटली मुदत कुडी ।
दुसरे रामायण भारत बनले, ग्रंथ रचिले अचल थडी ॥१३॥

बहुत वर्षे लोटली म्हणून भलती मनी उद्भवली अढी ।
हाती धरूनी लेखणी लिहिले कवित्व केवढे कडोविकडी ॥१४॥

ग्रंथ साठले नजरेबाहेर, छाती धडकली चिंता बडी ।
काय करू त्याला किती लिहावे कुठं ठेवावे लावुनि थडी ॥१५॥

विद्याप्रसारक रत्ने मिळाली, दोन माणसे गिरीएवढी ।
मोती अंधारात लपून राहिलेले आणले उजेडात, भले गडी ॥१६॥

मित्र मिळाले वानिवडेकर शाहीर प्रख्यात चंद्रचुडी ।
जिंतीकर ते गुरव बापुराव, दिला डांगोरा लावुनी गुढी ॥१७॥

आणिले कवित्व रणांगणावर भर चौकात दिली बुडी ।
बरा केला उपकार दादाने, भल्या मर्दाने बांधली मढी ॥१८॥

केल्या कष्टाचे फळ देऊ अर्धे, सोडुनिया मनातील अढी ।
गर्द छाया तुम्ही करून दावली, झाली संतोषित माझी कुडी ॥१९॥

फंची पंटाईत आम्ही कवीश्वर अक्कल आहे माझी थोडी ।
परी मारली उडी मेरूवरुनी, एकएकाहुनी एक चढी ॥२०॥

पठ्ठे बापुराव कवीची वैखरी खरी नखऱ्याची खरी जोडी ।
लवड सवडीने मार्ग आक्रमिला पतपेढीवर ऋण फेडी ॥२१॥

# अनुक्रमणिका


निवेदन तीन
मनोगत पाच
चरित्रपर लावणी अकरा
१. कृष्णाकाठची बाळ पावलं १
२. प्रेरणादायी औंध संस्थान ९
३. परत गावची वाट १३
४. मुंबई नगरी बडी बाका २१
५. कोर्टाची पायरी २८
६. शाहिरी दुमदुमे मराठी मुलखात ४१
७. लोकराजा शाहू महाराजांनी गौरविलेला लोकशाहीर ४७
८. पठ्ठे बापूराव आणि पवळातील मतभेद ५२
९. बहिष्कृत पठ्ठे बापूराव ६२
१०. अखेरची भैरवी ६९
११. पठ्ठे बापूराव यांच्या भेदिक लावण्या ७६
१२. आणिले कवित्व रणांगणावर ८५
१३. सहज समाधी साक्षात्काराची ९६
१४. संदर्भ ग्रंथ १०३
१५. पठ्ठे बापूराव यांचे कवन प्रकार १०६

# १. कृष्णाकाठची बाळ पावलं

कोणत्याही काळात, कोणत्याही आणि कुठल्याही समाजात अगदी आदिकालापासून निरनिराळ्या प्रकारच्या लोककला अस्तित्वात असतात. चित्र, शिल्प, संगीत, जानपदगीते, लोकगीते, लोककथा या स्वरूपाच्या माध्यमांतून त्या त्या काळातील लोकसमूह आपले रंजन करीत असत. त्यात स्वानुभूत निर्मितीचाही आनंद लाभत असे. लोकसमूहाच्या प्रारंभिक रंजनाबरोबरच लोकप्रबोधन हेही आवश्यक ठरत गेले. आणि ती अशा लोककलांची निकडीची गरजही भासत गेली. लोकमानस, लोकचरित सुसंस्कारित करण्याचे बळ त्या लोककलांना प्राप्त होत गेले. मानवी जीवनाची लोकसंस्कृती अभ्यासली तर या अशा लोककलांचे किती महत्त्वपूर्ण स्थान आदिकालात होते हे लक्षात येईल.

मानवी जीवनाच्या दृष्टीने लोककला या विसावा होत्या. शिणल्या भागल्या मनाचा विरंगुळा होत्या. मरगळलेल्या जीवाला नवा तजेला देण्याचे सामर्थ्य या कलांत होते. आणि यातूनच येणाऱ्या कल्याणदायी संस्कारांनी लोकमानस विकासाच्या नावीन्याने भारून गेलेले दिसते. आपदांनी भरलेल्या, कष्टाने भागलेल्या काळजाच्या तळठावातील निरुत्साहाने डळमळलेल्या मानवी जीवनाला या लोककलाच आधार होत्या.

अंगणातील रांगोळी, भिंतीवरील काचेरी चित्रे, बैठकीच्या सोप्यातील रुतवून काढलेली काकणी तुकड्यांची नक्षी मनाला नव्या उन्मेषाची झाक देत रहाणारी असे. भल्या पहाटेपासून ते रात्रीच्या प्रहरापर्यंत अखंड जागरजाण देणाऱ्या लोककला या लोकजीवनापासून वेगळ्या काढताच येणार नाहीत.

त्यांच्यामुळेच तर एक लोकसंस्कृती बरवेपणाने नांदती झाली होती. पहाटेच्या उजळत जाणाऱ्या नवतेजाच्या साक्षीने वासुदेव 'दान पावले' म्हणत येई नी माथ्यावरच्या सूर्यनारायणाच्या साक्षीने डांगट, कुडबुडे जोशी, कडकलक्ष्मी, डोंबारी, बहुरूपी ते भारुडी-गोंधळी इत्यादींच्या रूपाने या नाना

लोककला समाजधारणा करीत असत. हे अखंड चक्र मनाच्या भरणपोषणाचे काम करीत होते. हा लोकजागर त्या काळचा आत्माच होता.

आपल्या लोकजीवनाला आणि लोकसंस्कृतीला भरघोस करण्यात संतांचे अभंग वाङ्मय, पंडितांची काव्ये-आख्याने, शाहिरांचे पोवाडे आणि लावण्या यांनी बहुमोल कार्य केले आहे. संतांचे अभंग जनलोकांच्या जीवनाशी एकरूप झाले होते. शाहिरांची लोकाभिमुखताही महत्त्वाची होती.

पेशवाईच्या काळात राम जोशी, होनाजी बाळा, अनंत फंदी, सगनभाऊ, प्रभाकर, परशराम यांनी आपल्या पोवाडे व लावण्यांनी मराठी वाङ्मय समृद्ध केले. त्यातून 'तमाशा' ही लोककला पुढे आली. पण नंतरच्या काळात तसा समर्थ लोकशाहीर या लोककलेला लाभला नाही. या क्षेत्रात एक अंधारयुगच निर्माण झाले.

असाच काही काळ गेला आणि तमाशा या सर्वसामान्यांच्या लोककलेला नवी झळाळी देणारा एक लोकशाहीर उदयाला आला. त्याने तमाशाला नवचैतन्य दिले. त्याला नावीन्याने नटविले. मराठी मातीचे अस्सल रंग त्यात भरले. आपल्या चतुराईने तमाशा कलेला मोहक रूप दिले. तमाशाला नवा बहर आला. आपल्या हातातल्या डफाने मराठी मनाला टवटवी दिली. वेगळ्या ढंगाच्या कवनांनी मराठी मनाला रिझविले. आणि त्याचबरोबर लोकशिक्षण व लोकप्रबोधनही साधले. असा आपल्या बहारदार कवनांनी मराठी माणसाच्या गळ्यातील ताईत बनलेला तो थोर लोकशाहीर म्हणजे पठ्ठे बापूराव.

ज्याच्या नसानसात एक वीरवती रग सळसळत होती, ज्याने मराठमोळ्या लोककलेच्या उत्थानासाठी जातपात मोडून टाकली, परंपरागत चालत आलेला समाजधर्म झुगारून टाकला, आपल्या कळत्या वयापासून तमाशाचा ध्यास रोमारोमात मुरविला आणि आपल्या विविधरंगी कवनांद्वारे नवा लोकधर्म आचरणात आणला, महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतील अज्ञ जनांच्या प्रबोधनासाठी सोवळे खुंटीला टांगले, त्या बापूरावाने आपला क्रांतिकारक बाणा व्रतासारखा जपला. ते आपल्या 'जीवनचरित्र'पर लावणीत लिहितात,

*'श्रेष्ठवर्ण मी ब्राह्मण असूनी / सोवळं ठेवले घालूनी घडी।*
*मशाल धरली हाती तमाशाची / लाज लावली देशोधडी।*
*महत्त्वाकांक्षा मनात एवढी / ठेवून बाजूला हजार नडी।*
*आपण तरोनी कैक तरावे / भवबंधाच्या पैलथडी।।*

अशा निष्ठेने आणि प्राणप्रतिष्ठेने तमाशाची मशाल हाती धरली. आणि

*'दोन लक्ष आम्ही केली लावणी*
*केवढी म्हणावी मात बडी।'*

असा यशाचा तुरा मायमराठीच्या मंदिलात ज्यांनी झळकाविला, त्या पठ्ठे बापूरावांच्या जीवनाची वाटचाल मोठी चित्तवेधक आहे.

पठ्ठे बापूरावांचा जन्म दि. ११-११-१८६६ रोजी आताच्या सांगली जिल्ह्यातील (पूर्वीचा सातारा जिल्हा) हरणाक्ष रेठरे या गावी झाला. हा गाव कृष्णा नदीच्या पवित्र काठी वसलेला आहे. कृष्णाकाठची माती सुपीक. लाल. कृष्णेच्या जीवनदायी पाण्यावर बापूरावांचा पिंड पोसला. तिथल्या लाल मातीत त्यांच्या पावलांना बळ लाभले. तिथल्या मोकळ्या रानवाऱ्याने त्यांच्या श्वासात नवी स्वप्ने पेरली.

कृष्णामाईचा पवित्र प्रवाह. त्याने ज्या प्रकारची दिशावळणे घेतली आहेत, ती पाहता या दिशा वळणात वसलेल्या गावाला तसेच पावित्र्य असते. तिथल्या सकस भूमीत मानवी समूहाला उन्नत करणारी नररत्ने जन्माला येतात. अशा या गावात पठ्ठे बापूरावांचा जन्म झाला. प्रसन्नपणे वाहणारी कृष्णामाई, हिरवाईने नटलेले कृष्णेचे ऐलपैल तीर, निळ्याभोर शोभेचे उंच उंच आभाळ. विलोभनीय नभमंडळ, भोवतीने उभ्या असलेल्या सुंदर डोंगरमाळा–सागरेश्वर, मच्छिंद्रगड, कमळभैरी, गणेश खिंड या सह्यगिरीच्या दौलतीने या मुलखाला दिलेले भव्यत्व, हे सारे सारे नजरेत भरण्यासारखे असलेले. या सर्वांच्या साक्षीने एक तालेवार लोकशाहीर हरणाक्ष रेठरे या गावच्या पांढरीत जन्माला आला आणि त्याने या पांढरीची कूस उजळून टाकली.

हा गाव तसा पीकपाण्याचा. घाटदार बैठकीचा. गावाला पावित्र्याचा वारसा देणाऱ्या देवळा-राऊळांचा. इथे पशुपती मंदिर आहे. भारतात दोनच ठिकाणी पशुपती मंदिरे आहेत. एक आहे काठमांडूला आणि दुसरे इथे हरणाक्ष रेठऱ्याला. याशिवाय 'रेठरे' या नावाच्या मागे उपाधी लागलेले 'हरणाक्ष' ते हरणाक्ष मंदिरही येथे आहे. महादेव मंदिर, चौंडेश्वरी मंदिर आणि जंगली महाराजांचा मठ यांनी इथले वातावरण मनभावी बनलेले. माणसाच्या मनाला पावित्र्याचा परिसरस्पर्श व्हावा असा अवतीभोवतीचा अवघा परिसर. मानवी मनाला आवाहन करीत रहावा असा हा इथला जणू मांडून ठेवलेला निसर्गाचा विशाल पट!

बापूरावांच्या वडिलांचे नाव कृष्णाजीपंत आणि आईचे नाव राधाबाई. घरची परिस्थिती जेमतेम होती. या घराण्यात गावाचे पौरोहित्य होते. धार्मिक संस्कारांचे पूर्वापार चालत आलेले वळण या घराने जपले होते. बाळबोध अशी भटभिक्षुकी प्रांजलपणाने चालविली होती. अशा घराण्यात बापूरावांचा जन्म. त्यांचे मूळ नाव श्रीधर. घरीदारी ते याच श्रीधर या नावानेच संबोधले जात होते. श्रीधर कृष्ण कुलकर्णी या नावाने शाळेत शिक्षणासाठी घातले गेले. दिसायला गोंडस. वाणीने गोड. गळा छान. लाघवी वागणे. नव्या गोष्टींबद्दल जिज्ञासा. चाहूल घेणारी भिरभिरती नजर. शाळेत सर्वांचा आवडता झाला. श्रीधरच्या गोड स्वभावाने शाळेतील मुले त्याला आवडीने बापू म्हणत. त्याचे स्मरण चांगले होते. वाचनाची आवड होती. कविता तर किती सुरेख गाई. तालासुराची जाण उपजंत असल्यासारखी होती. त्यामुळे तो गुरुजनांचा आवडता विद्यार्थी बनला.

पहाट झाली की श्रीधरला लवकर जाग येई. पहाटेच्या वेळी गावातील घराघरात गायल्या जाणाऱ्या जात्यावरच्या ओव्या ऐकायला त्याचे कान उत्सुक असत. त्याला त्या ओव्या आवडत. तोंडपाठ होत. त्या ओव्या तो गुणगुणत राही. ओव्या ऐकण्याचा त्याचा छंद त्याला वेडे करी.

त्या ओव्यांतील भाव आणि प्रासादिकता त्याला फार आवडे. अडाणी, अशिक्षित स्त्रियांनी सहज रीतीने रचलेल्या आणि गोड गळ्यांनी म्हटलेल्या ओव्यांचे श्रीधरला कौतुक वाटे. आधीच चुणचुणीत आणि हुषार असलेल्या श्रीधरला आपोआप ओव्या स्फुरू लागल्या. नव्या नव्या ओव्या तो रचू लागला. गाऊ लागला, स्त्रियांना त्याच्या त्या ओव्या फार आवडत. श्रीधरने रचलेल्या ओव्या गावातील, परिसरातील, पंचक्रोशीतील स्त्रिया आवडीने म्हणू लागल्या.

श्रीधर शाळेत कविता सुरेल गळ्याने म्हणत असे. त्या समजून घेत असे. त्यांचे अन्वयार्थ लावण्यात तो रमून जाई. मग आपणही कविता रचू लागला. म्हणून दाखवू लागला. त्याने एवढ्याशा वयात रचलेल्या ओव्यांनी आणि कवितांनी मित्र आणि शिक्षक भारावून जात. शाळेतील मुलांवर त्याचा प्रभाव पडला होता. जो तो त्याची वाहवा करी.

अभ्यासात तर एकपाठी होता. एकदा वाचले की पुन्हा वाचण्याची गरज नसे. हुषार विद्यार्थी म्हणून जो तो कौतुकाने त्याच्याकडे पाही. बुद्धीने तरल, स्मरणाने एकपाठी, स्वभावाने चुणचुणीत, मनाने संवेदनशील, वृत्तीने सरळ असा विद्यार्थी सर्वप्रिय झाला नाही तरच नवल! श्रीधरचे अक्षर वळणदार

होते. लिखाण शुद्ध असे. शिक्षक त्याच्या गुणांचे कौतुक करीत. शाबासकी देत. श्रीधरला अधिकच उत्साह चढे. आणि मग तो नव्या नव्या रचना करीत राही.

सुगीच्या हंगामात लोककलांकारांनी गाव भरून जाई. गजबजत राही. वासुदेव, डांगट, गोंधळी, भराडी यांचे येणे तर न चुकणारे. यांची कवने हा श्रीधर कुतूहलाने ऐकत राही. तशा धाटणीची कवने स्वतः रची. मग हेच कलाकार श्रीधरकडून नवी कवने रचून घेत. गावोगावी म्हणत रहात.

त्या काळात खेड्यापाड्यांत कुस्तीचा छंद होता. गावोगाव आखाडे असत. लाल मातीच्या तालमी असत. गावोगाव जत्रा भरत. तिथे कुस्त्यांचे फड होत. हरणाक्ष रेठरे येथेही कुस्तीचा आखाडा होता. श्रीधरला कुस्तीचा नाद होता. तो तालमीत खेळे. कुस्तीचे डावपेच शिके. जत्रांजत्रांवर भरणाऱ्या कुस्त्यांच्या फडात कुस्ती जिंके. असेल ते बक्षीस घेऊनच परते. जे करायचे ते निष्ठेने आणि हौसेने करायचे ही धारणा बालपणापासूनच श्रीधरच्या मनात मुरत गेली होती.

देवळावर दगडी गुंड असे. ती गुंड उचलण्याचा प्रयत्न करी. सरावाने खांद्यावर घेई आणि देवळाचे वेढे काढी. श्रीधरला पोहण्याचाही नाद होता. जवळूनच वाहात असलेले कृष्णेचे पात्र. त्या कृष्णेच्या पाण्यात मनसोक्त डुंबे. कृष्णेच्या पाण्यासारखे त्याचे मन नितळ आणि निर्मळ होते. कृष्णा काठावर, तिथल्या मातीवर त्याचा जीव विलक्षण जडला होता. बालपणापासून श्रीधरचे मन सुजाण आणि शरीर पिळदार बनत गेले होते.

श्रीधरच्या घरापासून जवळच महारवाडा होता. तिथली मंडळी तमाशावर प्रेम करणारी होती. तमाशा कलेवर त्यांचा जीव होता आणि जगणेही अवलंबून होते. तिथल्या रसिक महार मंडळींनी एकत्र येऊन आपल्या परीने तमाशाचा जमाव केला होता. ते रात्री तमाशाचा सराव करीत. ढोलकी वाजे. तुणतुणे तुंऽई तुऽई, करीत राही. हालगी कडकडत राही. नाच्या पोऱ्याच्या पायातील चाळांचा झणत्कार कानावर पडे. वाद्यांची सुरावट जमत राही. तिथे गायिलेली कवने ऐकायला मिळत. लावण्यांचे मुखडे श्रीधरला अस्वस्थ करीत. पण त्या रचना त्याला ओबडधोबड वाटत. त्यांच्या चाली त्याच त्या पारंपरिक पद्धतीने लावलेल्या असत. एकूण तमाशाच्या वाद्यांची आणि वाद्य-साथींची, कवनांच्या सुरावटीची ढंगदारता मनाला दंग करणारी असे. पण श्रीधरला त्यातील खडबडीत बाळबोधपणा बेचैन करी. तरीही तिथल्या डफावरच्या थापेने

श्रीधरच्या मनाला ओढ लागे. कडकडणारी हलगी रोमारोमात वीज खेळवी. त्याला या साऱ्या साऱ्याची ओढ लागे. त्याचे मन वेडे होई. अंथरुणात तो तळमळे. रात्री उठून जावे नी त्या तमाशाच्या रंगात रंगून जावे असे त्याला वाटे. खड्या आवाजात कवने म्हणावीत, त्यांना सुरेल चाली लावाव्यात, आपण कवनें रचावीत, त्यांच्या मोडक्यातोडक्या कवनांना चांगले रूप द्यावे असे त्याला राहून राहून वाटे. त्याच्या मनाची उलघाल होई. पण त्या काळातल्या रूढींनी त्याची बाळपावलं बांधून टाकली होती. प्रतिष्ठेच्या कल्पनांनी त्याला जखडून टाकले होते. ही परंपरांची बंधने झुगारून द्यावीत, त्या लोकांत मिसळावे, हातात डफ घ्यावा, लावण्या गाव्यात अशा विचाराने त्याचे मन बंड करून उठे. पण त्या लहान वयात परंपरावादी घराण्याचा धाक वाटे. जनलोकांची धास्ती वाटे. मग मनातल्या मनात त्याचा चाळा चाले. काळजातील कैफ कवनांच्या रूपाने ओठावर येई.

श्रीधरला या वयात समज होती. काही करण्याची चमक त्याच्या डोळ्यात दिसे. अभ्यासात तर तो नावाजलेला विद्यार्थी होता. शाळेत त्याला बापू म्हणत. त्याला बापू या नावानेच संबोधले जाऊ लागले. त्याच्या हुषारीचे कौतुक केले जाई. तो शिक्षकांचा प्रिय विद्यार्थी होता. योग्य आधार आणि संधी मिळाली तर तो आयुष्याचे सोने करील, स्वत: नाव कमावील आणि गावाचे नाव करील असे साऱ्यांना वाटे.

श्रीधर ऊर्फ बापू कुलकुर्णींचे चौथीपर्यंतचे शिक्षण संपले. पुढे काय करायचे हा प्रश्न उभा राहिला. पुढील शिक्षणाची सोय जवळपास नव्हती. दूर कोठे शिक्षणासाठी ठेवावे अशी आई-वडिलांची परिस्थिती नव्हती. बापू तर हुषार. त्याचे शिक्षण पुढे चालू राहिले पाहिजे असे शिक्षकांना वाटे. त्याला शिक्षणाची संधी मिळायला हवी; तरच त्याच्या बुद्धिमत्तेचे चीज होईल असे त्यांना वाटे. शिक्षकांनी विचार केला. त्यांना एक मार्ग सुचला.

त्या काळी औंध संस्थानात शिक्षणाच्या सुविधा होत्या. औंधचे राजे श्रीमंत बाळासाहेब हे प्रेमळ होते. शिक्षणप्रेमी होते. कलागुणांना संधी देणारे होते. आपल्या प्रजेवर त्यांचा जीव होता. प्रजेच्या हितासाठी अनेक प्रयोग ते आपल्या संस्थानात करीत. अनेक सुधारणांचा पाया त्यांनी घातला होता. शिक्षणाने आपली प्रजा शहाणी झाली पाहिजे अशा विचाराचे ते होते. शिक्षण हाच सर्व सुधारणांचा, प्रगतीचा पाया आहे अशी त्यांची धारणा होती. त्यांनी औंधमध्ये इंग्रजी शिक्षणाचीही सोय केली होती. गरीब विद्यार्थ्यांना राहण्याची

व्यवस्था केली होती. होतकरू, हुषार विद्यार्थ्यांच्या जीवनात नवी पहाट फुलवण्याची संधी उपलब्ध करून दिली जात असायची. अशा या जनहितदक्ष राजाची आठवण शिक्षकांना झाली. त्यांना राहवले नाही. बापूसारख्या चुणचुणीत, होतकरू विद्यार्थ्याला पुढे नेणारी वाट मिळाली पाहिजे म्हणून शिक्षकांनी औंधच्या राजांना पत्र लिहिण्याचे धाडस केले.

'आमच्या शाळेतील श्रीधर कृष्ण कुलकर्णी हा विद्यार्थी अत्यंत हुषार आहे. त्याच्या ठायी बुद्धीची चमक आहे. त्याला शिकण्याची ओढ आहे. तो एकपाठी आहे. आमच्या शाळेत चौथीपर्यंतच शिक्षणाची सोय आहे. पुढील वर्गांची येथे सोय नाही. श्रीधर कुलकर्णीसारख्या होतकरू विद्यार्थ्याला पुढे शिक्षणाची संधी मिळाली तर औंध संस्थानचेही नाव होईल. भावी काळात तो उत्तम कर्तृत्व करून दाखवील. आपण कलागुणांचे चाहते व आश्रयदाते आहात अशी आपली ख्याती सर्वत्र आहे. तरी अशा गुणवंत विद्यार्थ्याला पुढच्या शिक्षणाची संधी आपल्या उदार कृपेने मिळाली तर फारच चांगले होईल. आपली कृपादृष्टी लाभावी ही विनंती.'

शाळेचे वरीलप्रमाणे पत्र औंधला रवाना झाले. औंधच्या राजांनी शिक्षकांचे पत्र वाचले. त्या पत्रातील शिक्षकांची आपल्या विद्यार्थ्याबद्दल असलेली तळमळ आणि आस्था पाहून एका गुणी विद्यार्थ्याबद्दल त्यांच्या मनात आपुलकी निर्माण झाली. ते शिक्षणप्रेमी होते. गुणांचे चाहते होते. बापू खरे तर सातारा जिल्ह्यातील कृष्णेच्या पैलतीरावरील. ब्रिटिशांची सत्ता असलेला तो मुलूख. 'पण आपल्या संस्थानातील मुलगा नसला म्हणून काय झाले? गरजू अशा सर्वांना संधी मिळाली पाहिजे.' असा त्या प्रेमळ, गुणग्राहक राजाने विचार केला. आणि श्रीमंत पंतप्रतिनिधी बाळासाहेब यांनी आपल्या दरबारचे उंडे नावाचे गृहस्थ हरणाक्ष रेठरे येथे पाठविले. श्री. उंडे हे औंध दरबारचे हुषार कारकून होते. ते रेठरे येथे आले. त्यांनी बापूची परीक्षा घेतली. त्यांना त्याच्या बुद्धिमत्तेचे व हजरजबाबीपणाचे कौतुक वाटले. इतर गोष्टींची चाचपणी केली. बापूच्या वडिलांची परिस्थिती पाहिली. मग त्यांना वाटले,

'या मुलाला शिक्षणाची संधी मिळायला हवी. याने शिकायला हवे.' शिक्षकांना आनंद झाला. त्यांनी श्रीधरच्या आईवडिलांची समजूत काढली. बापू तर शिक्षणासाठी आतूर असलेला. पण एवढ्या लहान वयात गाव सोडून जाणे त्याला कठीण वाटू लागले. शाळकरी मित्रांत आणि तमाशाच्या कवनांत मन रमलेल्या बापूला हे वातावरण सोडून जायचे जिवावर आले; पण शिक्षकांनी

प्रेमळपणाने समजावले. बापूच्या मनाची तयारी झाली. तो औंध संस्थानात दाखल झाला.

## २. प्रेरणादायी औंध संस्थान

औंधसारख्या प्रेरणादायी संस्थानातील वातावरणात अंगच्या गुणांनी बापू चमकू लागला. त्याने शाळेत आपल्या लाघवी स्वभावाने साऱ्यांची मने जिंकली. तो सर्वप्रिय झाला. तो कविता तर उत्तम म्हणत असे. तो स्वतःच नवनव्या कविता रचत असे. आपल्या सुरेल गळ्याने गाऊन दाखवत असे. औंधच्या राजांना बापूचे कलाप्रेम आणि आत्मविश्वासपूर्ण धमक फारच आवडली. त्याची वाचनाची अवीट गोडी सर्वश्रुत झाली. तो मिळेल ते पुस्तक वाचत असे. सुंदर, रेखीव अक्षर, शुद्ध उच्चार, उत्तम वाणी यांमुळेही तो सर्वांना हवासा वाटे.

औंधचे पंतप्रतिनिधी यांना कलेची फार आवड होती. बापू तर उपजत कलावंत. त्याने स्वयंस्फूर्तपणे केलेली कवने, काही लिहिलेल्या ओव्या त्यांच्या कानावर होत्या. श्रीमंतांचे त्याच्यावर विशेष लक्ष गेले. त्यांनी त्याला सर्व परीने मदत केली. बापूही आपल्या जन्मजात हुषारीने शिक्षणाची एक एक पायरी चढत गेला. औंधच्या वातावरणाचेही त्याच्यावर संस्कार झाले. तिथल्या शिक्षकांचा आवडता बनला. तो एकपाठी असल्याने जे जे तो वाचे, ते ते त्याच्या स्मरणात राही. प्रसंगावधान आणि हजरबाबीपणा यामुळे तो इतर विद्यार्थ्यांपेक्षा उठून दिसत असे. बापू तिथे रमला होता. नवे नवे ऐकण्याची, नवे नवे पाहण्याची आणि नवे काही करण्याची त्याच्या ठायी लालसा होती. तिथे असलेल्या, मिळतील त्या ग्रंथांचेही तो वाचन करी. तो बहुश्रुत बनत चालला होता. श्रीमंत महाराणीसाहेबांना बापूचे हे 'विद्यार्थी'पण आवडले. त्याला मायेचा ओलावा मिळाला. तो राजदरबारच्या प्रेमळ आश्रयाखाली मराठी सातवी (व्ह.फा.) पर्यंत शिकला. त्याने इंग्रजीच्या सहा इयत्ता केल्या. संस्कृतच्या परीक्षा दिल्या. बापूचा बापूराव बनला.

श्रीमंत महाराणीसाहेबांचे बडोदा हे माहेर होते. त्या अधूनमधून बडोद्याला माहेरी जायच्या. एकदा त्या माहेरी जायला निघाल्या, त्यावेळी त्यांनी बापूरावांना बरोबर घेतले. त्या कलागुणी होत्या. कुशाग्र बुद्धीच्या होत्या. बडोदा हे शहर

त्या काळी नावाजलेले शहर होते. औंध संस्थानासारखेच तेही नानाविध कलांचे माहेरघर होते. शिक्षणाच्या बाबतीत तर एक पाऊल पुढे होते. तिथले वातावरणही प्रेरणादायी होते. बापूराव तिथल्या वातावरणात रमले. महाराणी सरकारांनी बापूरावांच्या बुद्धीला वाव मिळावा म्हणून तिथल्या कलाभुवन या संस्थेत शिक्षणासाठी त्यांचे नाव घातले. कलाभुवन ही नामांकित संस्था होती. अनेक ठिकाणचे विद्यार्थी तिथे शिक्षणासाठी येत. कौशल्य आत्मसात करून या संस्थेचे नाव दुमदुमत ठेवत. बापूरावांना 'यंत्रदुरुस्ती' विभागात शिक्षणासाठी घातले. बापूराव हरहुन्नरी होते. त्यांनी यंत्रदुरुस्तीबरोबरच इतरही कलांचे शिक्षण घेतले. बडोदा संस्थानातील या संस्कारक्षम वातावरणात बापूरावांना नवे नवे पाहायला मिळाले. महाराणी सरकारांचे बापूरावांच्या शिक्षणावर लक्ष असे. त्याने खूप शिकावे, नाव कमवावे अशी त्यांची मनोमनी इच्छा होती.

त्याकाळी बडोदा हे संस्थान सामाजिक सुधारणांमध्ये आघाडीवर होते. तिथले संस्थानिक आपल्या प्रजेची काळजी वाहात. आपली प्रजा प्रगत असावी, सुखी रहावी यासाठी सदैव जागरूक असत. त्यांनी शिक्षणाच्या अनेकविध सुविधा निर्माण केल्या होत्या. सांस्कृतिकदृष्ट्याही या संस्थानचा थोर वारसा होता. विविध कलांचा परिपोष येथे झाला होता. सर्व सण मोठ्या आनंदाने साजरे केले जात. सांस्कृतिक कार्यक्रमांचा तर बहर असे. अवतीभोवती पारतंत्र्याचे जोखड असले तरी या संस्थानातील प्रजा स्वातंत्र्याच्या मोकळेपणाने येथे सुखाने नांदत होती. प्रजाहितदक्ष राजाच्या आश्रयाखाली आपला विकास साधत होती.

निरनिराळ्या प्रादेशिक लोकजीवनात, खास करून काही काही वेगळे वेगळे सण मोठ्या हौसेने साजरे केले जातात. एका एका सणाची त्या त्या प्रदेशाची खासियात असते. बडोदा शहरातही अनेक उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जात. पण त्यातही 'शिमगा' हा सण अधिक उत्साहाने साजरा केला जाई. जसे दक्षिण भारतात 'ओनम्' हा, म्हैसूरमध्ये 'दसरा', तर बंगालमध्ये दुर्गामातेचा सण, तर अन्यत्र दिवाळी असे विशेषकरून सण साजरे होतात.

बडोदा येथे 'शिमगा' या सणात हजेरी लावण्यासाठी बाहेरगावचे नामांकित गवई येत. संगीताची तर मेजवानीच असे.

दूरदूरचे पट्टीचे वादनकर या सणाची वाटच पाहात असत. त्यांनी इथे येऊन आपली कला सादर केली नाही असे कधी होत नसे. त्या परिसरातही

तमाशा फडांची प्रसिद्धी होती. अनेक नामांकित तमाशा फड लोकरंजनासाठी दुमदुमत असलेले होते. ते तमाशा फड हे फार मोठे आकर्षण असे. सर्वसामान्यांच्या मनोरंजनासाठी आणि लोकप्रबोधनाकरिता हीच एक महत्वाची कला होती. हे तमाशाचे फड आपल्या फडाचे कौशल्य दाखविण्यासाठी शिमग्याच्या सणाला तमाशा सादर करीत. शिमगा सणात तमाशा फडांची धामधूम उडे. लोकांमध्ये उत्साह संचरे.

बापूरावांना आधीच तमाशाची आवड. लहानपणापासून ते तमाशाचे नादी होते. तमाशातील लावण्या ऐकणें आणि गुणगुणणे यांचा त्यांना छंदच होता. गावाकडे असताना ते रात्रीचे चोरून तमाशाला जात. बडोद्यात तर राजरोस उत्सवच पहायला मिळत होता. सोळा वर्षांच्या बापूरावांच्या मनाची तेथील संस्कृत ग्रंथांच्या वाचनाने आणि तेथील वातावरणाने चांगलीच मशागत झाली होती. मूळ स्वभावात असलेल्या तमाशाचे आकर्षण त्यांना चैन पडू देत नव्हते. ते तमाशा पहायला जात. तिथल्या तमाशाचे एकूणच रंगरूप पाहून अस्वस्थ होत. तमाशा ही अत्यंत चांगली कला आहे, तिला योग्य वळण लावले पाहिजे, तिच्या सादरीकरणामध्येही ओबडधोबडपणा आहे, म्हणून तमाशाला योग्य, मनोरम असे रूप दिले पाहिजे असे त्यांना सारखे वाटत होते. यासाठी ते अस्वस्थ होत. आपण आपल्या वाचनाचा, पुराणादी ग्रंथाध्ययनाचा उपयोग या भोळ्याभाबड्या लोकांच्या जीवनात विरंगुळा निर्माण करणाऱ्या तमाशा कलेच्या उत्तम जडणघडणीसाठी करावा असे त्यांना सतत वाटे. ते त्या तमाशा कलाकारांना भेटत. त्यांच्यात मिसळत. कवने कशी असावीत ते सांगत. आपण स्वत: लावण्या रचून देत. लोकांना चांगली कवने ऐकायला मिळावीत आणि लोकांची रुची वाढावी हीच बापूंची भावना होती. त्यांना तमाशा कलेचा चांगला आविष्कार व्हावा ही तळमळ होती. म्हणून बापूंची ये-जा तमासगिरांच्यात होई. त्यांचे या मंडळात येणे-जाणे वाढले. ऊठबस वाढली.

तमाशा कला ही एका विशिष्ट लोकांची कला होती. ती त्यांनीच केली पाहिजे, सर्वसामान्यांनी ऐकण्याची ती कला आहे, अशी रीत त्या काळी होती. समाजात विशिष्ट असे संकेत त्या काळात होते. ज्या त्या समाजाने स्वीकारलेले जे ते रिवाज होते. जीवनात जगण्याची पद्धती त्या त्या जातीपातीपुरती मर्यादित होती. या चालत आलेल्या परंपरा होत्या. पूर्वापार रुजलेल्या त्या परंपरा पाळण्याची बंधने लोकमानसाने पाळण्याची असतात.

त्या काळात तमाशा हा ब्राह्मण मंडळींना वर्ज्य होता. पूजापाठ करणे, ग्रंथाध्ययन करणे, कीर्तन, प्रवचने करणे, धार्मिक विधी करणे यांसारख्या गोष्टी करणे, हे विहीत कर्म आहे असा परिपाठ होता. पण बापूराव तर ब्राह्मण. त्यांनी तमाशा मंडळीत ऊठबस करणे विहीत नव्हते. बापूराव तमाशाला जातात ही गोष्ट महाराणी सरकारांच्या कानावर गेली. त्यांना बापूंचे तमाशाला जाणे आवडले नाही. बापूरावाने चांगले संस्कार घ्यावेत; त्याने आपल्या जीवनात खूप काही चांगले करावे म्हणून आपण त्याला आश्रय दिला, शिकण्याची संधी दिली. आणि हा तर नको त्या वाटेवर झुकू लागला आहे, हे पाहून त्यांना वाईट वाटले. ज्या विचाराने त्या बापूंकडे पहात होत्या, त्या दृष्टीने त्यांचा अपेक्षाभंग झाला. त्यांना रागही आला. त्यांनी बापूरावांना कारकुनी करण्याची आज्ञा केली. बापूरावांना निमूटपणे कारकुनाचे काम करणे भाग पडले. कारकुनीत त्यांचे मन लागत नव्हते. सुंदर कवने आणि लावण्या रचण्याची ज्यांच्या लेखणीत असोशी, त्यांच्या लेखणीला कंटाळवाणी खर्डेघाशी करण्याचे काम करावे लागले.

बडोद्यात असतानाच एक दुःखद घटना बापूरावांना कळली. त्यांचे आई-वडील गावी म्हणजे रेठरे हरणाक्षला असत. त्यांच्यावर काळाने अकल्पितपणे घाला घातला. बापूरावांवरील मायेचे छत्र नियतीने हिरावून नेले. हे अघटित ऐकून बापूरावांना धक्का बसला. त्यांनी महाराणी सरकारना सांगितले. त्यांचा निरोप घेतला. नोकरी सोडावी लागली. आपल्या गावी यावे लागले. बापूरावांवर हा आघात होता. ते मातापित्याविना पोरके झाले. एकाकी झाले. बापूराव गावी यायला निघाले होते त्यावेळी महाराणी सरकार म्हणाल्या होत्या, 'बापू तू खूप शिकावंस, मोठा व्हावास, नाव कमवावंस असं आम्हाला वाटत होतं. आता तू आणि तुझं नशीब.'

बापूरावांच्या नजरेसमोर केवळ अंधार उभा होता.

# ३. परत गावची वाट

बापूराव गावी परतले. त्यांना आयुष्य चकवा देत होते. आतापर्यंत त्यांचे खूप वाचन, चिंतन झाले होते. काही करावे अशी उर्मी होती. पण नेमके ध्येय गवसत नव्हते. आता तर राजाश्रय संपलेला होता. आईची माया मिळणार नव्हती. वडिलांचे छत्रही लाभणार नव्हते. बापूराव एकटे उरले होते. एकाकी झाले होते. मायेचे आधाराचे हात सुटले होते. समोर उघडे आकाश होते. दुसरे काही करण्यासारखे नव्हते. वडिलार्जित थोडी शेती होती. त्यांच्या मनाची तगमग होत राही. चुलत्याने त्यांना सावरण्याचा प्रयत्न केला. गावाने वडिलांकडे चालू होती, ती उपाध्याची कामगिरी बापूंवर सोपवली. बापूंचा उदरनिर्वाह चाले. यानिमित्ताने बापूंच्या हातून पोथ्या-पुराणे वाचून झाली. पौराणिक ग्रंथ वाचनाची त्यांना मूळातच आवड होती. काही इतरत्रही ग्रंथ वाचले. मनाची मशागत होण्यास आणखी एक कारण होते. रेठरे हरणाक्ष या गावी जंगली महाराजांचा मठ होता. या जंगली महाराजांवर अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ यांचा प्रासादिक अनुग्रह होता. जंगली महाराजांचा हिंदू धर्म ग्रंथ व हिंदू वेदान्त यांचा दांडगा अभ्यास होता. त्यात ते पारंगत होते. बापूरावांना बाळपणापासूनच जंगली महाराजांचे आकर्षण होते. ते मठात जात. जंगली महाराजांचे विचार ऐकत. सन १८७७ साली जंगली महाराजांचा प्रत्यक्ष आशीर्वाद त्यांना लाभला. बापूरावांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. तेरा वर्षे बापूरावांना अनुग्रह मिळत राहिला. बापूरावांना पुढे अध्यात्म्याची ओढ लागली त्याचे कारणच हे होय. पुढे मोठे झाल्यावर बापूरावांनी आपल्या आध्यात्मिक गुरूबद्दल गौरवाने उद्गार काढले आहेत. त्यांच्यामुळेच आपल्याला कवित्वाची स्फूर्ती मिळाली असे त्यांनी म्हटले आहे. आपल्या तीर्थाच्या लावणीत मोठ्या अभिमानाने ते म्हणतात,

*'माझा गुरू आहे जंगलीवली पीर पीर पीर'*

तसेच दुसऱ्या एका लावणीत म्हणतात,

*'रेठरे हरणाक्ष माझे घर। जंगलीबाबाचा हात शिरावर।*
*त्यांनी पंथ दाविला राजयोग सुंदर।'*

तेथील या धार्मिक वातावरणाचा संस्कार त्यांनी वेगवेगळ्या अर्थाने स्वीकारला. ब्रह्म, माया यासबंधी एकप्रकारची जिज्ञासा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. त्याचीच गूढरम्य कोडी त्यांनी भावी शाहिरी आयुष्यात कवनांतून उकलून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यांचे अस्सल कुलकर्णीपणाचे घराणे. त्याही वळणाने ग्रंथसंगत त्यांना लाभली होती.

मनाच्या या मशागतीबरोबरच त्यांनी आपल्या शरीराचीही निगराणी केली होती. शरीर गोंडस होतेच. शिवाय तालमीत कुस्ती खेळण्याचा छंद. त्यामुळे शरीर पिळदार होते. देवळाच्या पटांगणातील भलीमोठी गुंड ते उचलत, खांद्यावर घेत आणि देवळाच्या भोवती प्रदक्षिणा काढीत. कमावलेले शरीर. कुस्तीच्या डावपेचात निष्णात झालेले बापूराव अनेक जत्रांवर जात. तिथल्या कुस्त्यांच्या फडात कुस्ती जिंकूनच परतत. कराडपासूनच ते कोल्हापूर-पन्हाळ्यापर्यंत त्यांनी लाल मातीचे फड जिंकले. त्या काळात कृष्णा-वारणा आणि पंचगंगा नद्यांच्या काठच्या जत्रांत कुस्त्यांचे फड गाजत. पंचगंगेच्या काठी वसलेल्या कोल्हापूर नगरीत नाना कलांचे माहेरघर असे. त्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराज तर या कलांचे भोक्ते. त्यांच्या प्रजाहितदक्ष धोरणाने या सर्व कलांचा तो वैभवाचा काळ होता. संगीत, नाटक, शिल्पकला आणि मल्लविद्या यांच्या उत्कर्षामुळे कोल्हापूर संस्थानचे नाव भारतभर झाले होते. मल्लविद्येत पारंगत असलेले अनेक पैलवान परप्रांतांतून, विशेषतः दिल्ली, पंजाबमधून या मुलखात येत असत. बापूरावांनी अशा काही पंजाबी पैलवानांशीही दोन हात केले होते. मानाची कडी मिळवली होती. चांदीचे तोडे बक्षिसादाखल प्राप्त केले होते. कोल्हापूरच्या मैदानात बापूरावांनी नेत्रदीपक कुस्ती जिंकली तेव्हा स्वतः राजर्षी शाहू महाराजांनी त्या काळात दोनशे रुपयांचे बक्षीस बहाल केले होते. याच दोनशे रुपयांवर बापूरावांनी पुढे तमाशाचा फड उभा केला.

रेठरे हरणाक्ष येथे बापूरावांच्या मनाने उचल खाल्ली. त्यांना बालपणापासूनच तमाशाचे आकर्षण होते. मनापासूनच वेड होते. त्यांच्या घरापासूनच अवघ्या दोनशे-तीनशे पावलांवर महारवाडा होता. पूर्वी एक प्रसिद्ध म्हण होती,

'ब्राह्मणा घरी लिहिणं, शेतकऱ्या घरी रुमणं आणि महाराघरी गाणं.'

ही म्हण म्हणजे त्या काळाचे वास्तव होते. गाणे ही कला महार मंडळींना अवगत होती. त्या कलेच्या आधाराने महार मंडळी तमाशा बसवीत. 'तमाशा'ही लोककला त्यांच्यामुळेच महाराष्ट्राला मिळाली आहे. तमाशा ही मराठी मनाला भुरळ पाडणारी कला आहे. तमाशामुळे महारमंडळींचे पोट चाले. शिवाय सर्वसामान्य माणसांचे मनोरंजन होई. कष्टलेल्या, शिणलेल्या मनाला विरंगुळा मिळे. त्या काळात तमाशाशिवाय भोळ्याभाबड्या माणसांचे रंजन करणारे साधन नव्हते. रंजनाबरोबर लोकशिक्षणही आपोआप साधले जाई.

रेठरे हरणाक्षच्या महारवाड्यातील मंडळी तमाशा करीत. रात्री त्यांच्या तालमी चालत. बापूरावांच्या कानावर तिथल्या डफ-तुणतुण्याचे आवाज येत. चाळांचे झणत्कार त्यांना बेचैन करीत. त्यांच्यापरीने म्हटलेल्या लावण्यांचे तुकडे त्यांना ऐकू येत. त्या लावण्यांची ओबडधोबड रचना बापूरावांना आवडत नसे. तिथला ताल-ठेकाही त्यांना रुचत नसे. ते अस्वस्थ होत. त्यांना वाटे, 'इतकी सुंदर ही कला आहे. पण तिची मांडणी मोहक होत नाही. लोकांच्या मनाची पकड घेणारी, सुंदर रचना व्हायला हवी.' पण बिचारी महार मंडळी. अडाणी. अशिक्षित. जमेल तशी रचना करतात. त्यावर संस्कार व्हायला हवेत. संस्कार झाले तर तमाशा इतकी उत्तम लोककला नाही. पण यांना कोण शिकवणार? कुणी तरी शिकवायला हवे. समजून द्यायला हवे.'' बापूरावांच्या मनात चलबिचल होई. त्यांना वाटे, 'आपण त्यांना शिकवावे. कवने रचून द्यावीत. व्यवस्थित बसवून द्यावीत. मग सुंदर तमाशा उभा राहील'. असा विचार करता करता त्यांच्या मनात द्वंद्व माजे, 'आपण ब्राह्मण. तमासगिरात कसं मिसळायचं? बडोद्याला असताना आपण तमाशा मंडळीत मिसळलो; म्हणून तर महाराणी सरकारांचा रोष ओढवला. कारकुनी करावी लागली. लोकांना खालच्या समाजात मिसळणे आवडत नाही... औंधच्या संस्थानचे उपकार होते आपल्यावर. त्यांच्यामुळे तर आपले शिक्षण झाले. विद्या मिळाली... त्यांचे ऐकणे आपलं कर्तव्य होते... पण आता...?'

बापूरावांच्या डोक्यात विचारांचे थैमान चाले. रात्री तमाशाचा आवाज कानावर पडला की त्यांना काही सुचत नसे. झोप लागत नसे. तमाशाच्या छंदाने त्यांना वेडे केले. ते स्वतःला आता आवरू शकत नव्हते. एका रात्री गुपचूप उठले. चोरून त्या तमाशा मंडळीत जाऊन मिसळले. तमासगीर मंडळीही थोडी चमकली. बापूरावांचे येणे हे समाजबाह्य आहे, हे त्यांनाही

उमजत होते. पण बापूरावांचा निर्धार पाहून ती मंडळीही गप्प झाली. आणि बापूरावांचे रात्रीचे चोरटं येणे-जाणे सुरू झाले. तमासगिरांत ऊठबस वाढली.

बापूराव स्वतः कवने रचत असत. त्यांचा गळा चांगला होता. ताल-सुराची समज होती. तमाशाला नवी कवने मिळाली. नव्या चाली मिळाल्या. नवा बाज मिळाला. नवा साज लेऊन तमाशा घडू लागला. आणि बापूरावांचे मंडळींत जाणे-येणे लोकांपर्यंत पोचले होते. चुलत्याच्या कानावर आले होते. चुलते हरिपंत कुलकर्णींनी बापूरावांना समज दिली. ताकीद केली. पण बापूराव डगमगले नाहीत. त्यांचा निश्चय पक्का होता.

बापूराव त्या तमासगीर मंडळींबरोबर रात्र रात्र घालवीत. त्यांना लावण्या लिहून देत. तोंडी समजावून देत. मनासारखी तमाशाची मांडणी करून देत. त्या तमाशा फडाला नवे बाळसे आले. नवे रंगरूप आले. तो तमाशा गावोगाव जाऊ लागला. जत्रा गाजवू लागला. बापूराव तर आता उघडउघड तमाशाच्या नादाला लागले. बापूरावांच्या नव्या, वेगवेगळ्या लावण्यांनी तमाशाचा लौकिक वाढला. बापूराव या तमाशाच्या फडाच्या पाठीमागे आहे हे सर्वश्रुत झाले.

तमाशा ही त्या काळात जनसामान्यांच्या आवडीची लोककला. पण ब्राह्मणाच्या पोराने तमाशा मंडळींशी संबंध ठेवणे हे समाजाला आवडणारे नव्हते. बापूरावांची चर्चा गावभर सुरू झाली. ब्राह्मणाचा पोर वाया जाऊ नये म्हणून गावकऱ्यांनी बापूरावांना कुलकर्ण्याची नोकरी लावली. गावच्या चावडीत बापूराव बसले, की त्यांना इतर गोष्टींत रस घ्यायला सवड मिळणार नाही, त्यांच्या छंदी मनाला आवर बसेल अशी सर्वांची अटकळ होती; पण बापूराव खंदे कलावंत होते. त्यांच्या रोमरोमात तमाशाचा छंद भिनला होता.

बापूराव एकदा चावडीत कुलकर्णीपदाचं काम करीत बसले होते. ते देहाने तिथे असायचे, पण मनाने तमाशाच्या तंद्रीत असायचे. त्यावेळी एक सुंदर स्त्री दस्तऐवज लिहून घेण्यासाठी बापूरावांच्याकडे आली. तिचं मनोहारी रूप पाहून बापूरावांच्यातील लावणीकार जागा झाला. रात्री ऐकलेल्या, पाहिलेल्या तमाशाचा कैफ अजून उतरला नव्हता. त्यांनी त्या धुंदीतच त्या स्त्रीचा दस्तऐवज लिहून दिला. त्या नादात डोक्यातील तमाशाची बेहोषी त्यांनी त्या कागदावर एक मनमोहक लावणी लिहून उतरवली. हे सारे होऊन गेले तरी त्याचे भान बापूरावांना नव्हते. त्यांनी जो दस्तऐवज दिला तो दस्तऐवज तहसिलदाराकडे गेला. तहसिलदाराचे बापूरावांच्यावर प्रेम होते. त्यांच्या लेखणीवर त्यांचा विश्वासही होता. म्हणून त्यांनी तो दस्तऐवज न वाचताच

त्यावर सही केली आणि सातारच्या इंग्रजी प्रांताधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी पाठविला. त्या इंग्रजी गोऱ्या साहेबाला देवनागरी वाचता येत होते. त्या गोऱ्या साहेबांनी तो दस्तऐवज पाहिला. अक्षराला अक्षर लावून वाचला. वाचता वाचता ते अडखळले. त्यांना त्यातील काही मजकूर वेगळा वाटला.. तो सरकारी नमुन्यातील नसावा असे त्यांना जाणवले.

त्या दस्तऐवजावरच्या अक्षरओळी -

*'तीळ शोभे । गोरा गाल । नथनी तुझी झुबकेदार ।'*

अशा होत्या. गोऱ्या साहेबाने बापूरावांना आणि मामलेदारांना ताबडतोब बोलावले आणि विचारले,

'व्हॉट इज द मिनींग ऑफ् तीळ शोभे । गोरा गाल । नथनी तुझी झुबकेदार ।'

बापूरावांना चूक कळली, मामलेदारही चमकले. बापूरावांनी आपली चूक मान्य केली. साहेबांची क्षमा मागितली. म्हणाले,

'चुकून घडले. पुन्हा असं घडणार नाही.'

पण गोरा साहेब चढ्या सुरात म्हणाला,

'हे सरकारी काम आहे. डोकं भानावर ठेवा. असं करून चालणार नाही. तुमचे छंदफंद घरी. सरकारी कामात चालणार नाहीत. जमत नसेल तर नोकरीवरून काढून टाकू.'

साहेबाचा तो पवित्रा बापूरावांसारख्या मनस्वी कलाकाराला न रुचणारा होता. त्यांचा राग अनावर झाला आणि त्यांनी त्याच संतापाच्या भरात नोकरीचा राजीनामा दिला. म्हणाले, 'ही असली खर्डेघाशी करून महिन्याला चार रुपये मिळवण्यापेक्षा मी तमाशा कलेच्या जोरावर रोज चार रुपये मिळवीन.' बापूरावांना इतरांनी समजावलं; पण त्याचा काही परिणाम झाला नाही. बापूरावांनी राजीनामा दिला तो दिलाच.

महिन्याला हमखास मिळणारी मिळकत कमी झाली. परंतु बापूरावांना त्याची कसलीच दिक्कत वाटली नाही. ते म्हणाले,

'मी नोकरी करण्यासाठी जन्मालाच आलो नाही. मला असली काचणारी बंधनं नको आहेत.'

त्यांच्या मनाला न रुचणाऱ्या नोकरीवर लाथ मारल्याचं समाधान त्यांना

मिळाले. बापूराव मोठे जिद्दीचे होते. इर्षेबाज होते. आता ते पूर्ण स्वतंत्र झाले होते. त्यांच्या मनाला आवडणाऱ्या गोष्टी करायला मोकळे झाले होते. ते म्हणाले,

*'आता मी तरोनी। कैकांना तारीन।*
*करीन उद्धार कोटी कुळे।*
*पठ्ठे बापूराव कवीचे डाहाळे*
*खणूया पापाची पाळेमुळे।'*

समाजाला, कोटी कोटी कुळांना तारण्यासाठी त्यांनी हातात डफ घेतला आणि रसिकजनांना प्रार्थना केली,

*'प्रार्थना संत सज्जना !*
*दुष्ट दुर्जना, वृद्धांना*
*नमस्कार माझा नित्य नवा ताजा!'*

बापूरावांनी तमाशा कलावंत गोळा केले. ब्राह्मण्य झुगारून तमाशाचा फड उभा केला. आधीच त्यांच्या लावण्या तमाशाच्या फडांतून गायल्या जात होत्या. रसिकांना आवडल्या होत्या. रसरशीत कवने ऐकून रसिकांच्या तोंडून उद्‌गार निघत, 'शाब्बास पठ्ठे.'

बेभान झालेले रसिक शिट्या वाजवीत. फेटे उडवीत. 'पठ्ठे बापूराव' ही पदवी लोकांनीच अंत:स्फूर्तपणे बापूरावांना बहाल केली. बापूरावांचे 'पठ्ठे बापूराव' झाले आणि हेच नाव सर्वत्र दुमदुमत राहिले. पठ्ठे बापूरावांच्या लावण्यांनी लोकांची मने जिंकली. त्यांचा तमाशा गाजू लागला. एक ब्राह्मणाचा पोर तमाशा उभा करतोय हेच नवल होते. त्यामुळेही लोकांमध्ये आकर्षण होते. तरीही लोकांमध्ये कुजबूज होती. गावातील लोकांच्या कपाळाला आठ्या पडत होत्या. घरात नाराजी होती. पण बापूरावांचा दृढनिश्चय होता. हातात डफ घेऊन ते गरजले,

*'श्रेष्ठवर्ण मी ब्राह्मण असुनी।*
*सोवळं ठेवलं घालूनी घडी।*
*मशाल धरली हाती तमाशाची*
*लाज लावली देशोधडी।'*

पठ्ठे बापूरावांनी परंपरागत चालत आलेले सोवळे बाजूला ठेवले. केवळ रंजनासाठी त्यांनी तमाशा कला जवळ केली नाही, तर मनाची पकड घेणाऱ्या

या लोककलेद्वारे अज्ञ, अडाणी समाजाला बोध करता येईल, खेड्यापाड्यातील लोकांना उपदेश करता येईल अशीच पठ्ठे बापूरावांची धारणा होती. त्यांनी वाचलेल्या ग्रंथांद्वारे आणि गुरुपदेशामुळे मिळालेली अध्यात्मविद्या लोकांपर्यंत पोचवता येईल अशीही एक त्यांची भूमिका होती. सर्वांपर्यंत पोचलेली तमाशा कला अधिक मोहक करता येईल; तिला देखणे रूप देता येईल, ओबडधोबड लावणीला ज्ञानमयी रूप देता येईल अशी त्यांच्या ठायी तळमळ होती. म्हणूनच त्यांनी शाहिरीचा अवलंब केला. अनेक तमासगिरांना त्यांनी नव्या, ताज्या बहारदार लावण्या लिहून दिल्या.

पठ्ठे बापूरावांचे नाव सर्वमुखी झाले होते. प्रेक्षकांच्या आवडीचे झाले होते. परंतु घरात नावडीचे बनले होते. हा ब्राह्मणाचा पोर अगदीच वाया जाऊ नये असे गावकरी मंडळींना वाटे. बापूराव तमाशाच्या नादाने पारच हातचा जाऊ नये असे चुलते हरिपंत कुलकर्णी यांना वाटे. सर्वांनाच काळजी पडली. हरिपंतकाकांनी विचार केला. बापूरावांचे लग्न करून टाकावे म्हणजे त्यांचे पाय स्थिर होतील, विवाहाच्या बंधनात अडकले की तमाशाचा नाद सुटेल असे वाटले. संसारात गुरफटल्यावर आपोआपच संसार एके संसार करीत सारे विसरतील अशी चुलत्यांची समजूत होती.

बापूरावांचे लग्न जुळवण्याच्या वाटाघाटी चालू झाल्या. स्थळांचा शोध सुरू झाला. जवळच्या-दूरच्या नातलगांतून चाचपणी सुरू झाली. पण स्थळ काही जुळत नव्हते. बापूराव ब्राह्मण असून खालच्या समाजात वावरतो,, तमासगीर मंडळींत असतो; तमाशा करतो, लावण्या रचतो याची चर्चा सर्वत्रच पसरली होती. त्या काळात प्रतिष्ठेच्या कल्पना तीव्र होत्या. रूढींची बंधने कडक होती. घालून दिलेले लोकाचार पाळावे लागत. नाही तर समाजापासून वाळीत पडण्याची भीती असायची. अशा काळात तमाशाचे वेड असलेल्या बापूरावांना कोण मुलगी देणार? सगळीकडून नकार मिळत गेले. बापूरावांसारख्या फटींग माणसाच्या गळ्यात कोण आपली मुलगी बांधणार? पण हरिपंततात्यांनी प्रयत्न सोडले नाहीत. त्यांना बापूरावांना वळणावर आणायचे होते. नाही तर घराण्याचे नाव ते काय राहिले? त्यांनी चिकाटी सोडली नाही. लग्न केले तर बापूरावांना आवर घालता येईल म्हणून सोयरिकीच्या शोधात राहिले.

पण तमाशा करणे म्हणजे तत्कालीन सनातनी समाजाविरुद्ध होते. कुणी मुलगी द्यायला तयार होईना. तरीही विधिलिखित असतेच. शिखर-शिंगणापूर येथे शंभू महादेव बडवे हे राहात होते. त्यांची घरची स्थिती बेताचीच होती.

त्यांना सरस्वती या नावाची मुलगी होती. या मुलीशी बापूरावांचा विवाह जुळला. रेठरे हरणाक्ष येथे बापूरावांचा लग्नसोहळा थाटामाटात साजरा झाला. पण होमाभोवती घातलेली सप्तपदी बापूरावांसारख्या कलावंताच्या पायात बंधने घालायला समर्थ ठरली नाही. त्यांच्या काळजात वेगळाच होम धगधगत होता. लग्न झाले. संसार सुरू झाला. आर्थिक विवंचना पुढे ठाकली. बापूरावांना काय करावे कळेना. संसार तर चालला पाहिजे. इथे पैशाचे अन्य साधन नव्हते. बापूरावांनी विचार केला. गाव सोडावा असे त्यांच्या मनाने घेतले. सारीच मानसिक कोंडी झाली.

त्याकाळी पोट भरण्यासाठी खेड्यापाड्यांतील मंडळी मुंबईला जात. तिथे कामाला तोटा नसायचा. मुंबईत राबायचे. पैसे मिळवायचे, गावाला संसारासाठी पाठवायचे अशी त्यावेळी जगण्याची रीत होती. बापूरावांच्या मनात मुंबईला जावे असे आले. तिथे काहीही करता येईल. पैसे कमावता येतील अशी आकांक्षा धरून बापूरावांनी घराचा निरोप घेतला. मुंबई गाठली.

'तमाशावर कुबेर होईन' अशीही बापूरावांच्या अंतर्मनाची पक्की जाण होती. पुढे त्यांनी एका लावणीत आपल्या मनाची द्विधा अवस्था चित्रित केली आहे,

*'लग्न लावले कुटुंब केले।*
*कळत असोनी टाकली उडी*
*पायात बेडी बळे अडकवली*
*येऊन बसल्या बारा नडी।*
*दिल्या झुगारुनी सगळ्या एकीकडे रुसले खेळगडी।'*

# ४. मुंबई नगरी बडी बाका

बापूरावांनी घर सोडले. गाव मागे टाकला. अफाट मुंबईत पाऊल टाकले. पण इथे कोणी ना ओळखीचे, ना पाळखीचे. आपल्याला काम कसे मिळणार याचीच चिंता त्यांना लागली. त्यांनी एका लावणीत आपली यावेळची स्थिती चित्रित केली आहे,

*'चाळीस दिवस केले उपोषण।*
*भूक लागेना रतीएवढी ।'*

बापूरावांची अवस्था विचित्र झाली. काय करावे कळेना. काळजी ग्रासू लागली. कसला आधार सापडत नव्हता. पण 'नशीब काढायचे तर ते मुंबईतच' असा त्यांचा ठाम निर्धार होता. शेवटी त्यांची अंगभूत कलाच त्यांना चैन पडू देईना. त्यांनी तमाशा थिएटरांचा शोध घेतला आणि बापूरावांनी तमाशा जवळ केला.

त्याकाळी मुंबईत बांगडीवाला थिएटर व पिला हाऊस येथे तमाशा फड चालत. एल्फिन्स्टन थिएटर येथे भेदिक तमाशाच्या लढतींची चलती होती. शाहिरांमध्ये कलगीवाले आणि तुरावाले असे भेद असत. ब्रह्म आणि माया या आध्यात्मिकावरून हे दोन तट पडले होते. आध्यात्मातील कूट प्रश्न तमासगीर एकमेकाला टाकीत. त्यात जो जिंकेल त्याला 'फेटा' बक्षीस मिळे. त्याचे नाव होई. गावाकडचे तमासगीर मुंबईला येत. लढतीत भाग घेत. या लढती तिकीट लावून होत. जंगी लढतीच्या जाहिराती मोक्याच्या आणि नाक्याच्या ठिकाणी लावल्या जात. अशा लढती लावणारे ठराविक ठेकेदार होते. त्यात आशन्ना कामाठी, किसनदादा गवळी यांचे नाव प्रामुख्याने असे. बापूराव या दोघांना भेटले. दोघांकडे त्यांनी काम केले. त्यावेळी महार, मांग यांचे फड असत. तमाशाचे छंदी असलेले मराठा गडीही तमाशात असत, पण हे सारे अडाणी, अशिक्षित असत. आपल्या मगदुराप्रमाणे ते लावण्या रचीत. बापूराव तर इंग्रजी बुके शिकलेले होते. संस्कृतचे ज्ञान होते. मराठी

तर त्यांच्या रसवंतीवर लुभावलेली. वाचनाचा छंद तर पूर्वापार असलेला. नवी नवी कवने रचण्यात पटाईत असलेल्या बापूरावांच्या लावण्यांनी लोकांवर मोहिनी घातली. बापूराव कलगीवाले होते. ते कवनात आणि शाहिरीत सरस ठरत गेले. त्यांनी म्हटलेय,

*'आम्ही कलगीचे नागेशवळीचे आमचा आखाडा कृष्णा थडी।*
*गाव आमचे रेठरे हरणाक्ष जंगली बुवाची लागे गुढी।'*

असे सुशिक्षित पठ्ठे बापूराव. त्यांची सरशी व्हायचीच. प्रतिस्पर्धी असलेल्या तमासगिराला ते सवाल-जवाबात कोंडीत पकडीत,

*'राजमान्य राजश्री गाणार तुरेवाले कवी उठा उठा*
*पठ्ठे बापूराव आम्ही कलगीवाले आलो, आम्हासंगे जरा झटा।*
*वेदशास्त्र आणि पुराणे वर्जुनी भलतीच वटावटा*
*खुटा लागेल पाठीमागं, मग खरोखर पाडू तुझा पिठा।*
*दूध म्हणोनी ताक भुरकू नको जिभळ्या चाटून मटा मटा*
*पठ्ठे बापूराव म्हणे आज खटला आणू अंगावर तुझ्या उलटा।'*

हजरजबाबीपणा आणि शीघ्र कवित्वामुळे व नित्य नव्या रचनांमुळे पठ्ठे बापूरावांचे नाव सर्वत्र गाजू लागले. बापूरावांचा गळाही सुरेल होता. हातात डफ घेऊन बापूराव चढ्या सूरात गावू लागले की, बघे देहभान विसरून ऐकत. 'शाब्बास पठ्ठे' म्हणत.

बापूरावांना सूर सापडला होता. तमाशाप्रेमिकांची नस गवसली होती. त्यांची प्रतिभा बहरू लागली. आता त्यांनी आपल्या नावाची पताका फडफडत ठेवली. आजपर्यंत जपलेले स्वप्न पुरे होऊ लागले होते. त्यांच्या कवित्वाचा घोडा आता चौखूर उधळू लागला होता. आपल्या एका कवनात ते मोठ्या आत्मविश्वासाने लिहितात,

*'पठ्ठे बापूराव कविचा घोडा, शामकर्ण आज सुटला खरा*
*तुरेवाल्यांच्या चला पोरांनो, कुणी तरी घेऊन बघू धरा।'*
*तीन ताळ आणि सप्त पाताळी। घोडा उधळे चौखुरा।*
*एकवीस स्वर्ग उडून गेला। कुठे उभा राहिना जरा।'*

मुंबई नगरीत त्यांनी जोषपूर्ण कवित्वाचा तुरा मिरवला होता. त्यांचा घोडा कुणीही आवरू शकणारे नव्हते. या यशाच्या कैफात पठ्ठे बापूरावांच्या शाहिरीला चढती कमान लाभत गेली. त्या धुंदीत ते 'छकड्याची लावणी'

या लावणीत म्हणतात,

*पशुपक्ष्यांत सवाई तो खगिंद्र*
*देवादिकात राजा तो इंद्र*
*जसे तेज आहे पौर्णिमेचा चंद्र*
*तसा पठ्ठे बापूराव*
*गाडीवान फाकडा !'*

असा 'फाकडा' लोकशाहीर तमाशाशौकिनांना लाभला होता. त्यांचा तमाशा पहायला अलोट गर्दी होई. झुंडीच्या झुंडी येत. असे बहरात असताना पठ्ठे बापूराव आपल्या *'देशाची लावणी'*त हौसेने लिहितात,

*'ऐक बाई, आमच्या देशाची राहाणी*
*हिऱ्या मोत्यांच्या चहुकडे खाणी*
*इंद्रनील लाल पाचूचे मणी*
*रत्नगाव सोनी गं।*
*मोठमोठ्या सोन्याच्या माड्या*
*सोन्याच्याच गं चुली घरोघरी।*
*चांदी सदा पडती गं रस्त्यावरी ॥'*

अशा गावात राहाणारा गालुरीचा फंची आपल्या वाड्याचे वर्णन करतो,

*'आमच्या वाड्याला। खिडक्या सव्वा लाख*
*सभोवती झुरके राखले गं कैक।*
*चौदा चौकाला नक्षी खांब एक*
*एकवीस ताळे बांधले कारागिरांनी।*
*एक वीतभर आभाळ राहाते*
*वाड्यापासून जी।'*

असा लावणीत सोन्याचा पाऊस पाडणाऱ्या, सोन्याच्या माडीच्या गावाचा हा धनी. पठ्ठे बापूरावांचा रुबाबही तसाच होता. त्यांचा पोषाख संस्थानिकासारखा थाटाचा असे. पायात शिंदेशाही जोडा, नेसण्यास उत्तम करवत काठी धोतर, शोभून दिसणारा आलपाकाचा लांब काळा कोट, डोक्यास मंदिलवजा जरीचा मोतीचूर पटका. या पटक्याची किंमत त्याकाळी दोनशे-अडीचशे रुपयांची असे. अंगावर रेशमी उपरणे, हातात पाच-सहा सोन्याच्या अंगठ्या, झळकणारे सोन्याचे कडे, हातात जहागीरदार घालीत अशी सोन्याची सलकडी. असा

थाटमाट पठ्ठे बापूरावांचा असे. उंचे-पुरे, धारदार नाकाचे, स्नेहशील नजरेचे, गोऱ्या कांतीचे, पिळदार शरीराचे, देखणे बापूराव नजरेत नी मनात भरणारे होते. चालणे तडक आणि वाणी मोहक होती. अशा ऐटीत बापूराव तमाशाच्या फडात हातात डफ घेऊन उभे राहिले की लोकांची मने जिंकीत. पैशाचा पाऊस पडायचा. पण आजचा पैसा उद्या पहायचा नाही, शिळ्या पैशाचे तोंड पाहायचे नाही असा त्यांचा पण होता. त्यांना सोने घेण्याचा छंद होता. चार पदरी करगोट्याला सोन्याचा अंगठ्या आणि सोन्याचा गिन्न्या लटकत असत. त्यांचा आहारही मोठा होता. त्यांनी दोन काळी कुत्री पाळली होती. त्या कुत्र्यांचाच खर्च त्याकाळी दोन-तीन रुपये रोज होता. ते धार्मिकपणातही खर्च करीत. नडल्याअडलेल्या व्यावसायिकाला ते मदत करीत. असा सारा थाट पठ्ठे बापूरावांचा ऐन भरातला होता.

पठ्ठे बापूरावांच्या ऐन धुंदीच्या काळात सौंदर्यसम्राज्ञी नामचंद पवळा त्यांना भेटली. एका चुरशीच्या सामन्यात लावण्यवती नृत्यांगना पवळाला बापूरावांनी जिंकली. दोघांचा मिळून तमाशाचा फड उभा राहिला. तमाशा कलेला नवा बहर आला. हजरजबाबीपणा, शीघ्रकवित्व आणि नित्य नव्या रचनांमुळे पठ्ठे बापूरावांचे कवित्व फुलले. गोरी कांती, सुंदर सुडौल बांधा, सुरेल गळा, वीजेप्रमाणे चमकणारे मोहक नृत्य, लाखात एक अशी देखणी पवळा असल्यामुळे तमाशा या अस्सल कलेला वैभवाचे दिवस पाहायला मिळाले. पठ्ठे बापूराव पवळाच्या रूपावर आणि बिजलीसारख्या नृत्यावर मोहित झाले, तर पवळा पठ्ठे बापूरावांच्या प्रतिभेवर लुब्ध झाली. या जोडीचा तमाशा फड अपूर्व यशक्रांतीच्या कळसावर पोचला.

पवळाचे मूळ गाव पावसे हिवरगाव. हे गाव अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात येते. तेथील तानाजी भालेराव व रेऊबाई यांच्या पोटी दि. १२-८-१९७० रोजी पवळाचा जन्म झाला. वडिलांची घरची अत्यंत गरीब परिस्थिती. मोलमजुरीवर पोट चाले. खंडेरायाला नवस केल्याने रेऊबाई सुखरूप बाळंत झाली. नवसात बोलल्याप्रमाणे पवळाला खंडेरायाची 'मुरळी' म्हणून देवाशी लग्न लावले. देवदासीपण नशिबी आले. पवळाचा गोड गळा आणि चापल्य पाहून वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षी नाच व गाणे शिकण्यासाठी पवळाला बहिणीच्या गावी वाघापूर येथे पाठविली. हरीबाबा घोलप यांच्याकडे ती नाचगाणे शिकली. हरीबाबा यांच्या तमाशा फडात तिने प्रथम श्रीगणेशा केला. त्या काळात तमाशात नाचण्यासाठी स्त्रिया नसत. सुंदर पोरे असत. त्यांना नाचे म्हणत. सुंदर, देखणी कोवळी, चांगल्या गळ्याची पोरे हे काम

करीत. स्त्रियांचा परिवेष चढविला, अंगावर स्त्रियांचे दागदागिने घातले की पोरे नृत्यांगनाच वाटत. मूर्तिमंत स्त्रियाच. हरिबाबाच्या तमाशात पवळा नाचू लागल्यावर त्याच्या तमाशाची कीर्ती चौमुलखी वाढली. पण हरिबाबा घोलप यांना काहीशी उपरती झाली. त्यांनी तमाशा बंद केला. कीर्तनकार बनले. मग पवळा नामा धुलवडकर यांच्या तमाशात गेली. तो फडही गाजत राहिला.

नाना धुलवडकराचा तमाशा पवळासह मुंबईला आला. आणि तिथेही पवळामुळे तो प्रसिद्धीस आला. त्यावेळी मुंबईत आणि अन्यत्र नामवंत तमासगीर मराठी मातीतल्या रसिकांचे रंजन करीत. त्यांपैकी - (१) शिवा संभा कौलारकर, (२) धोंडिबा वचपेकर, (३) दगडू कोंडिबा साळी, (४) हरी किवळेकर, (५) अर्जुना वाघोलीकर, (६) खंडू शिवणेकर, (७) तात्या वाल्हेकर, (८) नामा धुलवडकर, (९) शिवा तासगावकर, (१०) सुभाना कोल्हारकर, (११) कोंडीबा येनेरीकर, (१२) सावळा महागावकर, (१३) आवजी कृष्णा बनपुरीकर, (१४) भागू नागू माळी, (१५) हरी तळेगावकर, (१६) केसनंदकर, (१७) भाऊ फक्कड, (१९) शंकरराव औसरीकर, (२०) रघू इंदुरीकर इत्यादी तमासगीर होते.

मुंबईत भाऊ फक्कड, सुभानराव कोल्हटकर आणि पठ्ठे बापूराव यांचे तमाशे विशेषत: लोकप्रिय होते. परंतु यांच्या तमाशात स्त्रीची भूमिका करणारे पुरुष नाचेच होते. नामा धुलवडकरांच्या तमाशात मात्र पवळा ही लावण्यवती पहिलीच स्त्री म्हणून तमाशात नृत्य आणि गायनासाठी होती. महाराष्ट्रातील पहिली स्त्री पवळाच्या रूपाने मराठी तमाशा कलेला मिळाली. नामा धुलवडकराचा तमाशा त्यामुळे लोकांच्या आवडीचा झाला होता. लोकप्रिय ठरला होता.

तमाशा कलेलाच भाळलेल्या आणि आता याच साजीवंत लोककलेला वाहून घेतलेल्या पठ्ठे बापूरावांच्या नजरेत ही नृत्यांगना बसली. मनात ठसली. अपूर्व असा योग जुळून आला आणि रूपसुंदरी पवळा व शीघ्रकवी पठ्ठे बापूराव यांच्या दृष्ट लागेल अशा जोडीमुळे तमाशा कलेला नवे बाळसे आले. नवा रसरशीत बाज लाभला. लावणी खऱ्या अर्थाने नटरंगी बनली तीही इथूनच.

जिचे लावण्य आणि तारुण्य पाहून कुणालाही चळ भरेल अशी पवळा पाहून पठ्ठे बापूरावांसारख्या प्रतिभावंताला भुरळ न पाडील तर नवल! पठ्ठे बापूरावांचे कवित्व बहराला आले. पवळाला पाहून त्यांनी अनेक लावण्या लिहिल्या. उदाहरणार्थ,

*'लाखो बायकांत खरी ग देखणी*
*तुझ्या ग वानी आम्ही नाही पाहिली कोणी ग'*

तसेच

*'लाखो बायंकामध्ये नखरेदार असा डौलदार बांधा तुझा हेरला ग।*
*तुला पाहून चळ भरला।*
*असे वाटते मला इंद्रपुरीचा नमुना खास अवतरला।'*

*'तू गं कोणाची सुंदरी। मदनमंजरी।'*

*'तीन तालाच्या माडीवरती सुंदरा एक दिसली*
*हातात ऐना केस मोकळे रूप न्याहाळीत बसली।'*
*'नव खंडामध्ये नाही पाहिली सुरत असे कोठे असली।'*

अशा कितीतरी लावण्या पठ्ठे बापूरावांच्या लेखणीतून उतरल्या. 'स्वरूप-चित्रिणी' आणि 'कोमल-गात्रिणी' असलेल्या पवळा व शृगांरिक कवने लिहिण्यात ज्यांची लेखणी सरस होती त्या पठ्ठे बापूरावांचा हा तमाशा फड वैभवाच्या शिखरावर पोचला. तमाशाला अलोट गर्दी जमे. पठ्ठे बापूरावांना दिगंत कीर्ती मिळाली. अमाप पैसा लाभला. खऱ्या अर्थाने तो पवळा-पठ्ठे बापूरावांचा सुवर्ण काळ होता.

एकदा लिहिलेली लावणी पुन्हा म्हणायची नाही, लावणी लिहिण्यासाठी कागदावर टेकलेली लेखणी लावणी लिहून संपल्याशिवाय उचलायची नाही; शिळ्या पैशाचे तोंड पाहायचे नाही असा पण पठ्ठे बापूरावांचा होता. त्यामुळे रोज नव्या रचना, नवी कवने रसिकांना अनुभवायला मिळत.

पवळाचाही थाट आणि ऐट अशीच होती. नऊ वारी जरीची रेशमी पैठणी नेसे. पायात शिंदेशाही चांदीचे तोडे, गळ्यात सोन्याचे विविध अलंकार, दंडात सोन्याचे बाजूबंद, कानात सोन्याची कर्णफुले, हातामध्ये सोन्याचे गोखरू, बांगड्या, बोटात सोन्याची अंगठी, नाकात चमकी, वेणीत सोन्याचा गोफ अशी सोन्याने पिवळी झालेली, रंभाराणीसारखी शोभणारी पवळा असे. पावसाळ्यात ती मुंबईहून हिवरगावला जात असे. ती खास आपल्यासाठी बनविलेल्या छकड्यातून संगमनेरहून हिवरगावला जाई. त्या गाडीला मागे-पुढे पडदे लावलेले असत. तिने गावी शेतमळा घेतला होता. तिथल्या बागेत ती मजेत राही.

पठ्ठे बापूरावांच्या शृगांरिक लावण्यांनी लोकांची मने जिंकलीच. शिवाय भेदिक लावण्यांतील चतुराईने चौरंगी, पंचरंगी सामनेही पठ्ठे बापूरावांनी जिंकले. इतर तमाशा फडावर परिणाम झाला. ते तमासगीर पठ्ठे बापूरावांचा मत्सर करू लागले. शिवाय पवळा व पठ्ठे बापूराव एकत्र राहातात, फिरतात यातून वेगवेगळे वादळ उठले.

# ५. कोर्टाची पायरी

पठ्ठे बापूराव ब्राह्मण. त्यांनी महार समाजातील पवळाला आपलेसे करून घेतले असे समज पसरू लागले. इतर महार व मराठा तमासगीर यांनी आपल्या समाजातील कलाकारांनी पठ्ठे बापूरावांच्या तमाशा फडात काम करू नये असे सांगितले. पिला हाऊसमध्ये झालेल्या एका रात्रीच्या बैठकीत हरीभाऊ किवलेकर म्हणाले,

'आपली मुख्य व देखणी नाचणारीन ब्राह्मणाने नेली, फितूर केली. तेव्हा आपल्या समाजातील (महार) लोकांनी पठ्ठे बापूरावाला साथ करू नये.'

नंतर भागुजी माळी बोलले,

'पठ्ठे बापूराव ब्राह्मणाचा महार झाला. जातीभ्रष्ट झाला. तरी त्याचे तमाशात इतर मराठी जातीने साथ देऊ नये. अशा माणसास वाळीत टाकावे.'

पठ्ठे बापूरावांच्या तमाशा फडाच्या विरोधात वातावरण तयार झाले. तो काळ जातीपाती मानण्याचा काळ होता. उच्चनीच भेदभाव मानणारा होता. साथ करणाऱ्या कलाकारांच्यावर याचा परिणाम झाला. कोणीही त्यांना साथ करायची नाही, असे ठरले. तसे प्रत्यक्षात घडू लागले.

ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. ठेकेदारांत चलबिचल झाली. काळजीचे ढग जमा झाले. पठ्ठे बापूरावांचा फड नसेल तर थिएटर्स चालणार कशी? असा प्रश्न उभा राहिला. हिराबाई परदेशी, हासमशेट बांगडीवाले, अबूशेठ यांनी पवळा व पठ्ठे बापूराव यांना विचारविनिमयासाठी थिएटरवर बोलावले. ही दोघेही कामाठी चाळीत ताईबाई परिंचेकर यांचेकडे राहात होते. तिघेही या थिएटरवर आले. त्यांना इतर तमासगिरांचा निर्णय सांगितला. हासमशेठ म्हणाले,

'शाहीर, हा वाद आता कसा मिटवायचा? कलाकार साथीला मिळत नसतील तर फड कसा उभा राहाणार?'

त्यावर पठ्ठे बापूराव म्हणाले,

'आम्ही आधी कलावंत आहोत. कलावंताला जात नसते. कोणताही ढोलकीवाला, कोणताही हालगीवाला, कोणताही सुरत्या अगर सोंगाड्या कोणत्याही तमाशा फडात चालतो की नाही?'

'चालतो.'

'एखाद्या मराठी तमासगिरास ढोलक्या नसला किंवा त्याचा ढोलक्या ऐन वेळी आजारी पडला, तर त्यास महार ढोलकीवाला चालतो की नाही?'

'होय, चालतो.'

'ऐन वेळेस गरजेला जात नसते आणि एक सांगतो, ह्यापुढे महार समाजात शिक्षण वाढेल. ज्ञान वाढेल. अशिक्षित जात सुशिक्षित होईल. शिक्षणामुळे, ज्ञानामुळे, हुद्द्यामुळे आपण होऊन या समाजाला सामावून घ्यावे लागेल. या अस्पृश्य समाजाला देवाची मंदिरेही खुली होतील - कलेमुळे, शिक्षणामुळे जातच राहाणार नाही. ब्राह्मणांनीच पोथी वाचावी, महारांनी वाचू नये असा भेद राहणार नाही. देव माणसांना, सर्व प्राणीमात्रांना जन्म देतो. त्याची सर्व लेकरे आहेत. देव सर्व जातीकरिता आहे.'

'पण आज उद्भवलेली परिस्थिती, तिची सोडवणूक कशी करायची? साथीदार नसतील तर तमाशा कसा चालणार?'

मराठा, महार या समाजातील साथीदारांनी बापूरावांचा तमाशा सोडला. फड विसकटला. खेळ होईनासे झाले. पठ्ठे बापूरावांचे सारे जीवन तर याच लोककलेवर. हौसेने जगण्याची संवय लागलेली. खर्च थांबत नव्हता. मुंबईसारख्या श्रीमंत नगरीत 'श्रीमंता'सारखे जगलेल्या पवळा व बापूरावांना कुचंबणेचे झाले. बटाट्याच्या चाळीचे मालक अबूशेठ हे त्यांना मदत करीत. पण त्या दोघांचा सढळ हाताचा खर्च त्यांनाही पेलवणारा नव्हता. ही सारी स्थिती बापूरावांच्या लक्षात आली. त्यांनी सारे कंत्राटदार व थिएटरवाले यांची बैठक बोलावली आणि निर्वाणीचा प्रश्न केला,

'आपण पवळाचे आणि माझे काय करणार आहात?'

सारे विचारात पडले. परिस्थिती बिकट झाली होती. साथीदारांविना फड उभा राहाणे अवघड झाले होते. किसनदादा गवळी, आशन्ना कामाठी, हिराबाई परदेशी व अबूशेठ यांनी बापूरावांना विचारले,

'फड बंद आहे. ठेके चालत नाहीत. तेव्हा आम्ही तुमच्यासाठी काय करावे?'

बापूराव म्हणाले,

'आम्हाला विकत तरी घ्या किंवा आमचा लिलाव करा.'

लोक विचारात पडले. एका कलावंताला आधार देण्यासाठी आणि कलेची कदर म्हणून पवळा व बापूराव यांचा लिलाव एल्फिन्स्टन थिएटरचे मालक अबूशेठ यांनी दरमहा ९०० रुपयांना विकत घेतला. खरे तर ही मोठी जोखीम होती. एक-दोन महिने गेले आणि या कलंदर कलावंतांचा खर्च त्यांनाही झेपेनासा झाला. यावर पठ्ठे बापूराव यांनी अबूशेठ यांना तोडगा सूचविला. म्हणाले, 'निव्वळ आम्हाला पाहण्यासाठी लोक उत्सुकतेने येतात. गर्दी करतात. तेव्हा खुल्या मैदानात एक तंबू ठोका. आम्हा उभयतांना पाहण्यासाठी दोन आणे दराची तिकिटे लावा. उत्पन्न मिळेल. आम्हाला पाहिल्याचे लोकांना समाधानही मिळेल.'

अबूशेठना हा सल्ला पटला. पवळाच्या लावण्याची ख्याती होतीच. पठ्ठे बापूरावही देखणे होते. दोघांचा नटूनथटून सजलेला जोडा दृष्ट लागेल असा होता. रती-मदनाचे जणू प्रतीकच.

अबूशेठनी तंबू ठोकला. तिकीट लावले. लोकांची प्रचंड गर्दी जमू लागली. रोज दोनशे ते चारशे रुपये उत्पन्न मिळू लागले. लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत. गर्दी वाढे. दाटीवाटीने माऱ्यामाऱ्याही होऊ लागल्या. बंदोबस्तासाठी पोलिस ठेवावे लागले.

पवळा व पठ्ठे बापूराव यांना बघण्यासाठी माणसांची गर्दी उसळे. झुंबड उठे. त्यातून दंगे होऊ लागले. मारामाऱ्या तर नित्याच्याच झाल्या. पोलिस चौकीत त्यांच्या नोंदी झाल्या. त्यात पठ्ठे बापूराव 'बाटला की न बाटला' यावर वादंग होऊ लागले. वादविवाद वाढत गेले. फिर्यादी झाल्या. अनेकांना शिक्षा झाल्या. शांतताभंगाची दखल घेण्यात आली. प्रकरण कोर्टाच्या पायरीपर्यंत पोचले. पवळा व पठ्ठे बापूराव यांना कोर्टातून समन्स आले, 'तुमच्यामुळे शांतताभंग होत आहे. तुम्हाला हद्दपार का करू नये?'

कोर्टाची तारीख लागली. ही बातमी सर्वत्र पसरली. वर्तमानपत्रांतून पवळा व पठ्ठे बापूराव यांची नावे चमकू लागली. त्यांची नावे गाजू लागली. लोकांत विलक्षण उत्सुकता निर्माण झाली. अवघी मुंबई दुमदुमू लागली.

तो ११-१०-१९०५चा दिवस होता. लोकांच्यामध्ये प्रचंड कुतूहल निर्माण झाले होते. अवघ्या मुंबईचे लक्ष या केसकडे लागले होते. प्रत्यक्ष या दिवशी तर लोकांच्या झुंडीच्या झुंडी कोर्टात येऊ लागल्या. सगळा आवार माणसांनी फुलून गेला. चार ते पाच हजारापर्यंत जनसमुदाय उपस्थित होता. शिवाय पठ्ठे बापूरावांचे चाहते श्रीमंत सावकार, कायदेतज्ज्ञ यांची रीघ लागली होती. व्यापारी वर्गात, पारशी समाजातही पठ्ठे बापूरावांचे नाव होते. ते सर्व खर्च करायला तयार होते. फी न घेता वकीलपत्र स्वीकारायला अनेक वकील स्वखुषीने पुढे आले होते.

कोर्टाची वेळ झाली. बरोबर अकरा वाजता एक बग्गी कोर्टाच्या आवारात आली. तिच्यातून पवळा व पठ्ठे बापूराव उतरताच सर्वत्र जिज्ञासा दाटून राहिली. दोघे कोर्टातल्या बाकावर जाऊन बसले. वकीलपत्र घेण्यासाठी अनेकजण बापूरावांकडे आले. पण बापूराव म्हणाले,

'आम्ही स्वत: आमची केस चालविणार.'

लोकांना आश्चर्य वाटले. बापूरावांचा आत्मविश्वास मोठा होता. आपल्या हजरजबाबीपणामुळे मराठी मनाला वेड लावणाऱ्या पठ्ठे बापूरावांना कोर्टातलाही फड जिंकायचा होता. थोड्या वेळातच मॅजिस्ट्रेटसाहेबांची व्हिक्टोरिया कोर्टाच्या दारात आली. प्रचंड गर्दीमुळे त्यांना पायीच कोर्टात जावे लागले.

पवळाला व पठ्ठे बापूराव यांना कोर्टाने स्वत:च्या चेंबरमध्ये बोलाविले. तेव्हा बापूराव म्हणाले,

'केस चालवायची असेल तर सर्वांसमक्ष चालवावी अशी आमची विनंती आहे.'

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी ते मान्य केले. सर्वांपुढे केस सुरू झाली. मॅजिस्ट्रेटसाहेबांनी विचारले,

'तुला पठ्ठे बापूराव का म्हणतात?'

'माझे कवित्व लोकांना आवडते. ते शाबासकी देतात. कौतुकाने पठ्ठे बापूराव म्हणतात. म्हणून मी माझ्या कवनातही पठ्ठे बापूराव असे नाव लावतो. भेदिक लावण्यात मला मोठमोठाली बक्षिसे मिळत. त्यामुळे लोकांनीच स्वखुषीने ही पदवी दिली आहे.'

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी पुढे प्रश्न केला,

'बाटलास की नाही यावरून तुझ्यासाठी बऱ्याच मारामाऱ्या होतात हे ऐकून आहेस की नाही?'

या प्रश्नाने पठ्ठे बापूराव गप्पच राहिले. उत्तर दिले नाही.

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी परत प्रश्न केला. त्यावर पठ्ठे बापूराव स्वाभिमानाने म्हणाले,

'मी चांगला सुशिक्षित आहे. शिवाय माझ्या नावापुढे सुप्रसिद्ध अशी अक्षरे असता, आपण मला अरे, तुरे म्हणू नये असे माझे म्हणणे आहे. असे असेल तर मी कोर्टाला उत्तर देईन.' मॅजिस्ट्रेटसाहेबांनी क्षणभर विचार केला. बापूरावांचे म्हणणे त्यांना काहीसे पटले. नंतर ते म्हणाले,

'ठीक आहे. बोला.'

मग बापूराव म्हणाले,

'वाद आहे तो मी बाटलो की नाही याचा. मी उत्तर देईन. पण इथे नाही.'

'मग कुठे?'

'आपल्याला माझी विनंती आहे. आपण पिला हाऊसला माझी बारी बघायला यावे. तिथे योग्य असे उत्तर मला देता येईल.' मॅजिस्ट्रेटसाहेबांनी ज्युरींना विचारले. त्यांचा विचारविनिमय झाला. पठ्ठे बापूराव यांनी केलेली विनंती ज्युरींनी मान्य केली.

लोकांत उत्साह भरला. थिएटरवर पठ्ठे बापूराव व पवळा कोर्टाला तमाशाच्या खेळातून उत्तर देणार अशी बातमी सगळीकडे पसरली. दिवस ठरला. खेळाची तिकिटे जादा पैसे देऊनही मिळेनाशी झाली. शौकिनांची तुडुंब गर्दी झाली.

स्वत: कोर्ट आणि ज्युरी उपस्थित राहिले.

व्यासपीठावरचा पडदा बाजूला झाला. पवळाला आणि पठ्ठे बापूराव या आपल्या आवडत्या जोडीला पाहून प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. पठ्ठे बापूराव व पवळा यांचा आज थाटमाट काही निराळाच होता. पठ्ठे बापूरावांनी डफावर थाप मारली आणि म्हणाले,

'मित्रहो, राम राम. आज आपण निव्वळ तमाशा पाहण्यासाठी आला

असाल तर क्षमा करा. पैसे परत घेऊन जा. आज मी मनातली मळमळ बोलून दाखविणार आहे.'

'मी ब्राह्मण आहे आणि पवळाबाई ही जातीनं महार आहे. आम्ही एकाच तमाशा फडात एकत्र काम करीत आहोत. पण पवळाने मला बाटविले असे म्हणण्यात येते हे खरे नाही. तर पवळाबाईच्या लावण्यावर व नाचगाण्यावर खूष होऊन ब्राह्मणत्व झुगारून देऊन मीच महार झालो आहे. खरे कलावंत जातपात मानत नाहीत. पण तमाशाला ते भावत नाही. यास्तव मी आपल्यापुढे माझ्या आयुष्यात खरोखर घडलेली गोष्ट या रंगमंचावर सांगणार आहे. माझे जीवनचरित्र सांगणार आहे. बाटलो की नाही बाटलो याचा उलगडा जाणते जाणतीलच.'

'सांगा बापूराव, सांगा.'

पठ्ठे बापूरावांची थाप डफावर कडाडली.

प्रारंभालाच श्री गणेशाला नमन केले.

गण गायिला.

*'हे गजवदना। नाचत ये रणसदना।*
*शुर्पकर्णा-हिरण्यावर्णा भक्तपदीर्णा*
*मंगलचरणा। भवभयहरणा।*
*अपर्णेच्या द्वितीय तू नंदना॥ १ ॥*

*ऋद्धीसिद्धीचा गण म्या पूजिला*
*अर्धा ना कडेला, मधीना।*
*वाटे मनाला, तुझ्या गुणावर*
*दर दीना। ओवाळू कोटी मदना!'*

*जडाव केला नव नटरंगा*
*नव्हे खटारा पुदीणा*
*पठ्ठे बापूराव म्हणे ऐकला का।*
*समुद्र, ह्या सगळ्या ओढ्या वगळी न दिना!'*

हलगी कडकडली. पवळाच्या नाजूक पायातील घुंगरांचा झणत्कार झाला आणि पठ्ठे बापूरावांनी गौळणीचा रंग चढविला. वाद्यांचा सूरमेळ जमला. मग एक सुंदर फार्स सादर केला. फार्सचं नाव होतं, 'एका तेल्याचा मेलेला

बैल.’ फार्साची रंगत संपते न संपते, तो पठ्ठे बापूरावांच्या कवनाने गांभीर्याचे वळण घेतले. तोडा बदलला.

‘ऐका मंडळी’ म्हणून गंभीर वातावरणात पठ्ठे बापूरावांनी शीघ्रकाव्य सादर केले.

*‘श्रेष्ठ वर्ण मी ब्राह्मण असुनी। सोवळे ठेवले घालून घडी*
*मशाल धरली हाती तमाशाची। लाज लाविली देशोधडी।’*

*इंद्रचंद्रऋषी हा पहिला। गेला अहिल्येच्या महालाला*
*भगे पडली त्या इंद्राला। चंद्राला जी।*
*कलीयुगाचा ऐका दाखला। पठ्ठे बापूराव भुलला पवळीला*
*महाराणीसाठी महार झाला। पुन्हा जात मिळेल का हो त्याला*
*ब्राह्मणाला हो जी जी.।’*

बापूराव समोरच्या प्रेक्षकांना उद्देशून म्हणाले,

‘इंद्राच्या दरबारात, चंद्राने चहाडी केली, म्हणून तो कलंकित झाला. त्याला डाग लागला. वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांनी कितीही वेद म्हटले तरी चंद्राचा डाग थोडाच धुवून जाणार? तद्वत मी ब्राह्मणाचा महार झाल्यावर मला माझी जात कशी मिळेल? नाही ना? मग मी महार झालो ते ठीक आहे?’

असे ते निश्चयपूर्वक बोलले. त्यांच्या बोलण्यात, शब्दाशब्दात प्रामाणिकपणा होता. प्रांजळ भाव होता. त्यांनी सगळे रोखठोक सांगून टाकले. प्रेक्षकही ऐकतच राहिले.

एवढे सांगितल्यानंतर त्यांनी *‘लग्नाची लावणी’* म्हटली,

*‘लग्न लागले माझे। भवले अंगणी साजे।*
*दारी चौघडा ग वाजे। डंका छान छान छान।*
*मंडपी आणली नवरी। तीन वेळा फिरवी भवरी।*
*शंभूला शोभे गवरी। गोरी पान पान पान।*
*मंत्राचे तांदूळ पडले। नगाऱ्यावर टिपरू झडले*
*फुलबाजे, भुईनळे उडाले। गगनी बाण बाण बाण!*
*हळदीचे पिवळे अंग। माझ्या ग गडणी माझ्या संगं*
*पिचकऱ्या खेळू रंग। चिपळ्या तान तान तान।*
*घामाने साडी भिजली। गुलालात मैना बुझली*

*जणू अंबरी खेळे बिजली। तरणी जान जान जान।*
*हत्ती घोडे पालखी मेणा। संगे घेऊन चतूर सेना*
*राघूला शोभे मैना। जोडा छान छान छान!*
*म्हणे पठ्ठे बापूराव। घे नथीला सरजा लाव*
*गुज मनातलं सांगावं। माझी आन आन आन।*

'लग्न सोहळ्या'ची लावणी संपल्यावर रंगमंचावर दोन पाट मांडले. त्या पाटावर पवळा व पठ्ठे बापूराव समोरासमोर बसले. ठरल्याप्रमाणे आतून शिजलेल्या भाताचे ताट आले. त्या ताटातील भाताचा एक घास पवळाने उचलला आणि आपल्या हाताने बापूरावांना भरविला.

सारे थिएटर थरारून गेले. रंगमंचावर जे घडत होते ते विलक्षण होते. वेगळं होतं. वास्तव होतं. कलंदर कलावंतांना आणि कलेला जात नसते हेच यातून स्पष्ट झालं.

कोर्ट समजायचं ते समजलं.

जाणत्यांनी जाणायचं ते जाणलं.

प्रेक्षकांना समजायला हवं होतं ते समजलं.

काहींना आवडलं, काहींना आवडलं नाही.

'बाटवलेपणा'ची केस काढून टाकण्यात आली. या कोर्ट प्रकरणामुळं पवळा व पठ्ठे बापूरावांना खूपच प्रसिद्धी मिळाली.

प्रकाशाच्या झोतात आलेल्या या नामांकित जोडीनं पुन्हा तमाशाचा फड उभा केला. महार कलाकार आणि साथीदार त्यांना येऊन मिळाले. नव्याने जम बसला. खेळ रंगू लागले. फड गाजू लागले. पवळाच्या लसलसत्या नृत्यनिपुण लावण्यानं आणि पठ्ठे बापूरावांच्या धुंदफुंद लावण्यांनी रसिकांना वेड लावलं. याच काळात पवळाला घेऊन पठ्ठे बापूराव यांनी व्हिक्टोरियातून मुंबई पाहिली आणि त्यांनी मुंबईचं वर्णन करणारी अप्रतिम अशी *'मुंबईची लावणी'*, लिहिली.

पठ्ठे बापूरावांच्या म्हणण्याप्रमाणे सदा तरणी असलेल्या मुंबई नगरीतील सर्व प्रेक्षणीय, रमणीय आणि लक्षणीय असलेल्या स्थळांची बहारदार वर्णने या लावणीत केली आहेत. जातपात गुंडाळून ठेवून तमाशा कलेसाठी वाहून घेतलेल्या या कलावंताने अशी *'दुसरी रावणाची लंका'* असलेली मुंबई

पवळाला खरेदी करून देण्याची ऐश्वर्यशाली भाषा केली आहे. या लावणीवर तर मुंबईवर जीव टाकणाऱ्या रसिकांनी आपली बेहद्द खुषी व्यक्त केली. दौलतजादाचा वर्षाव होत असे. शोकीन पारशी लोकांनी व फ्रूट मार्केटमधल्या व्यापाऱ्यांनी पैसे, मोहरा, सोन्याच्या अंगठ्या, सोन्याच्या गिन्या यांचा रंगमंचावर पाऊस पाडला.

## मुंबईची लावणी

मुंबई नगरी बडी बाका। जशी रावणाची दुसरी लंका। वाजतो डंका॥
डंका चहू मुलकी-राह्याला गुलाबाचे फुलकी पाहिली मुंबई॥१॥ धृ॥
मुंबई नगरी सदा तरणी। व्यापार चाले मन भरूनी दर्याच्या वरूनी॥
वरूनी झाजे फिरती-आगबोटीची निराळी धरती॥ २॥ धृ॥
मुंबई नगरी गुलहौशी। आल्यागेल्याची खरीं काशी नित्य नवी फांशी॥
फासाला कैदी चढतो-टांकसाळत पैसा झडतो॥ ३॥ धृ॥
मुंबईशहरी नाकेबंदी। बारा कोसाची लांबीरुंदी। सैनाशिव बंदी॥
शिवबंदी बोट जाती। विलायताची खबर घेऊन येती॥ ४॥ धृ॥
मुंबईनगरी दर्यावरती। तिथं सारी मवाल्यांची गर्दी। असल खरा दर्दी
दर्दी ओढील पैका। नाही तर पोटाची शंका॥ ५॥ धृ॥
ह्या मुंबईची तऱ्हा न्यारी। नाक्यावर पोलीसांची फेरी।
करितो वारावारी॥
वारावारी दिनराती। गाडीत कैक खून होती॥ ६॥ धृ॥
पाहिली मुंबई सखे बाई। सवाई इंग्रजी बादशाही। कवी चतुराई॥
चतुराई शिंदेशाही। पठ्ठे बापूराव कवि गुणगाई॥ ७॥ धृ॥
(चाल) शिवू नको मुका दे दुरून। देतो मुंबई खरेदी करून॥ ८॥
(चाल) हे ग मुंबई बंदर। सगळ्या दुनियेत सुंदर।
छानदार हाल्लीच्या वेळी।
जणू दिवा ग (चाल) संध्याकाळी। चहूकडची हवा दिसे पिवळी।
भारी मजा॥
पिलहौसा जवळी पिलाहौसाजवळ चल राहू। थिएटरमध्ये जाऊ॥
तमाशा ग पाहू। जगाचा पोट भरूनी॥ ९॥
देतो मुंबई खरेदी करूनी॥ धृ॥

ही ग मुंबई नगरी। अगदी भरभर गुजरी। नळबाजार तूं राणी ग॥
तुझ्या ताब्यात सगळ्या कोळणी ग। रोज माव्हर देतील आणुनी ग॥
तुम्ही आमच्या पेढीवर बसा। कोणालाही पुसा। नावाचा माझ्या ठसा॥
फिरला तुझ्यावरूनी॥ १०॥ देतो मुंबई खरेदी करूनी॥ धृ॥
(चाल) देतो वाळकेश्वराचा डोंगर सगळाच तुला। अगं तुला।
कापच्या मैदानावरती दस्त घेतला अगं घेतला॥
ह्याशिवाय राणीचा बंगला हवालीच केला। अगं केला।
देतो ठाकूरद्वार सारं। बसून तांव काट्यावर। दावतो सराफाची
घरं तुला दुरूनी। देतो मुंबई खरेदी करूनी॥ ११॥
शिवू नको मुका दे दुरूनी। देतो मुंबई खरेदी करूनी॥

(चाल धुमाळी)

परळपासून सरळ रस्ता। भायखळ्याच्या पुलावरता। तिथून पुढे लागल खालता... उभा पारशी॥ सर जमशेटजी बाटलीवाला। ह्याचा दवाखाना तुला इनाम दिला निजायला बीन वारसी॥ १२॥

मोतीबाजार मुंबादेवी। भेंडीबाजार काळबादेवी। घ्यावी पायधुनीची फरशी। बोरीबंदर कोट किल्ला। कापाच्या मैदानातला॥ कमेटीचा बंगला देतो भेटी सरशी॥ १३॥

ताजमहाल प्यालेस हाटेल। तिथेच तुला भेटेल। त्यात वाटेल ती खा मेजवानी मजेदारशी॥ सेक्रेटरी हॉल। तुला काळा घोडा भाल। देतो कुलाब्याची लाल हवा थंड गारसी॥ १४॥

फारस रोड दारूसाठीं। भांगवाडी गांज्यासाठी। चंदनवाडी राहाण्यासाठी। दिली सरशी। बटाट्याची चाळ। तू कायम संभाळ। तिथे बांधूनी चाळ। मग ताल धरशी॥ १५॥

काळी चौकी लालवाडीं। सुपारीबाग ताडवाडी। आखंडबावडी कुईबावडी दिली खरेदी॥ बाजुबंद चंद्रहार। पानपोत पदर चार। सोनाराला घडायला दिली वर्दी॥ १६॥

ट्रामगाड्या मोटारगाड्या। हजार देतो खटार गाड्या। व्हिक्टोरिया थोड्या नव्या रंग जरदी॥ धनी माझा मोठा नारी काय तुला तोटा। एका झटक्यात करू आम्ही प्यादी फरदी॥ १७॥

वाडी बंदरी माल माझा। कुलाब्याला कापूस ताजा। फतरी बंदरावरती। फौजी अरब गारदी॥ काळ्या गोऱ्या पलटणी। लष्कराची दाटनी सैन्याची वाटणी होती एक सरशी॥ १८॥

तुझ्यासाठी झटापटी। आम्ही केल्या खटापटी। खऱ्या झाल्या वाटाघाटी। मानमर्दी। तुला मला नावं। ठेवतो सारा गाव। येता जाता। निंदा करती नारी नरदी॥ १९॥

साड्या चोळ्या काय कमी। मारवाड्यांनी घेतली हमी। बसून खावे खूप नामी बिन दर्दी॥ गोल पिट्टा बहाल तिथे नवा रंगमहाल॥ तुला खुतनीची लाल केली गादी गिरदी॥ २०॥ धृ.॥

सफेत गल्लीत राशील। तर किमतीने खाशील। आणि नामचंद होशील। मग तुझी जाईल सरदी। गुलाबी पावडर। तोंड धुवून लाव वर बस खुर्चीवर मग होईल गर्दी॥ २१॥ धृ.॥

बोरीबंदर मशीदबंदर। भायखिळा वाडीबंदर। माजगाव करीरोड चिंचपोकळी। येवढी स्टेशनं विकूनश्यानी। तुझ्या साडी-चोळीमागे। ताडवाडी आम्ही काल विकली॥ २२॥ धृ.॥

तुझ्यासाठी भली मोठी। तयार केली चौपाटी। गिरगांवच्या पाठीमाठी। जागा राखली। मुगभाट कांदेगल्ली। तुझ्यासाठी तयार केली। ग्रांटरोड कुलाब्याला रेल टाकली॥ २३॥ धृ.॥

जी.आय.पी., रेल्वे सारी। बी.बी.सी.आय, रेल दुसरी। आणखी ट्रामगाडी तिसरी। तुझ्या नांवे आखली॥ कमेटीचा सारा फाळा। मुंबईचा आला तेवढा तुझे नावे जमा केला बाकी चुकती॥ २४॥ धृ.॥

रियन थेटर साऱ्यांत मोठं। एलपिष्टन आहे धाकटं। मुंबई थेटर आहे छोटं। पण खूप नकली॥ व्हिक्टोरिया थेटर मोठं। कारोशान आहे धाकटं। राईल थेटर जळलं त्याची राख फेकली॥ २५॥ धृ.॥

गिरगांवची कांदेवाडी। विकून केली बाळी बुगढी। खेतवाडीवर नवं कर्ज काढलं। माजपट्टा कुलूप, चार। त्याला माणिक हिरवीगार। त्याच्याकरता टांकसाळंवर पाणी सोडलं॥ २६॥ धृ.॥

दारूखाना मदनपुरा । जिमखाना काझीपुरा । मोदीखाना कामटपुरा । गल्ल्या पंधरा । पवळीला राजमहाल । चंद्रीला ताजमहाल । हवाईला राणी केली दाणे बंदरा ॥ २७ ॥ धृ. ॥

स्वतंत्र वाडा बांधला । नानासाठी घोडा आणला । भिल्लिनीच्या किल्ला भोवती । खडा पाहारा । सुंदरीला सदरबाजार । मंदिराला खिडक्या हाजार । सभोवती कारंज्याच्या नीट धारा ॥ २८ ॥ धृ. ॥

पवळीला काळा घोडा । चंद्रीला पारशी खडा । हवाईला नागपाडा दिला राह्याला । माहीमचा हलवा । काय । चालवा । नानीच्या रतीबाला गोड खायाला ॥ २९ ॥ धृ. ॥

(चाल) त्या गोलपिट्यातील नारी खऱ्या पद्मिनी ।
आणि सफेत गल्लीतील अप्सरावानीं ॥ ३० ॥

पंजाबी, मिंदी, सुलतानी, मुसलमानी ।
यहुदिनी, चिनी, ऑफसानी, मिंधी गुजरणी ॥ ३१ ॥

त्यामधें कैक डंकीनी कैक शंकीनी ।
बंगाली तेलंगणी वाणी परभिनी ॥ ३२ ॥

ह्याशिवाय जपानी इंग्रजी आणि जर्मनी ।
माळणी साळणी तेली तांबोळणी ॥ ३३ ॥

कानडी मद्रासी आरबिनी सौदामिनी ।
आणि डंकनरोडवर त्या गे महारणी मांगिणी ॥ ३४ ॥

(चाल) तुला पुजायला देतो भुलेश्वर मुंबादेवी ।
पंचमुखी मारुती कालकाइंदेवी ॥ ३५ ॥

नवसाला पावली देवी सेवा तिची करावी ।
त्या काळ्या मारुतीला नित्य सांजवात लावी ॥ ३६ ॥

त्या घोलप देवाला खेटी रोज घालावी ।
कुलस्वामी आपली महालक्ष्मी ध्यानांत राहावी ॥ ३७ ॥

त्या शनीदेवाला तेलाची आंघोळ घालावी ।
त्या माया हाजनीला दर्ग्यात बत्ती लावावी ॥ ३८ ॥

त्या जंगली पिराला शेरा आणि धूप दावी।
भायखळ्याच्या म्हसोबाला साखर वाटीत फिरावी ॥ ३९ ॥

(चाल) - नारी जेकब सर्कल। तुला असल दखल। तिथे रस्ता चुकल। मग भकशील कोणत्या वाटेने ॥ तुला एकटीला मवाली गाठून। दागदागिने घेतील लुटून। तु ऐटीनें जाशील नटून। अवचीत उठून। कान तुझा काटून। लावतील पिटून। टाकतील वाटून। फेकतील मारून। देतो मुंबई खरेदी करून ॥ ४० ॥

(चाल) - कुलाब्याच्या दांडीवरती। तुझ्या नावाची बत्ती फिरली। नारी पाहिली तुला। चळ भरला मला। सव्वा महिना झाला। तुझ्या नादात खरोखर फसलो। कैक वेळां उपाशीच बसलो। येताजातां बायकोवर रुसलो ॥ ४१ ॥

(चाल) - दिला घडीमार। गेलं आंग हिरवेगार अगदी। मरणाला वार। अशी फणचीच्या रागाची धर्ती। रात्री जगती का आता मरती ॥ ४२ ॥

घे इनाम मुंबई नगरीच्या। गिरण्या साऱ्या।
रात्रभर ट्रामगाड्यां लोकलगाड्या करती येरझाऱ्या ॥ ४३ ॥

याशिवाय सुंदर हवेल्या। कोर्टातल्या कचेऱ्या।
चहूकडे शिमिटाच्या माड्या बांधल्या नाऱ्या ॥ ४५ ॥

तुझ्यासाठी मोटारगाड्या नेतील स्वाऱ्या ॥ ४६ ॥

वायरच्या गाड्या नवीन करी येरझाऱ्या (मुंबई नगरी) ॥ ४७ ॥

मुंबई नगरी भर भर गुजरी सारी नाटकशाळा ॥
झाशीमध्ये ऐंशी सहस्र राण्यांचा मेळा ॥ ४८ ॥

पुण्यामधें जुन्या कचेऱ्या हिशेब घ्या ताळा।
कलकत्त्याला माल संपला काला कित्ता सगळा ॥४९॥

साताऱ्याला आजीमतारा तिथे पहारा आगळा ॥
खुद्द राहाण्याचे ठिकाण कोल्हापूर गड आमचा पन्हाला ॥५०॥

भगवा झेंडा खुणेशी लाविला घ्या तुम्हीं पडताळा ॥
पठ्ठे बापूराव कवीची शाळा इंग्रजी टंकशाळा ॥५१॥ धृ ॥

# ६. शाहिरी दुमदुमे मराठी मुलखात

पठ्ठे बापूराव यांच्या तमाशा फडाने मुंबई तर जिंकलीच, शिवाय महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतून पठ्ठे बापूरावांची कवने भिरभिरू लागली. मराठी मुलखानं तमाशा कलेचा ऐन जोश अनुभवला. पठ्ठे बापूरावांचा हा ऐन वैभवाचा काळ होता.

पवळा-पठ्ठे बापूराव यांचा गाजत असलेला तमाशा फड पुण्याला आला. तिथं तर अफाट लोकप्रियता मिळाली. ज्या पुण्याने पेशवाईचे वैभव भोगले, विद्या आणि संस्कृतीची नगरी म्हणून ज्याचा नावलौकिक दुमदुमला, अनेक विद्वान पंडितांचे माहेरघर पुणे, जिथं अनेक शाहिरांची रसवंती रमली होती, त्या पुण्याने पठ्ठे बापूरावांच्या जीवनातील लोकविलक्षण काळ पाहिला. महाराष्ट्रात एकीकडे राजकीय क्षेत्रात लोकमान्य टिळक गाजत होते. दुसरीकडे राजमान्य बालगंधर्व सगळ्यांच्या गळ्यातील ताईत बनले होते. नाट्यक्षेत्रात राम गणेश गडकरी आपल्या नाटकांनी मराठी रंगभूमीला अलौकिक लौकिक मिळवून देत होते, त्याच काळात तमाशा या लोककलेचा राजा लोकशाहीर शीघ्रकवी पठ्ठे बापूराव मराठी मनावर अधिराज्य गाजवत होते.

पुण्यात तर पठ्ठे बापूरावांचा तमाशा फड ऐन रंगात आला. पुण्याने पेशवाईच्या काळात 'बैठ्या लावणीचे' तमाशे पाहिले. पण पठ्ठे बापूरावांच्या ढोलकीवरील तमाशाने, कलगी-तुऱ्याच्या ईर्षेबाज खेळांनी मात केली.

या पुण्यात त्या काळी इब्राहीम थिएटर, आर्यभूषण थिएटर, सतरंजीवाला चौक थिएटर ही थिएटरे गजबजून जात. खेडेगावातील शोकिन बैलगाड्या जुंपून येत. बैलगाड्यांच्या रांगाच्या रांगा लागत.

अर्जुना वाघोलीकर, दगडू साळी, शिवा कौलापूरकर, केसनंदकर आणि पठ्ठे बापूराव यांच्या चुरशी झडत. लढती होत. भेदिकाचे सवाल-जवाब रंगत. या खेळांच्या सामन्यासाठी इनाम ठेवले जाई. जिंकणाऱ्या कलावंताला रेशमी मंदिल, दोन तोळ्याची सलकडी, सोन्याच्या गिन्या बक्षीस मिळत. त्यावेळी

सोने १८ ते २० रु. तोळा होते. १५ रुपयांची सोन्याची गिनी असे. हे इनामाचे जिन्नस थिएटराच्या मुख्य दरवाजावर केळीचे खांब उभे करून त्यावर दहीहंडीसारखे बांधून ठेवीत. थिएटर गर्दीने फुलून जाई. सवाल-जवाबाच्या अभ्यासासाठी तमासगिरांच्याजवळ ग्रंथांची गोठोडी असत.

पठ्ठे बापूरावांचा ग्रंथाभ्यास दांडगा होता. त्यांनी या बहुश्रुततेच्या व खड्या शाहिरीच्या जोरावर आणि पवळाच्या नृत्यनिपुणतेच्या चापल्यावर अनेक सामने जिंकले. त्यांना अंगठ्यांच्या व गिन्यांच्या अगणित बिदाग्या मिळत.

पवळाच्या सहवासाने पठ्ठे बापूरावांचे कवित्व अधिकच खुलत होते. रोज नवी लावणी लेखणीतून उतरे. लय आणि प्रास यामुळे त्यांच्या लावण्या ढंगदार, रंगदार बनत. रंगबाजीच्या लावण्यांनी लोक वेडे होत. भेदिकात ओवलेल्या आध्यात्म्याने लोकांची मनं खुलून जात. त्यांच्या लावण्यांचे मुखडे महाराष्ट्रभर ज्याच्या त्याच्या मुखी होऊन गेले होते. इतर मुलखावरचे तमासगीर पठ्ठे बापूरावांच्या लावण्यांनी आपल्या तमाशात बहार उडवत.

त्या काळापासून आजपर्यंतही लोकांच्या तोंडी असलेले उदाहरणावजा मुखडे मुद्दाम नोंदवीत आहे.

*'शुभ मंगल चरणीं गण नाचला।'*  
*'लवकर यावे सिद्ध गणेशा। आतमधी कीर्तन वरून तमाशा।'*  
*'नको मक्का मदिना काशी। तुझा नारायण तुजपासी।'*  
*'तू ऐक नंदाच्या नारी। काल दुपारी, यमुनेच्या तिरी गं।'*  
*'सोळा हजारात देखणी।'*  
*'नंद गोकुळी छंद लागला नाद गौळणीचा गे*  
*आधी नारायण विष्णू ओंकार मी अवतार त्याचा गे।'*  
*'मुंबई नगरी बडी बाका'*  
*'गाडी आणावी भुरक्याची।'*  
*'ही नटरंगी नार। करी काळजात वार।'*  
*'लाखात अशी देखणी'*  
*'तू गं कोणाची मदनमंजरी।'*  
*'किती देवा, तू कठोर मनाचा। कोणाचे तू केले बरे।*  
*जे का तुझ्या भक्तीशी लागले तितुक्यांची बुडविली घरे।'*

*'दसरा गेला। दिवाळी आता येईल उद्या परवा।*
*राया मला जरतारी शालू। आणा पैठणचा हिरवा॥'*

पठ्ठे बापूराव यांनी लिहिलेली 'पुण्याची लावणी' ही ज्याच्या त्याच्या तोंडी झाली होती. ती अशी :

## पुण्याची लावणी

*आम्ही सातारवाले बनसी। नारी गोष्ट ऐक आमची।*
*बोलू का तुजला॥ पहिल्या झपाट्याला तुला येरोड्याचा तुरुंग दिल्यावर।*
*मुका घ्यायला हरकत कंची सांग मजला॥१॥*

*नवा जुना मोदीखाना। वानवडीला तोफखाना। जिमखाना सणासाठी*
*खेळायला॥ घोडेपीर नालपीर ताबूताचा कवड्या पीर। भोऱ्याचा डोला*
*चल जाऊं पाहयाला॥२॥*

*आईतवार पेठ। साऱ्या पुण्यांत घमघमाट। तिथुन मंडईच्या गेटापोत्तर*
*हद्द धरूनी॥ मार्किटचा रस्ता। पुढें जातो कसा कसा। देतो रास्त्याच्या*
*पेठेचाहि कागद करूनी॥३॥*

*तिथुन पुढें गोसावीपुरा। स्टेशनवरचा बाजार सारा। येरोड्याचा पसाराहि*
*देतो लिहूनी॥ चिंचवडच्या स्टेशनावरला। बांधुन ठेवला बंगला चांगला।*
*रंगमहाल तयार केला रंग देऊनी॥४॥*

*तुझ्यासाठी दाणेआळी। खरेदी केली संध्याकाळी। चोळखणाची गल्ली ती*
*पेठ भवानी॥ मोतीचौकापासुनी थेट। बुधवाराची गुजरी दाट।*
*शिवांय मीठगंज नीट दोरी लावुनी॥५॥*

*कसबा देतो कबजेगाहाण। नारायण पेठ तारण गाहाण। वेताळ पेठेवरती*
*देतो दस्त नवा॥ पाहून तुझी हूल। नारी मोठी झाली भूल।*
*तुला देतो लकडीपूल। तिथे चांगली हवा॥६॥*

*टेलीफोन करतील। चोर लोक धरतील। रात्री गव्हर्नरच्या बंगल्यावरती*
*लागला दिवा। मोटारगाड्या चालतील। यंत्रे माणसावाणी बोलतील।*
*आणखी निर्जीव चित्रें हालतील बघशील देखावा॥७॥*

*सदरबाजार पाहूं चला । लष्करात येऊ चला । वानवडीच्या मैदानात तळ द्यावा ॥ शर्तीचा घोडा लावा । वाटेल तेवढा पैसा घ्यावा । बच्चूच्या आड्ड्यामधी बेवडा प्यावा ॥८॥*

*रुस्तुमहिंद हामजेखान । बाबूमीया पहीलवान । गुलाम दस्तगीर आता झाले सवाई ॥ पहिल्या झपाट्याला थेट । भाली केली गणेश पेठ ॥ तालमीच्या गेटाजवळ होईल हवाई ॥९॥*

*सदाशिव पेठेमधीं । मांडव घालूं थाटामधीं, । लग्न करूं ऐटीमधीं । तिथें आपलं ॥ नाव तुझं पवळी । आम्ही केली सवळी । हें लोकांच्या डोळ्यांत भारी खुपलं ॥१०॥*

*पुणें झालं जुनं । आतां मुंबईच्या कमईनं । तळघरी तुझ्यासाठी माल भरला ॥ सरकार फाळा येईल । रयत सारी खुषीनीं देईल । नळाचें पाणी नेमके येईल घरला ॥११॥*

*गरत मोळा ठेवसील । आब्रूने चालसील । तर नावाजतील ठाई ठाई ॥ उगीच दारू पेशील । बडबड करशील । तर नाहीं खपणार दांडगाई ॥१२॥*

*आगाड्याचे बगाडे । गाड्याचें रुमणें । कवठेवाल्यानं घोडं जुपलं ॥ तोंडघशीं पडलं दाताड मोडलं । फरासखान्यामध्यें नाव टिपलं ॥१३॥*

*गरतीचा मोळा । ठेवशील सगळा । म्हणून पडद्याच्या आड जपलं ॥ दे माझं घोंगडं । हें तुझं लुगडं । तिनपाट चटई घे तुपलं ॥१४॥*

*लाखाची बासुंदी । फुकाची झाली । काळं कुत्रं एक आतां टपलं ॥ दारूची बाटली । वकताना गाठली । वकीलाच्या फीसाठी चीट ओपलं ॥१५॥*

*तणतण करशील । भणभण फिरशील । गणगोत करतील नवलाई ॥ बायकाची आक्कड । जिरविली फक्कड । पठ्ठे बापूराव कवी गाई ॥१६॥*

पुण्यात पगडीवाली ब्राह्मणमंडळीही पठ्ठे बापूरावांच्या तमाशाला येत. अनेक जाणती मंडळी हजेरी लावीत. त्यांनी एका लावणीत म्हटले आहे,

*'माझ्या तमाशाच्या कीर्तन काळी।*
*बसले कोण कोण सभा मंडळी*
*सूर्य कुळी आणि सोम कुळीचे*
*यादववंशी बळी बळी!'*

बापूरावांच्या शाहिरीला नवे नवे धुमारे फुटत होते. मोठ्या आत्मविश्वासाने त्यांच्या लेखणीला तेज प्राप्त झाले होते. स्वत:बद्दल आणि स्वत:च्या कवित्वाबद्दल अभिमानपूर्वक उद्‌गार ते लावणीच्या शेवटी नोंदवीत.

ते म्हणत,

*'माझ्या मतीचा प्रकाश कैसा*
*बारा कळेचा सूर्य जैसा!'*

तसेच

*'पठ्ठे बापूराव कविची धाटी*
*बहु जिल्ह्यावर वाजली घाटी*
*पठ्ठे बापूराव कवीचा जडाव*
*मोत्याची जाळी!*
*टाकी कोंदणामध्ये अक्षरें*
*माणिकांच्या ओळी!*

असा त्यांच्या कवनांचा जडाव असे.

आणि

*'पठ्ठे बापूराव कवीच्या लहरी।*
*बिलवरी चंदन।*
*जणू मलयगिरी।'*
*'पठ्ठे बापूराव कवी करी खासी*
*जणू बावनकसी सोन्याच्या राशी।*
*जणू का मालपुवा!'*
*'म्हणे पठ्ठे बापूराव कवी कटावी अशी*
*नवी तलवार नंगी जी जी।*

*'पठ्ठे बापूराव कवि पटवर्धनी। चालू रंगविली ती दर दिनी*
*काढून समशेर ती एक नंगणी। मर्दानी बाणा खरा'*
*'पठ्ठे बापूराव कवीचा सजा। जडणी जडल्या प्रलय विजा।'*

पठ्ठे बापूरावांच्या लेखणीची धाटी अशी ओजस्वी होत चालली होती. चटका लावीत होती. मराठी मनात जाऊन ठसली होती. म्हणूनच या वेड्या स्थितीचं वर्णन बापूराव करतात,

*'पठ्ठे बापूराव कवीच्या अकलेला।*
*मी बाई आपला संसार विकला।'*

पठ्ठे बापूरावांच्या तमाशासाठी रसिक असे आवडीचे झाले होते.

*'पठ्ठे बापूराव कवी बाई गं जी*
*पठ्ठे बापूराव कवीशी हाळद खेळली ग जी।'*

पठ्ठे बापूराव कवीच्या तमाशाला जशी दृष्ट लागावी अशी हळद लागली होती. त्यांचा तमाशा फड सर्वत्र दुमदुमत होता.

याच वेळी कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांच्या कानावर पठ्ठे बापूरावांच्या तमाशाबद्दल खूप चांगली वार्ता पडली. त्यांनी त्यांचा तमाशा करवीर नगरीला बोलावला.

खास निमंत्रण दिले गेले.

# ७. लोकराजा शाहू महाराजांनी गौरविलेला लोकशाहीर

राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या अल्पायुष्यात प्रजेच्या कल्याणासाठी अनेक सुधारणा केल्या. सर्वांगीण जडण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ते जाणते आणि अष्टावधानी व चतुरस्त्र राजे होते. उपेक्षितांच्या जीवनात चैतन्य निर्माण करण्याची धारणा त्यांनी ध्येय म्हणून स्वीकारली होती. सर्व कलांची त्यांना विलक्षण जाण होती. त्यांनी कोल्हापूरला तर खऱ्या अर्थाने कलापूर केले. कलांना आणि कलाकारांना उदार आश्रय दिला. कलावंतांना प्रोत्साहन दिले. संगीत, नाट्य, शिल्पकला, चित्रकला, वादनकला, मल्लविद्या इत्यादी कलांचा तर वैभवाचा काळ निर्माण झाला. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने कलामहर्षी आबालाल रहमान, बाबूराव पेंटर, लहरी हैदर, बालगंधर्व, शंकरराव सरनाईक, गोविंदराव टेंबे, अलादियाँ खाँसाहेब, केसरबाई केरकर इत्यादी त्या त्या क्षेत्राला संजीवनी देणारे थोर कलावंत निर्माण झाले

महाराजांनी नाटक मंडळी, सत्यशोधक जलसे, तमाशा, शाहिरी यांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. राजर्षी शाहू महाराजांनी भाऊ फक्कड या तमासगिराला अत्यंत आदराने आश्रय दिला. लहरी हैदर या लावणीकार शाहिराला जवळ बाळगले. १९०८-९च्या दरम्यान तमाशा क्षेत्रात चमकणाऱ्या शाहीर पठ्ठे बापूराव यांना खास मुंबईहून बोलावून घेतले. त्यांचा तमाशा राजदरबारात भरविला. पठ्ठे बापूराव यांनी 'मीठा राणी' हा आपला वग शानदारपणे सादर केला. त्यावेळी स्वत: महाराज आणि राणीसाहेब फारच खूष झाल्या. बापूरावांनी त्यावेळी *'कोल्हापूरची लावणी'* भावपूर्णपणे सादर केली होती.

ती 'कोल्हापूरची लावणी' अशी :

## कोल्हापूरची लावणी

*मैत्रिणी स्वरूप-चित्रिणी । कोमल-गात्रिणी । बोल मागे फिरूनी ।*
*आम्ही पठ्ठे बापूराव कवी आहे ग कुलकर्णी ॥१॥ धृ ॥*

*गांव आमचे ग कोल्हापुर। न करवीर शहर की संगमावर पंचगंगेच्या।*
*जरीपटका भगवा झेंडा खुणा त्या आमच्या ॥२॥*

*दिली अटक गंगाथडी । पाजली पाणी घोडी ।*
*अबूच्या गं पहाडी । छावण्या गिलच्याच्या ।*
*दाही दिशेस पळवूनी लावल्या पलटणी गं त्यांच्या ॥३॥*

*मराठ्याचा गं भगवा झेंडा । झळके नऊ खंडा।*
*शत्रुच्या गं तोंडा । पठाण रोहिल्याच्या।*
*दिल्या ढाला मैदानी गं तोफा झुंजी काबुलाच्या ॥४॥*

*मराठ्याची ग पहिली गादी । दक्षिणेमधी।*
*अनादि ग सिद्धी । कटारी जिवावरच्या।*
*श्री छत्रपति ग राजाच्या शिवाजी दक्षिणच्या ॥५॥*

*आम्ही मांडचे बसणार । दलांत घुसणार ।*
*नाही भिणार संकटी कोणच्या ।*
*घोरपडी लाविल्या किल्ल्या मावळी कोकणच्या ॥६॥*

*पंचवीस हजार फौजेचा । जमाव मौजेचा ।*
*केला हो साचा । लढाई माझ्या मनच्या ।*
*संग्राम करूनी उतरविल्या परी आस्माच्या ॥७॥*

*पाहुनी पराक्रम माझा । जिंकूनी झुंजा ।*
*लाविल्या ध्वजा । रणागणांवरुनी ।*
*तुझा सुकुमार चेहरा पाहता नेत्रं गेली दिपूनीं ॥८॥*

*नको धरूस आढी मनामधी । जलदी कर आधी ।*
*घोड्याला ग चंदी । द्यावी नीट करुनी । आम्ही पठ्ठे बापुराव कवी आहे ग कुलकर्णी ॥९॥*

पठ्ठे बापूरावांचा तमाशा राजर्षींना बेहद्द आवडला. त्या कलेचा कदरदार असणाऱ्या दिलदार राजांनी सोन्याची सलकडी पठ्ठे बापूरावांच्या हातात घातली.

जरीपटका बांधला आणि गौरव केला. पवळाला तर सोन्याचे दोन तोडे बहाल केले. लोकराजा शाहूमहाराजांनी दरबारात गौरवाची थाप पाठींवर मारल्यावर पठ्ठे बापूरावांना अधिकच स्फूर्ती मिळाली. पठ्ठे बापूरावांचे कोल्हापूरवर आधीच प्रेम जडले होते. अनेक लावण्यांत त्यांनी कोल्हापूरबद्दल काळीजमायेने अभिमान आणि आदर व्यक्त केला आहे. राजर्षी शाहू महाराजांचा प्रेमळ वरदहस्त लाभलेले आणि बापूरावांचे जवळचे स्नेही शाहीर लहरी हैदर यांनी त्यावेळची आठवण लिहून ठेवली आहे. त्यात ते म्हणतात,

'त्या सनातनी जुन्या काळात राजर्षी शाहू राजांचे उत्तेजनामुळे शाहिरी वाङ्मयाद्वारां बहुजन समाजाची सेवा करणेची संधी दैवयोगाने मला मिळाली असल्याने करवीर नगरीत कविराज पठ्ठे बापूरावांचे प्रथम आगमन माझ्याकडेच झाले व त्यांना कोल्हापूर मुक्कामी शाहू छत्रपती राजेमहाराज यांचे दरबारी दिवाणखान्यात 'मीठाराणी' हा वग करण्यास लावला. राणीसाहेब व राजेसाहेब बेहद्द खूष झाले. तो काळ १९०८ ते ९ असावा. कोल्हापूर मुक्कामी मीठाराणीचे अनेक प्रयोग झाले. लोक बेहद्द खूष झाले. वो राजे रजवाडे का जमाना कुछ और था! पठ्ठे बापूराव व पवळा बाईला पहाण्याकरिता स्त्री-पुरुष येत असत. त्यांना शक्य ते सर्व प्रकारचे हार्दिक सहकार्य केले आणि त्यामुळे त्यांच्या अभिजात रसवंतीने रसरसलेल्या करवीरच्या कलाप्रिय मावळ-मराठी मुलखात चांगलीच कीर्ती पसरली', (भेदिक लावण्या, भाग ३, पान ६) अशा पठ्ठे बापूरावांच्या कीर्तीचा डंका वाजत असलेल्या तमाशाचे खेळ कोल्हापूर, बेळगाव, कुरुंदवाड, सांगली, जमखिंडी, कऱ्हाड-सातारा या भागात व खेडोपाडी होत राहिले.

ज्या कोल्हापुरात पठ्ठे बापूरावांनी कुस्त्यांचा फड जिंकून मिळालेल्या दोनशे रुपयांवर तमाशाचा फड उभा केला होता, त्याच कोल्हापूरच्या राजदरबारानं सोन्याची सलकडी बहाल करून सन्मान केला होता. या जनकल्याणाचे व्रत घेतलेल्या कोल्हापूरबद्दल व परिसराविषयाचे उल्लेख अनेक लावण्यांत केले आहेत. ते *'धान्याच्या लावणी'*मध्ये म्हणतात,

*पुण्यापासूनी कोल्हापुरी कृष्णा थडीवरी*
*आहे महशूर चहु मुलखात काळ्या जमिनीत*
*पीक येते भारी।'*

अशी इथली मातीची कूस. इथल्या मायमातीतील दैवदैवतंही अक्षय वर देणारी.

'समग्र तीर्थांची लावणी'त सांगतात,

'प्रथम गेले करवीर कोल्हापुरी।
लक्ष्मी पुजली रंकाळ्यावरी।
पंचगंगा प्रयागक्षेत्री म्या वंसा पुजला
गुलाल खोबरे उधळीले म्या जोतीबाला।

'तात्या बापू'च्या फार्समध्ये ते फाकडेबाजपणे लिहितात,

'तात्या बापूचा जमाव फाकडा। मराठी शाही कोल्हापुरी आकडा गं।
मुंडाशाला उरफाटा तिडा। पेच वाकडा ग आगं नारी!'

'आम्ही शूर शिपाई लढाई जिंकली पण केव्हा?' या ओजस्वी लावणीत रणसंग्रामाचे वर्णन ते असे करतात,

'गड पन्हाळा ज्यावेळी झुंजला गे।
गाजीवली रणी म्या तलवार सांगतो तुजला गे।
झाली अगदी गडद संध्याकाळ दिवस नारी मुजला गे
मग रणातला रणखांब जाऊन आम्ही पुजला गे।'

'एका संगीत पदा'मध्ये ते वर्णन करतात,

'करवीर नगरीचे आम्ही सौदागर निघालो।
निघालो सफर कराया।
झाज मोत्याचे खरेदी केले आम्ही। आलो माल उतराया।'

एका 'बोधपर' कवालीत ते सांगून टाकतात,

'पठ्ठे बापूराव कवीचा जडाव। बोधपर घडण दाणेदार
कोल्हापूरची चाल। मराठी समले सोडी चार।'

पठ्ठे बापूरावांच्या काळात तमाशा हेच लोकरंजनाचे प्रभावी माध्यम होते. खेड्यापाड्यातल्या जत्रांवर तमाशांचे आकर्षण असे. अशा तमासगिरांची नावे बापूरावांनी 'सौंगडी' या गवळणीत रचली होती. त्या नामावलीत

'आब्या येयेऱ्या आणि सख्या जुनऱ्या, सुभान्या कोल्हापूरचा गे,' अशा रीतीने उल्लेखित केली आहेत.

बापूरावांनी 'श्रीगणेश वंदना'साठी लिहिलेल्या 'धीमप्रांग' या गणामध्ये दैत्यांशी भवानी लढते, दुष्टांना दंडण करते असे वर्णन करीत असताच,

*'या रत्नागिरीवर स्वारी। बटू भैरव हिमये द्वारी*
*दक्षिण द्वीप कोल्हापुरी। मी उजळीला डोंगरभरी*
*या करवीर शहरीच्या पुरी। अक्षय डंग डंग डंग.'*

असा पौराणिक संदर्भाचा उल्लेख केला आहे.

पठ्ठे बापूरावांना कोल्हापूरच्या या 'कलानगरीने' खूप प्रोत्साहित केले होते. कोल्हापूरच्या परिसरावर त्यांचा जीवभाव होता. त्यांच्या लेखणीला इथल्या शक्ती, भक्ती आणि नीतीने स्फुरण चढे. त्यांच्या तमाशाला महाराष्ट्रात लोकमान्यता मिळाली, पण 'राजमान्यता' मिळाली ती येथेच. त्यांच्या स्फूर्तीचा मूळ स्रोत इथलाच होता.

# ८. पठ्ठे बापूराव आणि पवळातील मतभेद

मुंबईबाहेरच्या फिरतीवरून पठ्ठे बापूरावांचा तमाशा मुंबईला आला. खेळ जोरात सुरू झाले. पैशाचा पाऊस पडत होता. रसिकांना मनमुराद आनंद लाभत होता. पठ्ठे बापूराव व पवळा यांना ऐन ऐश्वर्याचे दिवस लाभले होते. बापूराव सोन्यानाण्याचे छंदी होते. अंगावर खूप दागिने घालत. उंची वस्त्रांचा पेहराव चढवत. मनमौज करीत. पवळाही सोन्यानं पिवळी झालेली असायची. जोडा शोभून दिसायचा. दोघे व्हिक्टोरियातून फिरत. हौसमौज करीत. ऐषआरामाने राहात. 'सुख लोळे दारी' अशी स्थिती होती. पठ्ठे बापूरावांच्या लेखणीवर पवळाच्या सहवासात मोहर फुलला होता. पवळाच्या नृत्यकुशल नाजुक पदरवाने रसिकांना बेहोष केले होते. रुबाबदार पठ्ठे बापूराव आणि रूपवान पवळा यांची दृष्ट लागेल अशी जोडी मराठी कलावेड्या मनांवर अधिराज्य गाजवीत होती.

पठ्ठे बापूरावांचा स्वभाव खर्चिक होता. मनात आले की शंभर रुपयांच्या नोटीत गांजा भरून ओढीत. गरजू तमाशा कलावंतांची गरज भागवीत. पठ्ठे बापूरावांनी आपल्या लावणीत

*'पठ्ठे बापूराव कविची अविश्राम फडकत राहे ध्वजा।*
*नऊ ताळी वाड्यावर, चौताळी सज्ज्यावर वाजतो सदा रणबाजा।'*

अशा तऱ्हेचा बहर होता.

पण पठ्ठे बापूरावांच्या कलंदर स्वभावामुळे त्यांना चैन जडली होती. हळूहळू पवळाचे आणि पठ्ठे बापूरावांचे मतभेद होऊ लागले. पठ्ठे बापूरावांचे चरित्र व आठवणी सांगत असता गोविंद डांगे यांनी एका प्रसंगाचे चित्र रंगविले आहे.

'पवळा, बापू वगैरे सर्व मंडळी मुंबईस बटाट्याचे चाळीत रहात होती, तमाशा होता 'बॉम्बे थिएटर'ला. तमाशाच्या बारीत उभे राहाताना बापूराव भरजरी आणि अमोल असा फेटा बांधीत. तमाशाला वेळ होऊ लागला आणि

बापूराव विचार करू लागले. अखेर विचारान्ती त्यांनी पवळाचे बाहेर असलेले जरीचे हिरवे पातळच फेटा म्हणून बांधले आणि ते थिएटरवर आले.

घंटा खणखणल्या. पडदा दूर झाला. सारे प्रेक्षक चकित होऊन बापूरावांच्या शिरोभूषणाकडे पाहू लागले. शिट्या वाजू लागल्या. प्रेक्षक उल्हसित झाले. तेव्हा कुठे पवळाचे लक्ष बापूरावांच्या या हिरव्या फेट्याकडे गेले आणि ती स्तब्ध उभी राहिली. बापूंरावांनी गाण्याकडे लक्ष न देता, 'तू माझ्याकडे काय पहातेस?' असे विचारले.

तिने उत्तर दिले,

'हा फेटा अगदी माझ्या हिरव्या पातळासारखा दिसतो गडे?' विनोदबुद्धीच्या बापूंनी सांगितले,

'अगं माझा फेटा सापडेना, म्हणून आता रात्री मारवाड्यास उठवून, जादा पैसे देऊन नवीन फेटा घेऊन आलो आहे बारीसाठी.'

'तुम्हाला नेहमी पैसे खर्च करायला पाहिजेत, अशी धुळधाण केल्यावर सारे सोने, घरदार सारे सारे धुळदाणीत जाईल.' पवळा चिडून बोलली. तिला उगीच केलेला खर्च आवडत नसे. आणि पठ्ठे बापूराव तर या गोष्टीविरुद्ध. रोजचा किरकोळ खर्च (त्या काळच्या किंमतीत) २० ते २५ रुपये असे.

तिने या निमित्ताने बापूरावांची चांगलीच हजेरी घेतली. त्यांना टाकून बोलली. स्वाभिमानी बापूरावांना हा उपमर्द गिळून गप्प बसावे लागले. दोघांची कुरबूर या ना त्या कारणाने वाढतच चालली. वादविवाद होत राहिले. मतभिन्नता वाढत चालली.

मुंबईहून तमाशा फड पुण्याला आला. तमाशाचा लौकिक चढता-वाढताच होता. रसिकांचा लोभ शिगेला पोचला होता. तमाशा-शौकिनांचे प्रेम मिळत होते. पण पठ्ठे बापूराव आणि पवळा यांच्यात दुरावा वाढत चालला होता. मनामनांमध्ये अंतर पडत चालले होते. पवळावर सारं आयुष्यच बहाल केलेल्या कलावंत बापूरावांना असं अंतर पडत जाणं असह्य होत होतं. ते अस्वस्थ बनत चालले. त्यांची मानसिक कुचंबणा होऊ लागली. त्यातून त्यांचा स्वभाव चिडचिडा बनत गेला.

महाराष्ट्राचा दौरा करून, अफाट लोकप्रियता मिळवून, पुण्यात खेळ करीत असलेला हा तमाशा रविवार पेठेतील सतरंजीवाला चौकातील थिएटरात चालू

होता. खेळ संपला की सारे कलाकार, साथीदार थिएटरवरच झोपत. सारी मंडळी तेथेच मुक्काम करीत. पवळाही आपल्या आत्याबरोबर तेथेच विश्रांती घेई.

एके दिवशी तमाशाचा खेळ संपला. कलाकार, इतर मंडळी आपापल्या ठिकाणी विसावली. पवळाने आपल्या अंगावरील सर्व किंमती दागिने उतरले. ट्रंकेत ठेवून कुलूप घातले. उकडत होते म्हणून आत्यासह ओसरीवर हवेत झोपली. सारे सामसूम झाले.

पवळा सकाळी उठली. पहाते तो ट्रंक उघडीच. कुलुप तोडलेले, उलथापालथ केलेली. पवळाला शंका आली. तिने ट्रंक पाहिली. तिला काही सुचेना. तिला सारे हिरावले गेलेले पाहून धक्का बसला. तिने पोलिसांत तक्रार नोंदवली. नामांकित पवळाचे दागिने गेलेले पाहून पोलिसांनाही सहानभूती वाटली. त्यांनी कसून तपास केला. चोर सापडला. चोरांची नावे कळल्यावर पवळाला पुन्हा धक्का बसला. चोर दूरचे नव्हते. जवळचे होते. तिच्या फडातील साथीदारच होते. ती चकीत झाली. आपल्याच माणसांनी केलेला तो विश्वासघात होता.

पवळानं विचार केला,

'आपलीच माणसं. त्यांनीच दगा दिला. हे तर आपल्या तमाशातील साथीदार. त्यांना सजा झाली, की आपला फड फुटेल. बंद पडेल. आर्थिक नुकसान होईल,' अशी तिला भीती वाटली. तिनं पोलिसांत अर्ज दिला. केस काढून घेतली. आपली काहीच तक्रार नाही, असं तिनं सांगितलं आणि विनंती केली,

'आपल्या साथीदारांजवळ सापडलेले दागिने विकावेत. येणारे पैसे अनाथालयाला द्यावेत.'

पवळानं तोडगा काढला. आपला फड वाचविण्याचा तिनं प्रयत्न केला. पण तिचे मौल्यवान दागिने गेले ते गेलेच. मुंबईची ही पट्टराणी अक्षरश: लंकेची पार्वती बनली.

पठ्ठे बापूरावांना हे आवडले नाही. दोघांचे भांडण झाले. मतभेद विकोपाला गेले. या दोघा कलंदर कलावंतांची समजूत कोणी व कशी काढायची? अशा रागाच्या भरात पवळानं मनाशी निर्णय घेतला. ती अचानक निघून गेली. ती कोठे गेली, कशी गेली, केव्हा गेली ते कळलेच नाही. बापूरावांनी खूप

शोधली. कोठे दिसली नाही. त्यांना धक्का बसला. ते सैरभैर झाले. पवळा परतली नाही. फड बंद पडला. बापूरावांच्या पायाखालची जमीन हादरली. बापूरावांची पवळा ही त्यांची स्फूर्ती होती. प्रेरणा होती. त्यांनी तिच्यावरून कितीतरी लावण्या रचल्या होत्या. त्यांना नवी नवी कवने स्फुरली होती. तिच्या सहवासात त्यांची लेखणी अनोख्या ढंगाच्या नित्य ताज्या लावण्या लिहून जाई. बापूरावांचा सारा जीव तिच्यात गुंतला होता. तमाशा कलेसाठी त्यांनी घरदार सोडलं होतं. संसार मोडला होता. नृत्यानिपुण अशा पवळा या नृत्यांगनेसाठी अंतरंगाने महारही झाले होते. त्यांनी जगाची तमा बाळगली नव्हती. पवळाच्या जाण्याचं बापूरावांना तीव्र दुःख झालं. त्यांची काव्यगंगा आटली. महाराष्ट्रभर गाजलेलला पठ्ठे बापूरावांचा तमाशा बंद झाला. तमाशाला वैभवाच्या शिखरावर नेणारी लोककलेच्या मंदिरातील जोडी फुटली. सर्व बाजूने अटळ अशी पोकळी निर्माण झाली. एका लोकशाहिराच्या डफावरची थाप बंद पडली. बापूराव या वियोगाने हादरून गेले. त्यांची प्रतिभाच रुसली.

त्यांची प्रतिभा रसरशीत होती. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे,

*'हटयोगी आम्ही पठ्ठे*
*बापूराव कवी मोठे*
*कलगीवाले गजर उठे*
*ढंग लुटे जगी पटले की*
*जडत्वाची लड*
*जणू पन्हाळ्याचा गड !'*

असे त्यांचे जडाव असत. त्यांच्या या काव्यभेरीवर लोक लुब्ध झाले होते. पण पठ्ठे बापूराव जिच्यावर लुब्ध झाले होते, तीच त्यांच्यापासून दुरावली होती.

*'लागलो छंदा! सुचेना धंदा*
*सदा लागला जीव घोरा गे!*
*वेडा मी झालो पाठी लागलो*
*नको मनामधी धरू कुर्रा गे!'*

अशी त्यांच्या मनाची तगमग झाली. पिसं लागावं असं झालं.

*'मैना तुझा खासा लागला छंद*
*झोप नाही नयनाला !*
*धंदा केला बंद*
*ठाण मान जेवि चित्र----*
*रोखिले ऐसा तुझा चेहरा*
*माझ्या नजरेपुढे फिरे गरगरा*
*विसरून गेलो संसाराचा*
*झाला मातेरा*
*शेतीभाती पडून राहिली*
*गोराढोरांच्या वाजल्या तीन तेरा!*
*मोरावाणी झुरणी लागलो!'*
*'फंची पटाईत आम्ही कवीश्वर*
*अक्कल आहे माझी थोडी*
*परी मारली उडी मेरूवरुनी*
*एक एकाहुनी एक चढी!'*

अशी मेरूवरून उडी मारण्याची हिम्मत ज्यांची ते कवीश्वर पठ्ठे बापूराव पुरते कोसळले. बापूरावांच्या मनाची अवस्था या कवनात मूर्तिमंत अशी साकारली आहे.

पवळा गेली. बापूराव एकाकी पडले.

पवळा आपल्या गावी गेली. हिवरगावात जाऊन राहिली. पवळा पठ्ठे बापूराव यांना सोडून गेल्याची घटना पवळावर भाळलेले मारुतीराव पाटील कवठेकर यांना कळली. मारुतीराव पाटील हे पवळावर मोहित झालेले रसिक होते. ते तिच्याबरोबर मुंबईतही काही काळ राहिले होते.

पवळाच्या लावण्यावर व अदाकारीवर खूष असलेले मारुतीराव पाटील हे मूळ कृष्णाकाठचे. कृष्णेच्या तीरावर कवठे मसूर म्हणून गाव प्रसिद्ध आहे. कृष्णाथडी ही समृद्ध. ऐसपैस हिरवागार असा पसरलेला मुलुख. मारुती पाटील यांचं घराणं तसं तालेवाराचं. खानदानी. थेट बडोदा सरकारच्या घराण्यापर्यंत नातेसंबंध. वाडा म्हणजे आत एक छोटं गाव वसेल असा. कृष्णा काठी भरपूर जमीन होती. धनदौलत होती. या वाड्याचा दबदबा होता. मसूरच्या पेठेत व्यापारी पेढी होती. व्यापार वाढलेला होता. पेढी भरभराटली होती. आगगाडीने पुण्याशी व्यापारी संबंध जोडले होते. तिथल्या रसिक व्यापाऱ्यांच्या

संगतीने तमाशाची हौसमौज करण्याची संगत जडली. त्या काळी तमाशा हेच सर्वत्र करमणुकीचं मनपसंत असं साधन होतं. मारुती पाटील प्रथम विरंगुळा म्हणून तमाशाला जाऊ लागले. नंतर शौकीन बनले.

मारुती पाटील पैलवानी बांध्याचे, उंचपुरे आणि देखणे होते. पवळाचीही त्यांच्यावर मर्जी होती. मुंबईत असताना तर पवळा इतर वेळी मारुती पाटील यांचेकडे असेल आणि तमाशाच्या खेळाच्या वेळी म्हणजे संध्याकाळी ७ ते रात्री १ वाजेपर्यंत फडात काम करण्यासाठी बापूरावांच्या बरोबरीने असेल असा ठराव पवळा, पठ्ठे बापूराव आणि मारुती पाटील यांच्यात झाला होता. काही दिवस गेले आणि पवळा व मारुती पाटील यांच्यात काही गोष्टींवरून खटके उडू लागले. अखेर मारुती पाटील आपल्या गावी येऊन राहिले.

पवळा पठ्ठे बापूरावांना सोडून आपल्या गावी गेल्याचे मारुती पाटील यांच्या कानावर आले. तमाशा फड बंद असल्याचे कळले, तेव्हा ते तिला भेटण्यासाठी गेले. वाघापूरला माधवराव सुतार पैलवान होते. त्यांचे आणि पवळाचे पूर्वीपासूनच जवळचे संबंध होते. मारुती पाटील वाघापुरात माधवराव सुतार (घोलप) यांना भेटले. त्यांनी माधवरावांना परोपरीने समजावून सांगितले. पवळाला म्हणाले,

'तू माझ्याबरोबर चल. पुन्हा फड उभा करू.'

पण पवळा तयार होईना. माधवरावांनी मध्यस्थी केली. नव्याने फड उभा राहात असेल तर कलावंत म्हणून पवळाच्या दृष्टीने चांगली गोष्ट होती असे त्यांना वाटले. त्यांनी पवळाला समजावले. पवळा तयार झाली; पण तिने एक अट घातली. ती मारुती पाटील यांना म्हणाली;

'माझे चोरीला गेलेले पैसे, दागिने तयार करून देणार असाल, तमाशाचा नवा फड मला हवा तसा खर्च करून तयार करून देणार असाल, तर मी यायला तयार होईन.'

मारुतीराव पाटील यांनी पवळाने घातलेल्या अटी मान्य केल्या. पवळा मारुती पाटील यांच्याबरोबर निघाली. नवा फड तिला हवा तसा उभा करून दिला गेला.

जिच्यासाठी सारे आयुष्य पणाला लावले, ती लावण्यवती पवळा पठ्ठे बापूरावांच्यापासून दुरावल्यावर त्यांच्यावर आकाश कोसळल्यासारखे झाले. त्यांचा साऱ्या जीवनश्रद्धांवरील विश्वासच उडाल्यासारखे झाले. त्यात जीवनाचा

अखेरचा काळ. एकाकीपणा तर त्यांना खायला उठे. माणसात रमणारा, कलेवर प्रेम करणारा आणि जे स्वीकारले त्याच्याशी ठामपणे एकरूप होणारा तो एक कलंदर कलावंत होता. त्यांना पवळाशिवाय जगणं असह्य झाले.

*'थाट पाहुनी लंपट झालो*
*भुलूनी गेलो स्वरूपाला*
*दागिन्याने मढवीन तुला*
*मोती खेळवीन भांगाला'*

तसेच

*'झालो दिवाना, कोणाची मैना*
*तुझा तीर नैनाचा लागला*
*काढोनी भुरका, मारोनी मुरका*
*द्यावा एक मुका चांगला'!*

असे दिवाने झालेले पठ्ठे बापूराव मिरजेला जायला ज्या आगगाडीच्या डब्यातून निघाले होते, त्या आगगाडीच्या डब्यातच पवळा आणि मारुती पाटील-कवठेकर चालले होते. विचित्र अवस्था नशिबी आलेल्या, आणि अगतिक बनलेल्या पठ्ठे बापूरावांना पवळा स्वत:ची 'स्वतंत्र बारी' घेऊन कराड भागात खेळ करायला निघाल्याचे कळताच बापूरावांच्या जीवाची तगमग झाली. अमोल कवने रचणाऱ्या पठ्ठे बापूरावांना अखेर -

*'आसोनी फैणा, झाली दैना, जीव घोरानी लागला'!*

असे म्हणावे लागले. पवळा दुरावली. आपला फड बंद पडला. बापूराव चैतन्य हरवल्यासारखे झाले. त्यांना काही सुचेना. काही रुचेना.

*'चिमणीसाठी मी झालो वेडा दिवाणा*
*असून मोती दाणा चतुर शहाणा !*
*अन्न खावेना, पाणी पिवेना, झोप नाही नयना*
*त्या दिवशी गाडीमागे पळून पळून फोड आले*
*विचारावे कोणा!*

अशी विचित्र अवस्था बापूरावांच्या नशिबी आली. मिरजेला निघालेले बापूराव त्याच डब्यात बसलेले होते. ताकारी स्टेशनवर पवळा गाडीतून उतरू लागली. पण बापूरावांनी तिच्याकडे रेठऱ्याला दोघांनी मिळून जायचा हट्ट धरला. पण

ती ताकारीवरच उतरली. बापूरावही तिथेच उतरले. बापूराव बेचैन होते. त्यांना पवळाविना सारं सुनं वाटू लागलं. त्यांच्याजवळ मुंबईहून पावती करून आणलेली चार जरीची पातळं होती. त्यांच्या त्या विमनस्क अवस्थेत एक कल्पना त्यांना सुचली. बारी सुरू होणार होती, तेव्हा बापूरावांनी पवळाला सांगितलं,

'माझी शेवटची आठवण म्हणून ही पातळं तुला द्यायची आहेत. त्यातील एक बारीत नेस'.

पवळानं मान्य केलं. पातळं घेतली. एक पातळ बारीत नेसली. बापूरावांनी तिला आपल्याबरोबर येण्यासाठी निकड लावली. पवळाला विनवलं. समजावलं. पण तिनं नकारच दिला. बापूराव अस्वस्थ अवस्थेत थिएटरवरच झोपले. सकाळी उठले. पोलिस चौकीत गेले. एक गुन्हा नोंदवला.

पातळे चोरीला गेल्याची फिर्याद दिली. मुंबईच्या पावत्या दाखवल्या. पोलिसांनी तमाशातल्या लोकांची चौकशी केली. पातळे पवळाच्या ट्रंकेत सापडली. पवळा चोर ठरली.

शेवटी ती बापूरावांना शरण गेली. पण बापूरावांच्याबरोबर ती गेली नाही.

ज्यांच्या लावण्यांनी आणि लावण्याने खेड्यापाड्यातला माणूस वेडा झाला होता, जीव लावून जीव टाकत होता, त्यांच्या जीवनात अशी जीवघेणी नाट्येही घडली होती. जीवन अगम्य आहे. आयुष्य अद्‌भुत आहे. क्षणक्षणातल्या अंतराची गती काही विलक्षणच. पठ्ठे बापूराव म्हणतात,

*'सारा मायेचा बाजार*
*तीन दिवसांचा गं भार*
*उद्या जाईल निघून पूर*
*म्हणे पठ्ठे बापूराव कवी गुण खाणी*
*डफावरती सवाई कलगी चमके मैदानी'।*

स्वत:च्या जीवनात आणि कलगीतुऱ्यातील 'ब्रह्ममाये'च्या झगड्यात एक लोकशाहीर होरपळला गेला.

मारुती पाटील-कवठेकर यांनी तमाशा फडाची उभारणी करून दिली होतीच. पवळाच्या नावाने तमाशा सुरू झाला. कराड भागात पवळामुळे गाजत राहिला. तिचा तमाशा पुन्हा बहराला आला. पवळाच्या थरकणाऱ्या चाळाने,

गोड गळ्याने आणि लोभस हावभावाने रसिक बेहोष होत असत. कवठे येथे तिचा मुक्काम होता. तिच्या तमाशा खेळासाठी तिथे कट्टा बांधला होता. तो कट्टा अजूनही 'पवळाचा कट्टा' म्हणून अस्तित्वात आहे. या कट्टयावर रात्र रात्र तमाशा रंगे. आजूबाजूच्या खेड्यांपाड्यांतून पवळाच्या तमाशाची फार हौस असे. पवळाच्या अदाकारीवर रसिक खूष होऊन दौलतजादा करीत. दौलतजादाची तर बरसात होई.

अशाच एका खेळात एका अतिशोकिनाने दौलतजादा करतेवेळी पवळाचा हात धरला. पवळाने तो हात सोडविण्याचा प्रयत्न केला. पण हाताची घट्ट पकड सुटली नाही. मग पवळाने खोटे हास्य करीत, युक्तीने व विनोदी स्वभावाने तो सोडवून घेतला. मारुती पाटील यांना ते सलगीसारखे वाटले. ते हास्यविनोद आवडले नाहीत. खेळ संपल्यावर मारुती पाटील यांनी पवळाला चांगलेच खडसावले; पण पाटील यांचे ते तसे खडसावणे पवळाला आवडले नाही. तिला राग आला. ती संताप अनावर होऊन म्हणाली,

'मी तमाशातील कलावंत आहे. माझ्या कलेवर प्रेम करणारे गावोगावच्या होणाऱ्या खेळात भेटतात. दाद देतात. हौसेन दौलतजादा देतात. ते माझ्याहीपेक्षा माझ्या कलागुणांवर जीव ओवाळून टाकतात. म्हणून मी काय त्या सर्वांची प्रेमी नसते. तेवढ्याच मोकळ्या मनाने त्यांची दाद मी स्वीकारते.'

'तरीही हे असे चालायचे नाही. मी खपवून घेणार नाही.'

मारुती पाटील पवळावर हक्क गाजवण्याचे सूरात म्हणाले. त्यावर पवळा चिडली. म्हणाली,

'मी काही कुणाची बायको नाही, की कुणाची लग्नाची बायको नाही. माझी मी स्वतंत्र आहे'.

मारुती पाटील यांना पवळाच्या बोलण्याने राग आला. त्यांनी तिच्यासाठी खर्च केला होता. तो भाव पाहून ते संतापले. पण पवळाला त्यांचे बोलणे सहन झाले नाही. तिने अंगावरचे सारे दागिने उतरवले आणि मारुती पाटील यांच्या पुढ्यात फेकून दिले. दोघांचे बिनसले. संबंध ताणले गेले.

मारुती पाटील यांना तो अपमान वाटला. त्यांच्या मनात वादळ खदखदू लागले. त्यांनी विचार केला आणि साताऱ्च्या कोर्टात पवळावर केस केली. त्यांनी 'माझे दागिने आणि तमाशाचे सामान पवळाने चोरले आहे, असा आरोप करून मालकी हक्क व नुकसानभरपाईबद्दल तीन हजार रुपयांची मागणी

केली. पण चतुर पवळाने आधीच अक्कलहुषारी दाखवली होती. तिने दागिने व सामानाच्या पावत्या ते घेतानाच आपल्या नावाने करून घेतल्या होत्या. पवळावर भाळलेल्या मारुती पाटील यांच्या ध्यानीमनी पवळाची चतुराई आली नव्हती. दावा सुरू झाला. पवळानं आपल्याजवळच्या पावत्या कोर्टात हजर केल्या. ती म्हणाली,

'मी तमाशा कलावंत आहे. माझा तमाशाचा फड आहे. त्यासाठी मी केलेल्या खर्चाच्या या पावत्या आहेत.'

कोर्टाला पुरावा मिळाला. दावा पवळाच्या बाजूने झाला. मारुती पाटील हरले.

'सारा मायेचा बाजार । तीन दिवसांचा भर ।' अशी गत झाली.

पवळाचा फड मोडला. परत ती हिवरगाव-वाघापूरला आली.

जीवनातील एवढ्या चढउतारांनी पवळा हताश झाली.

# ९. बहिष्कृत पठ्ठे बापूराव

मारुती पाटील यांना सोडून पवळा हिवरगावला आल्याचे बापूरावांना कळले. ते तातडीने वाघापूरला आले. माधवराव पैलवांनाना भेटले. पवळाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. ती धीरगंभीर होती. पण माधवरावांनी तिला समजुतीने सांगितले. माधवरावांचा आग्रह आणि पठ्ठे बापूराव यांच्यावरील न आटलेला जिव्हाळा यामुळे पवळा तयार झाली. माधवरावांनी दोघांमधील मतभेद मिटविले. समेट झाला.

पुन्हा नव्याने उभा राहणाऱ्या फडासंबंधी माधवरावांनी अट घातली. प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळेस 'शाहीर पठ्ठे बापूराव आणि नामचंद पवळाबाई यांचा ढोलकीवरील बहुरंगी तमाशा' अशी जाहिरात केली जावी, असे मत मांडले. बापूरावांनी ते मान्य केले. आपल्या जोडीचा तमाशा पुन्हा उभा रहातोय याचा बापूरावांना अति आनंद झाला. त्यांना नवा उत्साह आला. मनाला उभारी आली. मरगळलेल्या मनाला नवा उजाळा मिळाला. या ऊर्मीच्या भरात नव्या तमाशाचा शुभारंभ वाघापुरातच करण्याचा निश्चय केला. या बारीसाठी बापूरावांनी आपले साथीदार जमविले. नवी मांडणी केली. मनासारखी जुळवाजुळव केली. ताज्या उभारीने खेळ जाहीर केला.

पहिला प्रारंभाचा खेळ वाघापुरात उघड्यावर फुकट होणार ही वार्ता वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. पाच हजारापेक्षाही जास्त अशी अलोट गर्दी लोटली. पठ्ठे बापूराव आणि पवळा यांची नामांकित जोडी तमाशाला नवा हुरूप देण्यासाठी उभी राहिली. प्रेक्षकांतून शिट्ट्यांचा गजर उठत राहिला. तमाशा सुरू झाला. पठ्ठे बापूरावांच्या शृंगारप्रधान लावण्यांनी आणि लावण्यवती पवळाच्या कमनीय विलोभनीय नृत्याने प्रवरा नदीचा परिसर धुंद होऊन गेला. रसिकांनी अपूर्व असा तमाशाचा रंग अनुभवला. दौलतजादाची तर खैरात झाली.

नव्या जोमाने मांडणी आणि उभारणी केलेला तमाशाचा हा फड

महाराष्ट्राच्या दौऱ्यावर निघाला. मराठी मातीतील मराठी मने जिंकत पुण्याला आला. तमाशा कलेने परत वैभवाचे दिवस पाहिले. बापूराव-पवळाला खूप पैसाही मिळाला. पठ्ठे बापूरावांचा दिलदार स्वभाव अजूनही सुटला नव्हता. पुण्यात त्यांनी दानधर्म केला. आपल्या चरित्रपर लावणीत ते म्हणतात,

*'आसहस्रात पंक्ती उठविल्या । ब्राह्मणभोजने दिली जेवढी*
*लहानथोराला दिली दक्षिणा । मोहोर सोन्याची आली तेवढी ।*

'जणू अंबरी खेळे बिजली' अशा पवळाच्या संगतीने व आपल्या लेखणी-वाणीने पठ्ठे बापूरावांनी जणू -

*'ब्रह्मांडा भवता तो एक सवता ।*
*दिवाच लाविला म्हणा म्हणा ।'*

असा चमत्कार तमाशा क्षेत्रात करून दाखविला. 'साही शास्त्रांच्या मंत्र-अस्त्राच्या दाविल यंत्र खाणाखुणा' अशी त्यांची ग्रंथानुभवाने सिद्ध झालेली लेखणी होती.

*'खाली जमीन अंथरीन । वर आभाळ पांघरीन ।'*

अशा अस्मितेने डफावर थाप मारलेल्या या लोकशाहिराचा डंका चौमुलखात वाजत होता. लोकांना तर बापूराव-पवळाच्या तमाशाने वेडं-पिसं केलं होतं. पुण्यात लौकिकाच्या झगमगाटात असतानाच पठ्ठे बापूराव पवळासह आपल्या कृष्णाकाठी रेठरे हरणाक्ष या गावी गेले. तो काळ अत्यंत सनातनी होता. जातीपातीची चौकट अत्यंत चिवट होती. जरा जरी परंपरेच्या विरुद्ध वागले तरी हेटाळणीला सामोरे जावे लागे. नियमबाह्य पाऊल पडले तर समाजबाह्य व्हावे लागे. सारा गाव संबंधितांना बहिष्कृत करी. वाळीत टाके. माणसाचे जगणे कठीण होऊन जाई. साध्या सावलीचीही शिवाशिव होई. बापूराव तर सरळ सरळ बाटले होते. पवळा कलावंत असली तरी महार समाजातील होती. तिच्याबरोबर वागणे हे तर धर्माच्या विरुद्ध होते. समाजाने पूर्वापार घालून दिलेल्या नीतिनियमांच्या विरोधी होते. बापूराव तर प्रतिष्ठित समाजातील, ब्राह्मण कुटुंबातील, सनातनी वर्गातील. त्यांनी तर सारे नीतिनियम धाब्यावर बसविले होते. उपेक्षित समाजातील बाईची संगत केली होती. हे जुन्या मताच्या गावाला मान्य होणारे नव्हते.

बापूरावांनी तमाशा या सर्वसामान्यांच्या लोककलेला वैभवाच्या शिखरावर नेले असेल; ते असतील थोर; असेल त्यांचा महाराष्ट्रभर लौकिक. त्यांचे

व्यक्तिगत जीवन हे परंपरागत नीतिकल्पनेला दूषण लावणारे आहे अशी घरच्यांची भावना होती. गावाला ते आवडणारे नव्हते. त्यांनी बापूरावांना बहिष्कृत केले. वाळीत टाकले. मानहानी होईल अशी वागणूक दिली. मानी पठ्ठे बापूरावांना ते सहन होत नव्हते. चवीने तमाशा बघणारेच असे विरोधात उभे होते.

काहीही असले तरी बापूरावांबद्दल गाववाल्यांना त्यांच्या कवन कलेमुळे आपलेपण वाटत होते. लोक काही काही कुजबुजत होते; 'बापूराव हुषार, बुद्धिमान, पण महारणीच्या संगामुळे वाया गेले. त्यांनी पवळाला सोडावे. ब्राह्मण धर्माप्रमाणे वागावे. रिवाज तोडू नये. वाडवडिलांनी घालून दिलेले नियम मोडू नयेत. त्यांनी शुद्ध व्हावे. शुद्ध झाले तर घरात, गावात स्वीकार करता येईल. गेलेली प्रतिष्ठा देता येईल.'

गाववाल्यांचे हे विचार पवळाचे कानापर्यंत येऊन पोचत होते. ती चलबिचल होत होती. गोंधळली होती. बापूराव धर्मांतर करणार आहेत असे कळत गेले. बापूरावांच्या चाहत्यांनी चालविलेली ही गोष्ट होती. बापूरावांना ते पटवत होते. त्यांची समजूत काढत होते. बापूरावांना ते पटत नव्हते. ते शांतच होते. चाहते मात्र आपल्यापरीने धर्मांतराची योजना आखीत होते.

पवळाला ही गोष्ट कळली. ती अस्वस्थ झाली. बापूरावांचे संबंधी तिच्या मनात विकल्प आला. बापूरावांचे व तिचे संबंध ताणले गेले. बापूराव तिला समजावत होते. आपणात काहीही बदल होणार नाही असे सांगत होते. पण पवळाच्या मनात शिरलेल्या संशयाने ती अधिकच पछाडली गेली. ती बिथरली. बापूरावांना सोडून हरणाक्ष रेठऱ्याच्या बाहेर पडली. तिने मुंबई गाठली.

गावकऱ्यांनी बापूराव आपण म्हणतो तसे सन्मार्गावर यावेत असा प्रयत्न चालविला होताच. बापूरावांचे शुद्धीकरण गावात करावे असे काहींचे म्हणणे होते, तर बापूरावांनी काशीला जाऊन शुद्ध होऊन यावे असे काहींचे मत होते. त्यासाठी गावकऱ्यांनी वर्गणी गोळा केली. तीनशे रुपये जमले. ते बापूरावांच्याकडे दिले आणि काशीला जाऊन धर्मांतरित होऊन यावे, शुद्ध होऊन यावे असे सांगितले.

पठ्ठे बापूराव मुंबईला निघाले. बापूराव शुद्ध होण्यासाठी काशीला चालले अशी लोकांची कल्पना होती. गावकरी आणि त्यांची पत्नी सौ. सरस्वतीबाई त्यांना निरोप देण्यासाठी रडत गावच्या सीमेपर्यंत आले. बापूरावांनी कठीण मनाने निरोप घेतला. बापूराव मुंबईला आले. पवळाला भेटले. पवळाला त्यांनी सांगितले, 'एकदा महार झालो तो झालो. आता परत धर्मांतर नाही, की

काही नाही. आतापर्यंत तमाशासाठी आणि तुझ्याहीसाठी घरदार सोडलं. समाजाची दिक्कत बाळगली नाही. संसाराचं नाव घेतलं नाही. तमाशाच्या नावासाठी आणि तुझ्या-माझ्या कलाकीर्तीसाठी सोवळं फेकून दिलं. एवढं आयुष्य गेलं. मी तुझ्याशी प्रतारणा केली नाही. तुझ्याबरोबर मिळेल तो क्षण घालविला. आता मनात अढी कशासाठी? धर्मांतरासंबंधी गाव बोलला असेल; पण माझा काय दोष? मी कुठे राजी होतो? गावानं परस्पर काशीला जाण्यासाठी वर्गणी जमा केली. त्यांनी दिलेले हे तीनशे रुपये तुला देण्यासाठी आणलेत. मला कशाचीच अपेक्षा नाही. फक्त तू दुरावा बाळगू नकोस. आपण तमाशाची मशाल पुढे नेऊ. पैसे मिळवू. मग कसली चिंता?' बापूरावांनी आणलेले तीनशे रुपये पवळाच्या स्वाधीन केले. पण पवळाच्या मनातली अढी सुटली नाही. आधीच दोघांना व्यसनं जडली होती. भांडणं होऊ लागली. दोघांमधील अंतर वाढत गेलं. पवळाच्या मनाला पडलेला पीळ अधिकच घट्ट झाला आणि तमाशा सोडून, बापूरावांना टाकून पवळा आपल्या गावी गेली. पुन्हा ती आली नाही. वय झालं होतं, सौंदर्य ओसरलं होतं. व्यसनानं घेरलं होतं.

पवळा निघून गेली. तमाशा तर चालायला हवा. पूर्वीपासून बापूरावांवर जीव लावणारी, बापूरावांच्या अडीअडचणीत त्यांना साथ करणारी ताईबाई परिंचेकर ही तमाशा कलाकार होती. या पडत्या काळात तिने बापूरावांना धीर दिला. नवा फड उभा करण्याचा प्रयत्न केला. चंदाबाई या नाचणाऱ्या बाईला व सोबतीला नानीबाई, हबईबाई यांना घेऊन फड चालू केला; पण पवळाच्या नसण्याने फडाला साथ मिळेनाशी झाली. रसिक दाद देईनासे झाले. अलोट गर्दीची नशा असलेल्या पठ्ठे बापूरावांना ही दु:स्थिती आवडली नाही. शेवटी तमाशा कराडला आला. चांदसाहेब पट्टेवाले यांच्या गोरक्षणाच्या जागेत शेवटचा खेळ झाला. कृष्णाकाठच्या या सुपुत्राने कृष्णा कोयनेच्या संगमक्षेत्री दि. १६-८-१९३६ रोजी तमाशाची अखेरची भैरवी गायली. गेली बावन्न वर्षे हाती घेतलेला लोकजागरणाचा डफ व्यथित अंत:करणाने खाली ठेवला.

पवळा गावीच होती. तिच्यावर वृद्धत्वाने आपला अंमल चालवायला सुरुवात केली होती. तमाशा सुटला होता. पैशाचा ओघ आटला होता. खर्चाची तर सवय जडलेली. ऐश्वर्यात आणि ऐषआरामात हौसेने दिवस घालविलेल्या पवळाला आता पैशांची विवंचना छळीत होती. व्यसनाने ती हतबल झाली होती. दम्यानं जर्जर झाली होती. घुंगरांच्या नादात, तमाशावेड्या रसिकांच्या शिट्यांच्या गजरात देहभान विसरून धुंद जीवन जगलेल्या पवळाला खऱ्या

वास्तवाचं भान आलं होतं. आपत्तीच्या काळात कुणाचाच हात मिळत नव्हता. ज्यांचा आधार होता ते माधवराव पैलवानही १९३५ साली परलोकवासी झाले होते. पवळासाठी जीव टाकणारी माणसं कुणीच राहिली नव्हती. या दुःखाने ती ग्रस्त होऊन जाई. मागच्या आठवणींनी ती वेडी होई. पठ्ठे बापूरावांनी तिच्यावर निस्सीम प्रेम केलं होतं. त्यांचा जिव्हाळा ती आठवे. त्यांच्यासाठी झुरत होती. आणि मनात म्हणत होती,

'परमेश्वरा, बापूराव कुठेही असू देत. त्यांना सुखी ठेव. माझे आयुष्य त्यांना दे. त्याच्या लेखणीला बळ दे. लोक मला विसरतील, पण बापूरावांच्या लावण्या चिरंतन राहातील.'

पठ्ठे बापूरावांच्या प्रेमळ आठवणी हाच एक आधार तिला उरला होता. पण आता ती थकली होती. दम्यानं जर्जर झाली होती. आजार जास्त झाल्यावर तिनं गाव सोडलं. एकेकाळी महाराणीसारखी जीवन जगणारी पवळा विकलांग, निराधार बनून मुंबईच्या वाटेला लागली. तिचा भाऊ लक्ष्मण तबाजी भालेराव यांचे घरी नागपाडा, डंकन रोड (आताचा मौलाना आझाद रोड) येथील पिवळी माडी येथे रहावयास आली. परंतु आजार बळावला. येथेच दिनांक ६-१२-१९३९ रोजी तिचा अंतकाळ झाला. एका थोर स्त्री कलावंताची अशी शोकांतिका झाली. तिचा पार्थिव देह ज्ञातीच्या रिवाजाप्रमाणे वरळी (हेन्स रोड) येथील स्मशानभूमीत पुरण्यात आला. जिला बघण्यासाठी मुंबईत तिकीट लावून गर्दी उसळत होती, तिचा याच मुंबई नगरीत मनाला पीळ पडेल अशा दैन्यात उपेक्षितपणे अस्त झाला.

पठ्ठे बापूरावांची दैवगती फिरली. जिच्यासाठी बापूराव बाटले, जिच्यावर त्यांनी जीव ओतला ती पवळा केव्हाच चालती झाली होती. फडातील साथीदार पांगले होते. शिळ्या पैशांचे तोंड पहायचे नाही अशी चैन भोगली तो पैसाही जवळ राहिला नव्हता. विपन्नावस्था आली होती. ज्या गावाचा अभिमान त्यांनी लावण्यांतून मिरवला होता, त्या गावानं बहिष्कार टाकला होता. धीर देणारं माणूस उरलं नव्हतं. ते पूर्ण निराधार झाले. त्यांना अखेरपर्यंत आधार देणारी एकच व्यक्ती त्यांच्या आयुष्यात जवळ राहिली होती, ती म्हणजे ताई परिंचेकर. तिच्याबरोबर ते पुण्याला गेले. स्वारगेटजवळ झोपडीत राहिले.

वैपुल्यांनी नटलेली अशी शब्दांची टंकसाळा ज्यांच्या जिव्हाग्री ऐन उमेदीत नाचत होती, त्या मतलबी व्यवहारातल्या चलनी नाण्याच्या टंकसाळेनं त्यांच्याकडं पाठ फिरवली होती. 'बिकट वाट वहिवाट' वाट्याला आली होती,

त्याचवेळी तमाशात आयुष्य घालवणारी खालच्या समाजातील ही ताई परिंचेकर त्यांना आधार द्यायला पुढे आली. ज्या ज्या वेळी पठ्ठे बापूरावांच्या जीवनात संघर्ष उभा राहिला, त्या त्या वेळी ताई धिटाईनं पुढं झाली. तडजोडी केल्या. प्रसंग निभावून नेले. बापूरावांच्या जीवनातील अनेक चढउतारांची ती साक्षीदार होती. बापूरावांच्या बुद्धिमत्तेवर, त्यांच्या कलेवर तिनं श्रद्धाभक्तीनं प्रेम केलं होतं. याच निष्ठेनं तिनं बापूरावांचा प्रतिपाळ केला होता. एका कलावंताला सांभाळणं तसं अवघड. पण ती जोखीम तिनं मनापासून स्वीकारली होती.

ती मोलमजुरी करी. रोजगाराला जाई. बापूरावांना सांभाळी. मुळात तीच निष्कांचन. पण तिनं सचोटी सोडली नाही. दारिद्र्य, दैन्य, कंगालपण आलेल्या एका थोर कलावंताच्या दुर्दैवी काळात तिनं आपलं दुःख बाजूला ठेवलं. बापूरावांच्या जखमी काळजावर फुंकर घालण्याचं काम केलं. ती बापूरावांना आपल्या परिंचे गावी घेऊन आली. तिथं तिनं कुडामेढीचं खोपटं उभारलं. पांगाऱ्याचा कूड हाच निवारा होता. जवळच महारवाडा. भोवतीनं ओसाडी. समोर निर्मळदासाचा मठ. एक पारकट्टा.

बापूराव चटईवर बसून असायचे. कुडाला कोट अडकवलेला असायचा. कधी धोतर, तर कधी धोतराची लुंगी लावलेली असायची. गळ्यात रुद्राक्षाची माळ. गांजा ओढायचे. आपल्याच तंद्रीत असायचे. कुठं कुणाकडं जाणं-येणं नसे. कधी पारावर बसायचे. निर्मळदासाच्या मठात जायचे.

सुंदर, संपन्न कृष्णाकाठी जन्मलेले, औंधच्या राजाकडे शिकलेले, बडोद्यासारख्या श्रीमंती घरात सुख भोगलेले, कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांच्या हातून सोन्याचं कडे मिळवलेले, ज्यांना पहायला मुंबई नगरीनं तिकीट लावलं, पुणे नगरीनं अनेक मानाचे तुरे ज्यांच्या शिरपेचात खोवले त्या पठ्ठे बापूरावांना अशा जागेत, साध्या कुडामेढीच्या चंद्रमोळी खोपटात अखेरचे दिवस काढावे लागले. विकलांग मनःस्थितीच्या त्यांच्या यातना त्यांनी इथंच भोगल्या. गाजलेल्या फडांचे रम्य दिवस आठवून सूख मानत होते. त्यांनी आपल्या कवनात,

*'जरीपटक्याचा हत्ती मिरविला।*
*शहाण्णव कुळीचा हट्ट पुरविला*
*दुष्मनाचा काटा जिरविला*
*पठ्ठे बापूराव कवीच्या मौजा*
*नित्य नव्या ताज्या।'*

असा नऊ खंडात नगारा पिटला त्या पठ्ठे बापूरावांची गणातील

'माय शारदा येऊनी संपदा
भक्ताची आपदा दूर करी
धरूनी आबदागिरी तिची त्याच्या शिरी
आपल्या हाताने चौऱ्या वारी।'

ही माय शारदाही या आपत्काळात या शारदापुत्रावरचं फाटकं छप्पर कोसळत असता सावरू शकली नाही. भणंग दारिद्र्य मात्र या कविरायावर चौऱ्या ढाळीत होतं. ताई परिंचेकर मिळेल ते काम करून दोघांचे पोट भरीत होती.

इथंही निभाव लागला नाही. परत पुण्याला यावं लागलं.

बापूराव आपल्या गावी, हरणाक्ष रेठरे येथे आले. बरोबर ताई परिंचेकर होतीच. गावाने बहिष्कृत केले होते. घरातही अटकाव होता. तशा स्थितीत मोरे यांच्या मळ्यातील घरी राहिले. जंगली महाराजांच्या मठात जात. तेवढीच त्यांना मानसिक विश्रांती होती. आजूबाजूच्या तमाशा फडातील मंडळी भेटत. त्यांना लावण्या लिहून देत असत. घर पडायला झाले होते. त्यांनी ते तीनदा बांधण्याचा प्रयत्न केला होता. पण घराने उभारी धरली नाही. त्या घराला आणलेली लाकडे अखेर राममंदिर बांधण्यासाठी उपयोगाला आली. घराची माती झाली. चौदा चौकड्याच्या, सज्जाच्या वाड्याची कवनं करणाऱ्या पठ्ठे बापूरावांना परक्याच्या मळ्यातील झोपडीवजा घरात दिवस कंठावे लागले. जवळ गांजाची चिलीम असे. गांजाच्या नशेत गतकाळ आठवणं हेच हाती उरलं होतं. कुत्र्याचा छंद अजूनही तसाच होता. एक झिप्री काळी कुत्री बाळगली होती. तिची नीट निगा राखीत. पठ्ठे बापूरावांनी आपल्या तत्त्वांशी कधीच मुरड घातली नाही.

लोकांनी अवहेलना केली. गावानं उपेक्षित ठेवलं. घरच्यांनी दुर्लक्षित केलं. बापूरावांना हे असह्य होई. आपण येथे का आणि कशासाठी राहायचे असा विचार मनात डोकावू लागला. गावात कुणाचं प्रेम नव्हतं, जिव्हाळा नव्हता. रुक्ष, कोरडे, अवमानित जिणं वाट्याला आलं. शेवटी जंगली महाराजांच्या मठाचं अखेरचं दर्शन घेतलं. व्यथित अंत:करणानं जन्म लाभलेला गाव सोडला.

# १०. अखेरची भैरवी

पुण्यात येरवड्याच्या झोपडपट्टीत राहिले. ताई परिंचेकर या बाईने शेवटच्या या कंगाल काळात बापूरावांना जिवाचं रान करून सांभाळलं. नाना परीचे कष्ट उपसले. स्वतः हालअपेष्टा सोसल्या. आपण अर्धपोटी राहिली. पण या कलंदर शीघ्रकवीचा प्रतिपाळ केला. बापूरावांची दैवगती अजब. कालगती तर काळजाला घरे पाडणारी. आपल्या वाट्याला आलेल्या स्थितीबद्दल एका 'छक्कड'मध्ये बापूराव म्हणतात,

'इकडे आड आणि विहीर तिकडे
किती कंठावे दिवस कुढे
विचित्र गती माझ्या दैवाची
कहाणी भान माझा सारा उडे
अंतकाळी कठीण व्यथा।
मग झाला व्याकुळ पुरता।'

अशी विचित्र गती वैभवाचा काळ भोगलेल्या कलगी-सम्राटाच्या नशिबी आली होती. तरीही त्यांच्या उदार अंत:करणाची साक्ष एका प्रसंगातून प्रत्ययाला येते. राजा हरिश्चंद्राप्रमाणे नियतीने पठ्ठे बापूरावांचे सर्व काही हिरावून नेले होते. कितीही हलाखीत त्यांनी अंगची वृत्ती आणि इमान सोडले नव्हते. एकदा त्यांना पुण्यात एके ठिकाणी जायचे होते. त्यांनी एक टांगा थांबविला. तो टांगेवाला हा दाढी वाढलेला, भाळावर दैन्याची निशाणी दिसणारा, झडझडीत मोकळा फकीर बघून आपल्या टांग्यात घ्यायला तयार नव्हता. पठ्ठे बापूरावांनी विनंती केली. एक म्हातारा म्हणून नाईलाजाने आणि नाराजीने त्यांना टांग्यात घेतले. भाडे मिळणार नाही अशी त्याची ठाम कल्पना. कपाळाला सतराशे साठ आठ्या घालीत त्याने घोड्याला चाबूक मारला. बापूरावांचे काळीज झरझरले. उतरायच्या ठिकाणी टांगेवाला तणतणू लागला. बापूराव शांतपणे खाली उतरले. त्याला जवळ बोलावले. धोतराचा कमरेचा तिढा सोडायला लावला. कमरेचा करदोडा काढायला लावला. करदोडा सोडल्यावर टांगेवाला

चकीत झाला. डोळे विस्फारून पाहू लागला. बापूराव त्याला म्हणाले,

'घे तुझे भाडे.'

टांगेवाल्याला काही कळेनासे झाले. नुसता हातातील करदोड्याकडे पाहात राहिला. बापूराव प्रेमळपणाने म्हणाले,

'तुला भाडे हवे आहे ना?'

'हो.'

'मग घे ना. माझ्याकडे पैसे नाहीत. ह्या एवढ्या अंगठ्या आहेत.' टांगेवाल्याने भीत भीत एक अंगठी काढून घेतली. करदोडा परत देऊ लागला. तेव्हा बापूराव म्हणाले,

'घे. त्या साऱ्याच अंगठ्या घे.'

'पण...'

'सांगितलं ना. घेऊन जा त्या अंगठ्या.'

टांगेवाल्याने त्या करदोड्याकडे पाहिले. त्यात अडकवलेल्या पाच-दहा अंगठ्या होत्या. तेवढ्यात बापूराव झपझप पुढे निघून गेले. थोडे परत वळले आणि म्हणाले,

'माझ्यासाठी त्या घोड्याच्या पाठीवर चाबकाचा उठलेला वळ आहे, तो वळ बुझला आहे का पहा. तो बुझला असेल तर तो माझ्या काळजावर असेल.'

बापूराव तरातरा निघून गेले.

टांगेवाला त्या तऱ्हेवाईक, लोकविलक्षण माणसाकडे पहातच राहिला. बापूराव आपल्या बाण्यापासून कधीही ढळले नाहीत. केल्या प्रतिज्ञेपासून कधीही वंचित राहिले नाहीत. दारिद्र्याने कहर केला तरी मन विचलित होऊ न देणारा हा दिलदार दाता पुण्याने पाहिला. आपण आपल्या कोणत्याही उच्चारलेल्या प्रतिज्ञेशी वा शब्दाशी त्यांनी कधीच प्रतारणा केली नाही. बापूराव शिळ्या पैशाचे तोंड पहात नसत. पण त्यांना सोन्याचा लोभ होता. तो लोभही होत्या नव्हत्या तेवढ्या जपून ठेवलेल्या सोन्याच्या अंगठ्या निर्मम वृत्तीने देऊन सोडून दिला.

मुंबई-पुण्याच्या लिहिलेल्या लावण्यांनी सोन्यानाण्याचा पाऊस रंगमंचावर पाडला होता; बापूरावांनी लिहिलेली 'समग्र तीर्थांची लावणी' त्यांच्या काव्यप्रतिभेच्या वैभवाची साक्ष पटविते. 'धान्याची लावणी' तर त्यांच्या शब्दसंपत्तीची आणि इतर शेकडो लावण्या त्यांच्या मनाच्या श्रीमंतीची साक्ष देतात. पण त्याच या शब्दसम्राटानं

*'वैऱ्याने हवेली उचलून नेली*
*पाल्याची झोपडी आणून ठेवली।*
*आपल्या दोघांची मस्करी केली*
*त्याने मौज पाहिली जी।*
*कुडाचे कोपट वरती घाली॥*
*मध्येच एक मेडके त्याला*
*तडकी बांधली दाराला*
*महाल केला जी।*
*तुटके जाते*
*फुटका परळ*
*दमडीच्या कवड्या नाही जवळ*
*भीक मागायची आणली वेळ॥*

असंही करंट्या जीवनाचं आतड्याला पीळ पाडील असं वर्णन केले आहे. लाल रंगमहालातील अभरणीच्या मंचकावरच्या पराच्या गाद्या नी मखमली गिरद्यांच्या, उंच माडींच्या लावण्या भोगणारा हा कवी दुर्दैवाच्या काटेरी फड्यात अडकला होता.

*'पठ्ठे बापूराव कवीचा पाळणा*
*झोके देऊ हळू मजेदार।'*

असे मराठी मातीतल्या रांगड्या मनाला हिंदोळ्यावर झुले देणारा हा मनहौशी कवी दसरा-दिवाळीच्या प्रकाशरंगी क्षणांचे मनधुंद असे चित्रण करताना रमून जातो.

*दसरा गेला। दिवाळी आता।*
*येईल उद्या परवा।*
*राया मला जरतारी शालू*
*आणा पैठणचा हिरवा।*

*मखराभवती दारे लावा*
*थाटमाट करावा।*
*गडणी माझ्या बोलवा*
*साऱ्यांनी ओटी माझी भरवा।*
*गाडीतून फिरवा मजला*
*पालखीत मिरवा।*
*हळदी कुंकवामध्ये माझे*
*अंग सारे मुरवा।*
*विचार सांगते मी बरवा*
*तोच कित्ता गिरवा*
*पठ्ठे बापूराव कवीच्या कवीने*
*हौस माझी पुरवा।'*

अशी मुरमुशी आणि गुलमुशी फुलत्या मनाची भावना रंगविणारा लावणीकार गांजाच्या कैफात विरलेली स्वप्ने विस्कटलेल्या काळात पहात होता.

तसेच,

*सारंगपाणी घ्या चिपळी। मारा कळी*
*जणू काय आजच दिवाळी।*
*चंद्र-सूर्याच्या वाती लाविल्या*
*पृथ्वीची केली आरती*
*शेष फणावर उभी राहुनी*
*गिरजा शिव ओवाळी।*

अशी भव्य कल्पनेची कवने त्यांनी गायिली होती.

*मैना पालखी हत्ती*
*घोडा देऊ, कंचन पुरधाम*
*बागबगीच्या, महाली ऐन्याच्या*
*दासी करतील काम!'*

असं प्रियेला अभिवचन देणाऱ्या जरतारी मनाच्या कवीला तारील असं काही राहिलं नव्हतं. त्यांनी 'दिवाळीची छक्कड'मध्ये लिहिले होते -

*'दिवाळीला काल बाई*
*दिवाळीला काल,*
*पती रंगलाल खेळले गुलाल।*
*माझी सारी वस्त्रे झाली लालेलाल*
*केला रंगमहाल बाई केला रंग लाल।*
*हिरवा मोती लाल मैना केली न्हाल*
*पठ्ठे बापूराव कवीची चमकली ढाल।'*

अशी श्रीमंत मनाने एकेकाळी अशा दिवाळीचा रंग खेळणाऱ्या, अमृतमयी स्वप्ने रंगविणाऱ्या, ऐने महाली काळजाला सहस्त्र वेदना देणारी दिवाळी बापूरावांच्या दुर्दैवी नशिबात आली.

पुण्यात सर्वत्र दिवाळी साजरी होत होती. आकाशदिव्यांच्या रोषणाईने सारे पुणे झगमगले होते. फटाक्यांच्या माळांचे आवाज सर्वत्र घुमत होते. लहान-थोर दिवाळीचा आनंद लुटत होते. सर्वांच्या घरोघरी आनंदीआनंद भरला होता. झोपटपट्टीही आकाशदिव्यांनी उजळून गेली होती. वर्षभराच्या कष्टाचा शीण दिवाळीनं घालविला होता. अवतीभवती उत्साह ओसंडून राहिला होता. त्याचवेळी याच झोपडपट्टीतल्या एका झोपडीचा जीर्ण कोपरान् कोपरा घासलेटच्या दिव्याच्या काजळीनं अंधारून गेला होता. एके काळी संस्थानिकासारखा जगणारा लावणीसम्राट विझू आलेल्या दिव्याचे शेवटचे हुंदके पाहात होता. रेंगाळणारा अंधुक प्रकाश काजळत चालला होता. पठ्ठे बापूरावांनी आपल्या एका लावणीत 'आपली मती बारा सूर्यांचा प्रकाश जैसा' असा डिंडीम वाजविला होता, त्याच पठ्ठे बापूरावांना प्रकाशातल्या त्यांच्या लौकिकाला अंधार घेरत चालला होता. ताई परिंचेकरला काळजीने ग्रासून टाकले होते. झोपडीत काहीच नव्हते. किडुकमिडुक सारे देऊन झाले होते. दुकानदाराच्या पदरात टाकण्यासारखं आता काहीच उरलं नव्हतं. निदान दिवाळी दिवशी अंधार नको म्हणून ताईचं अंत:करण हळहळत होतं. डफ, तुणतुणं तेवढं उरलं होतं. महाराष्ट्राच्या मातीत जागर उठविणारी ही साधनं कुडाला अडकलेल्या ठिकाणी मूक होऊन पडली होती. कोपऱ्यातली ढोलकी, जिनं मराठी मनं झुलवली, टाळ्या-शिट्यांचा कल्लोळ धुंदीनं भोगला, ती या शाहिराबरोबर भोगता येतील तेवढे भोग भोगत कुडाशी खिळून होती. फाटक्या तटकरावर बसलेले बापूराव अवघडून आणि बावरून गेलेल्या ताईला म्हणाले,

'ताई, बाहेर जग दीपोत्सव साजरा करतंय. निदान आपल्या झोपडीत

आजच्या दिवशी तरी अंधार नको. ऊठ...'

'काय करू उठून?' ताई आतल्या आवाजात म्हणाली.

'वाण्याकडं जाऊन रॉकेल तरी घेऊन ये.'

'रॉकेल आणायचं?' उरलं-सुरलं विकून झालंय. कसं आणायचं?' कोण देईल?' पूर्वीचे दिवस राहिले नाहीत. वाट्याला आलंय ते भोगायचं. अंधाराशिवाय कोण उरलंय साथीला? तोच आता त्राता.' चिंतेने ताई बोलली.

पठ्ठे बापूराव वेदवेदान्ताचे व्यासंगी. मानवधर्मी संस्कृती जपणारे होते. ज्याने मराठी मुलखातल्या घराघरात भेदिक लावण्यांच्या रूपाने ज्ञानाचे आणि रंजनाचे दीप उजळले होते, त्यांना हा आजचा दिवाळीचा अंधार न पेलवणारा होता. ज्यानं दोन लाख चाळीस हजार लावण्या लिहून मराठी तमाशा फुलवला होता, त्याचे मन मोठे उदार होते.

*'महत्वाकांक्षा मनात एवढी*
*ठेवून बाजूला हजार नडी*
*आपण तरोनी कैक तरावे*
*भवबंधाच्या पैलथडी*
*असे म्हणोनी घोडा सजविला*
*पैज लावली चढाओढी ।*
*दोन लक्ष आम्ही केली लावणी*
*केवढी म्हणावी बात बढी ।'*

असा शब्दांचा लक्षाधीश! मराठी मनात चैतन्याचे दिवे पेटविण्यात उभे आयुष्य घालविले त्या पठ्ठे बापूरावांना आजचा अंधार असह्य होत होता. चैतन्याच्या त्या प्रकाशपूजकाने ताईला सांगितले,

'ताई...'

'काय?' मिटत्या अंधारातून ताईचा खोलवरचा आवाज आला.

'ती कोपऱ्यातील पेटी उघड...'

'आणि?' ताई काळजीनं म्हणाली.

'पेटीतील लावण्यांचे कागद घे. वाण्याला घाल. त्या कागदांच्या रद्दीच्या किंमतीचं रॉकेल घेऊन ये.'

ताई दचकली. थरारली. म्हणाली,

'कागदावर लावण्या आहेत ना?'

'असू देत. अजून या पठ्ठे बापूरावांची लेखणी जिवंत आहे. ती आहे तोंवर अशा लाख लावण्या लिहून होतील. आतापर्यंत लावण्यांच्या कागदावरच तगलोय, हे खरं असलं, तरी आजचा दिवस वेगळा आहे...'

ताईला बापूरावांचा निर्धार माहिती होता. आतापर्यंत त्यांनी उच्चारलेला शब्द मागे घेतला नव्हता किंवा शब्दांची पेरणी करणाऱ्या या शाहिराने कधी शब्दही फिरवला नव्हता. म्हणून तर ताई निष्ठेने या कलंदरावर लोभ ठेवून होती. आपल्या आयुष्याची किंमत मोजत होती. ती उठली. कडी-कोयंडा नसलेल्या त्या जुनाट पेटीतले कागद रद्दी घालण्यासाठी तिने घेतले. तिचे हात थरथरत होते. डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या होत्या. ज्या लावण्यांच्या बळावर उभा महाराष्ट्र खुलला होता, झुलला होता, डोईचे फेटे उडवून दाद दिली होती, शिट्या घालून नाचला होता. 'शाब्बास पठ्ठे' म्हणून शाबासकी दिली होती, त्या लावण्यांचे कागद घेऊन ताई वाण्याच्या दुकानात गेली. त्याने रद्दी म्हणून लावण्यांचे कागद घेतले. तेथे काही कारणाने उपस्थित असलेल्या नाना साठे यांनी ते कागद सहज चाळले. चाळता चाळता त्यांना त्या लावण्या पठ्ठे बापूरावांच्या आहेत असे लक्षात आले. ते स्वतः पठ्ठे बापूरावांच्या तमाशाचे आणि लावण्यांचे चाहते होते. त्यांनी ते कागद आपल्याकडे घेतले. वाण्याला रॉकेल घालायला सांगितले. रॉकेलचे पैसे स्वतः साठेंनी दिले आणि लावण्यांचे कागद बापूरावांना परत आणून दिले. अंधारात बुडालेली झोपडी उजळली.

साठे म्हणाले,

'ही मराठी मुलखाची दौलत आहे. सांभाळा.'

पठ्ठे बापूरावांच्या काळजातला तालेवार गदगदून गेला.

# ११. पठ्ठे बापूराव यांच्या भेदिक लावण्या

तुकारामबुवांचे अभंग इंद्रायणीच्या डोहात तरले तसेच या तमासगीर 'बुवांच्या' लावण्या लोकगंगेने तारल्या. त्यांनी सर्व प्रकारच्या लावण्या लिहिल्या. उदाहरणार्थ,

*आधी गणाला रणी आणला*
*नाही तर रंग पुन्हा सुना सुना*
*धन्य शारदा, ब्रह्मकन्यका*
*घेऊन येईल रुद्रविणा*
*साही शास्त्रांचा मंत्र अस्त्राचा*
*दाविल यंत्र खुणा खुणा*
*सद्‌गुरु माझा स्वामी जगत्गुरु*
*मेरुवरचा धुरू आणा आणा*
*ब्रह्मांडाभवता । तो एक सवता*
*दिवाच लाविल । म्हणा म्हणा*
*माझ्या मनाचा । मी-तू पणाचा*
*जाळुनि केला चुना चुना*
*पठ्ठे बापूराव कवीच्या कवनाचा*
*हा एक तुकडा जुना जुना ।'*

असा मानवी जीवनातील 'मी-तू'पणाचा चुना करणारा गण तमाशाच्या कोणत्याही फडात गायिला नाही असं कधी होत नाही. पठ्ठे बापूरावांच्या गणांनीच ऐंशी टक्के तमाशा फड सुरू होतात. जे जे 'सत्' त्या सत्‌चा आदिकर्ता हा गणनायकच असतो. त्याच्या स्तवनाने एक उदात्त, पवित्र आणि मंगलमयी, स्फूर्तीदायक वातावरण तयार होते. 'सत्'च्या विविध रंगच्छटा वर्णन करणारे 'गण' पठ्ठे बापूरावांच्या लेखणीतून उतरले आहेत. त्यांनी लिहिलेल्या भक्तीपर आणि शृंगारप्रधान गौळणींची संख्याच अगणित आहे. गौळणी लिहाव्यात त्या पठ्ठे बापूरावांनीच. गौळणीतून चित्रित झालेले विविध

भावरंग मोठ्या खुमारीचे आहेत. त्यांनी लिहिलेला 'छक्कड' हा प्रकार तर सर्वसामान्यांचे रंजन तर करतोच. पण भरकटलेल्या डोळ्यात अंजनही घालतो. त्यांनी किती तरी फार्स लिहिले आहेत. यातून हसतखेळत एखाद्या सामाजिक व्यंगावर प्रकाश टाकलेला असतो. पुढे सादर होणाऱ्या उद्‌बोधक वगाच्या आधी प्रेक्षकांच्या मनाचा कोपरान् कोपरा खळखळवून विकल्पाच्या पलीकडे नेला जातो. त्यांचा 'मिठाराणी' चा वग अत्यंत गाजलेला वग आहे. त्यांनी पोवाडे लिहिले. त्यांनी हिंदीमधील 'कव्वाली'ही लिहिली. लावण्यांचा तर सम्राटच. भेदिक लावण्यांतून आलेले त्यांचं चिंतन, वाचन, बहुश्रुतता, अध्यात्मिकाची असलेली थक्क करणारी डूब रसिकांची मने जिंकून जाते.

पठ्ठे बापूरावांच्या शृंगारिक लावण्यांतील खुमारी चित्तचोरीची असते तर भेदिक लावण्यांतील अध्यात्म वेगळ्या उंचीवर नेणारे आहे. एकदा म्हटलेली लावणी पुन्हा म्हणायची नाही अशी त्यांची प्रतिज्ञा होती; त्यामुळे त्यांच्या हातून असंख्य लावण्या लिहून गेल्या. त्यांच्या केवळ भेदिक लावण्याच किती तरी आहेत. त्या वाचल्या की त्यांच्या वाचनाचा आवाका आणि बुद्धिमत्तेची क्षमता ही अवाक करणारीच आहे. उदाहरणादाखल एक नमुना -

*चौदा ब्रह्म रामदासस्वामींनी सांगितले*
*तेच निरूपण बृहस्पतीने इंद्रासी कथिले*
*सोहं शब्द शाश्वतशुद्ध ब्रह्म पहा पहिले*
*सत सत्रारूपी ब्रह्म दुसरे नैमित्तिक चाले*
*आनंद ब्रह्म निव्वळ निश्चळ एकांती डोले*
*चिद्‌ब्रह्मचि ते खरे चैतन्य जंगम वस्तू डोले*
*निर्गुण ब्रह्म गुणातीत ते मुखाविण बोले*
*सगुण ब्रह्म भक्तासाठी कष्टत असे वहिले*
*क्षर ब्रह्म आढळ आचळ सम ठेले*
*अक्षर ब्रह्म आरूप आलेख चतुराईने खेळे*
*वाचा ब्रह्म ध्रुव कुटस्थ जिव्हेविण बोले*
*अनिर्वाच्य ते ब्रह्म शाहिरा गुरुकृपेनें झेले*
*विश्व ब्रह्म ते अवघेचि व्यापुनी दशांगुळे उरले*
*परब्रह्म ते परेहुन परते लक्षी ना भरले*
*ज्योतिर्ब्रह्म आलेख निरंजन आजपासुनी मुरले*
*पठ्ठे बापूराव कवी म्हणे येथून आख्यान पहा सरले।*

अशा आशय स्वरूपाच्या भेदिक लावण्या किती पहाव्यात!

*'आम्ही एक सुंदरा पाहिली शेषफणीवर उभी*
*तिची तारीफ काय सांगू तुम्हाला आग्न लावती नभी!'*

अशा गूढ स्वरूपाच्या लावण्यांतील कोडी उलगडता उलगडता रसिक विस्मयित होऊन जातो.

किंवा

*'म्हणशी शिवाला थोर परंतु मन तुझे चळले*
*मला वाटते खरे ज्ञान नाही तुला कळले*
*मूळ पीठवासिनी पहाता आदि मूळमाया*
*तिने निर्मिले ब्रह्म, विष्णू, शंकर देवत्रया।'*

पुराण ग्रंथांतील अनेक संदर्भांवरील लावण्या तर मनाला मोहिनी घालणाऱ्या आहेत. सप्तऋषींचा जन्म कसा झाला ते सविस्तर वर्णन त्यांनी केले आहे.

*'सप्त ऋषींचा जन्म सांगतो तुजला पंडिता*
*सादर होऊनी अर्थभेद हा ऐकावा आता।'*
*विधी जन्मला महाविष्णूचे नाभिस्थानात*
*सप्त ऋषी तेथुनी जन्मले ब्रह्माचे सुत।'*

याचप्रमाणे स्त्रियांच्या ठायी असलेल्या 'सात खोडी' त्यांनी एका लावणीत रंगविल्या आहेत. दहा अवतारांची जन्मकथा, तसेच अकरा रुद्रावरही त्यांनी लावण्या लिहून चातुरी दाखविली आहे. चौदा रत्नांचा जन्म, चौदा भुवने, मानवी जीवनातील बावन्न ब्रिदे, पराक्रमी बावन्न वीर कोणते यावरही स्वतंत्र भेदिक लावण्या त्यांनी रचलेल्या आहेत. शंकराच्या पिढ्या कोणत्या, नारदाच्या साठ पुत्रांची नावे, पार्वतीचे अवतार, राजे, सूर्यवंशाची कहाणी, वशिष्ट गोत्र इत्यादींची कवने अत्यंत चिंतनशीलतेने त्यांनी केली आहेत. ती वाचताना आपण चकीत होऊन जातो. 'तोंड' या विषयावरच्या लावणीत ते म्हणतात,

*'सर्वच झाले जुने परंतु नवे आहे एक*
*नाही पाहिले कुणी कधी ही सांगतो मी एक*
*पृथ्वी, आप, तेज, वायू आकाश हे पहिले*
*चंद्र सूर्य, नक्षत्रादिक सर्व जुने जाहले*

*ब्रह्मा, विष्णू, शंकर पहाता हेही जुने ठरले*
*एकवीस स्वर्ग सप्त पाताळे हेही जुने देख*
*सर्व पाहिले जुने परंतु ऐका एक नवे*
*'सूरत' वस्तू ही नवी पहाता ही कळली अनुभवे*
*वस्तूसारख्या अनंत वस्तू जगी आहेत ठावे*
*सुरतीसारखी सुरत नाही मनात शोधावे!'*

आपल्याला कृष्णाची मुरली माहिती आहे; पण तिची अद्‌भुतरम्य अशी जन्मकथा पठ्ठे बापूरावांनी लिहिली आहे.

*'एक प्रश्न पुसतो तुम्हाप्रती । वाचुनि पहा जा ग्रंथी ।*
*विचार करा चित्ती । सांगा त्वरित उत्तर मजप्रती ।*
*कृष्णमुखी मुरली जी होती । का देवांनी धरली हाती ।*
*पहिल्या जन्मी ती । कोण होती सांगा माहिती ।'*

असा कवीने सूज्ञांना प्रश्न टाकला आहे. ते पुढे विचारतात,

*'कुणासंगे केले लग्न । पुढे काय आले विघ्न ।*
*भक्षिला का तिने आग्न ।*
*कुण्या स्वरूपी झाली मग्न । गेली मोक्षाला का नरकाला ।*
*तुम्ही पंडिता सांगा सर्व उकाळा ।'*

अशा मुरलीला सती का जावे लागले, तिने कुणाला शाप दिला आणि कलीयुगी तिचा अवतार कोणता आहे असे प्रश्न त्यांनी विचारले आहेत. पठ्ठे बापूरावांच्या काळात तुरेवाले आणि कलगीवाले यांच्यात असे झगडे होत. सवाल-जवाब झडत. पठ्ठे बापूराव संस्कृत चांगले जाणत. अनेक ग्रंथ त्यांनी वाचले होते. आध्यात्मिक ग्रंथांबद्दल अधिक आस्था होती. या अशा प्रसंगांतून त्यांची बहुश्रुतता अनुभवाला येई. अनेक भेदिक लावण्या बहुश्रुततेच्या निदर्शक आहेत. म्हणूनच बापूराव आपल्या रचनेविषयी -

'पठ्ठे बापूराव किंकर । करी जडण सरळ अक्षर । काढुनिया सार ।
झाला अक्षर गुरूमदी भ्रमर । वाचुनिया नीट ग्रंथ । कादुनिया शुद्ध मत ।
होते कवित्व सतत । कलगी झळके उफावरत ।'

असे सार्थ अभिमानाने उद्‌गार काढता. त्यांचे काव्य म्हणजे,

*'असंख्य कवींच्या कवन सज्जावरी । जणू चमकल्या सहस्त्र विजा ।'*

असे विजांचे चपकारे बसावे असे होते.

आपण कलगीवाले आहोत याचा दाखला त्यांनी आपल्या कवनात दिला आहे.

*'आम्ही कलगीचे नागेश वळीचे आमचा आखाडा कृष्णा थडी।*
*गाव आमचे रेठरे हरणाक्ष जंगली बुवाची लागे गुढी।'*

सर्व जनाला चाळवणाऱ्या 'माये'बद्दलही अत्यंत रसवत्तापूर्ण अशी त्यांनी भेदिक लावणी लिहिली आहे, त्या लावणीत,

*'अति नटरंगी सुंदर रूपवती आली ठकडी नार।*
*मोठमोठ्याला फसवुनी गेली दगा दिला फार।*
*त्या शून्याच्या वरी नेटकी उभी ती राहून।*
*ज्ञान दृष्टी लावून पाहती सर्वाला न्याहाळून।*
*चारीही सुभे आपल्या हातामध्ये बळकट ठेवून।*
*तोंडाकडे पहाताच सर्व जग गेले मोडून*
*भूल पाडून कैक जणाला केले गपगार।'*

सर्वसामान्य माणसाला ही 'माया' दिशा दर्शन करणारी आहे.

'आत्म्याशी गुज' या लावणीत बाह्यांतरीची कुडी या फसवून निघालेल्या आत्म्याशी म्हणते,

*'कुडी आत्म्याला अंतरीचे सांगती गुज।*
*सोडुनी जाता नाही कशी तुम्हाला लाज॥ धृ॥*
*तुला चारिली मी नित्य पाची पक्वान्न*
*ऊन सूर्याचे नाही दिले मुळीच लागून*
*तू करसी चोरी मला नेऊनी बांधती जन*
*कष्ट सोशिले मी तुझ्यासाठी दारूण।'*

कुडी सर्व यातना साहन करून आतील आत्म्याचे संरक्षण करते, पण आत्मा दुष्मनासारखा तिला सोडून जातो. पठ्ठे बापूरावांनी 'आत्मा-कुडी'च्या द्वंद्वात सामाजिक जीवनातील एका सत्यावर प्रकाश टाकला आहे.

'माया' - 'ब्रह्म' याविषयी बापूरावांनी सशास्त्र चिंतनाचे चित्रण अनेक लाण्यातून केले आहे. अध्यात्म हा त्यांच्या आवडीचा विषय आहे.

'सत्य समज रे ब्रह्म तेचि तू नटलासी पूर्ण' असे सांगून ते मूळ सत्यापाशी आणतात आणि सांगतात,

'आध्यात्मिक ह्या खुणा अनुभवुनी नीट घ्याव्यात चित्ती.' अशा साक्षात अनुभवाला सामोरे गेले तर त्याचा नीट अर्थ लागतो.

तसेच 'आम्ही एक गाय पाहिली घ्यावी ओळखून' ह्या 'गुरूघरची खूण', या भेदिक लावणीत, ही अचंबित करणारी माया उभी केली आहे.

'पाण्याला बहु तहान लागली शोक फार पडला।
पाणी पाणी म्हणे थुंडीत हिंडे रानीवनाला।'

याप्रमाणे 'उलटी खूण' या भेदिकात, व 'ज्याच्यावर झाली कृपा' या कवनात,

'...आम्ही एक मुंगी देखियली।
अशी भयंकर मुंगी आपले मुख जेव्हा रगडी
ब्रह्मांडाची घडी करूनी दाढेमध्ये रगडी।'

यांसारख्या लावण्यांतून 'निरंजन' तत्त्वांची मांडलेली शक्तिमत्ता आपल्याला चकीत करून टाकते. पठ्ठे बापूराव म्हणतात,

'आदि अनादि प्रथमचि होता पहा शून्याकार।
नव्हते मेरूमांदार पार एक शून्यची ते सार!'

म्हणून जनसामान्य प्रापंचकांना पठ्ठे बापूराव उपदेश करतात,

'अतिभयंकर आहे प्राण्यांनो मायेचा भवरा।
जावू नका गर्वाने फुगुनी फसाल आपले मन आवरा।'

अध्यात्माची न उमगणारी आणि अल्पमतीला न उलगडणारी कोडी बापूराव घालत रहातात. 'अतिशय सुंदर एक पुरुष मी नेत्री पाहिला' तो चमत्कारिक पुरुष कसा अजब आहे? तो 'त्रिभुवन ग्रासुनी त्रिगुणांसहितची पंचभुते मारी।' असा आहे. 'सभारंगणी याचा अर्थ तुम्ही करा सारा' या लावणीत 'ऊर्ध्व वाटे निघे गंगा मेरूगिरीच्या शिखराला। त्या ठायी एक पंचरंगाची पक्षी देखियला।'

त्या पक्षाला एकवीस पाय आणि नऊ शिरे होती, बावन्न पंखे, तीन डोळे होते. पण 'त्रिभुवनी साऱ्या चारा चरिते परि नव्हते मुख त्याला।'

असे हे नवल मोठ्या बहारदारपणे आपल्यापुढे ठेवतात. स्तिमित करणारी आणखी एक नवलपरी मोठ्या चतुराईने रंगवितात,

*'आणखी एका ठायीसी एक सुंदरी पाहिली।*
*आकाशी वरूनी, कुमारी, तीन पुत्रासी प्रसवली।*
*पुत्रांचे ते लग्न होईना, मग आपण बाईल झाली।'*

बापूराव यांनी ग्रंथात दडलेली अशी अनेक रहस्ये श्रोत्यांपुढे ठेवली होती. पूर्वी दोन तमाशा फडांमध्ये चढाओढ लागे. कोड्यात टाकणारे ग्रंथांतील आणि कित्येकदा स्वकल्पित सवाल प्रतिपक्षाला करीत. पठ्ठे बापूराव आपल्या बहुश्रुततेमुळे आणि कल्पकतेमुळे डाव जिंकून जात. एकदा लिहिलेली, म्हटलेली लावणी पुन्हा म्हणत नसत. त्यामुळे नित्य नव्या लावण्यांची निर्मिती त्यांच्या सुरस लेखणीतून झाली. नवनव्या धाटणींच्या, जडणींच्या जडीच्या जडी जन्म पावल्या. शीघ्र कवित्वाची देणगी या लोकशाहीराला लाभली होती. उपरोध, उपहास, विंडबन आणि जोडीला सुरेख वेदान्त यांनी त्यांची लावणी अधिकय सुभग शहाणी बनली आहे.

चमत्कृतिजन्य अशा अनेक लावण्या त्यांनी रचल्या आहेत. लावणीच्या ओळीच्या आधी आणि ओळीच्या शेवटच्या अक्षरातील एकच अक्षर आणून अवघड पण सहजपण लाभेल अशा अक्षरांच्या लावण्या त्यांनी लिहिल्या आहेत.

य, रा, का, ता, ख, स, ही अक्षरे ओळीच्या आद्याक्षरात व अंत्याक्षरात ठेवून लावण्यांचा नवा बाज त्यांनी आणला आहे. उदाहरणार्थ,

'**ख**टाटोप या संसाराचा यात नसे सु**ख**
**ख**टखट सारी, जन्मभर असे पर्वतवत दुः**ख**।'
'**गया** काशी प्रयाग तीर्थे आणि नको **याग**
**ग**दाधर हारी भज भग होईल दूर हा भवरो**ग**'
'**ता**रण केले भोळ्या भक्तांचे दीनांचा दा**ता**
**ता**रांगणे आकाश पाताळ जग हे निर्मि**ता**।'

'वर्णमाले'ची लावणीही यमक, अनुप्रासांचा वापर करून पठ्ठे बापूरावांनी लिहिली आहे. तीत कसली रचनात्मक कृत्रिमता जाणवत नाही. उलट ताल, गेयता यांचे परिमाण लीलया प्राप्त झाले आहे.

पठ्ठे बापूराव हे लोकमानस ओळखण्यात चतुर होते. ते जसे लोकशाहीर

होते तसेच त्यांनी लोकप्रबोधन करण्याचें कंकणही बांधले होते हे लावण्यांच्या अभ्यासावरून कळते. सरळ अक्षरे वाचली तर ज्या अनुक्रमाने ती अक्षरे ओळीत असतात, तशीच ती उलट्या बाजूने वाचत आल्यास त्या ओळीचीच अक्षरे लागतात. उदाहरणार्थ,

'**सरी प**हातो सदा देव वदे दास तो हा **परीस**'
'**सती जी**भ विनवी राघवी विघरावी नवी भ**जी तीस**।'

ओळीच्या पहिल्या स अक्षरापासून जशी अक्षरे आली आहेत, तशीच शेवटच्या स अक्षरापासून उलटे वाचत आले तर, तीच अक्षरे लागतात. यामध्ये खटाटोप नी खटपट करून रचना केली आहे असे वाटत नाही. सहज लेखणीतून उतरावी अशी सुबोध रचना झाली आहे.

पठ्ठे बापूराव यांनी जशा दोन वस्तूंच्या, तीन वस्तूंच्या लावण्या लिहून आपले बुद्धिचापल्य दाखविले आहे, तसेच दोन, तीन, नऊ या आकड्यांच्या पाढ्यांच्या लावण्या लिहिल्या आहेत उदाहरणार्थ,

*'नऊ' एके रस, हे असती गायनाचे*
*चतुर पंडिता शोधून पहा मत छंद शास्त्राचे !*
*नऊ दुणे आठरा हावभाव हे असती स्त्रियांचे*
*'प्रताप रुद्र' ग्रंथ शोधिता कळेल नेमाचे !*
*नऊ त्रिक सत्तावीस पिढ्या त्या सांबाच्या पहाया*
*नऊ चौक छत्तीस, छत्तीस राण्या होत्या कश्यपासी !*
*असत्य वाटे तरी पहावे भूगोल पुराणांतरी !*
*नवा पांचे पंचेचाळीस सरिता कलिंग देशासी*
*भागवतामधे पाहता कळेल कविश्रेष्ठा तुजसी।*
*नऊ सके चौपन्न, चौपन्न कोटी साठ लक्षावर*
*नामदेवकृत अभंग असती ऐक साचार।*
*नऊसत्ते त्रेषष्ठ, त्रेसष्ठ योजनेपर्यंत अति दूर*
*तक्षक मुखीची विषज्वाळा ती जात असे पार !*
*नऊ आठ्ठे बाहत्तर खोडी असती त्या अश्वाच्या पाया*
*नवे नवे एक्याऐंशी लक्ष बळ त्या हत्तीचे*
*शंखासुर दैत्यासी होते जाणा नेमाचे।*
*नऊ दाही नव्वद हजार ग्रहणे बहू युगे साचे*
*चंद्र सूर्याला लागतात मन आगळकांडाचे !'*

अशा रीतीने ग्रंथज्ञानाचा वापर करून सप्रमाण पाढा त्यांनी डफावरच्या थापेवर तालसुरात गाऊन दाखविला आहे. गुरुपदी लीन झाल्यावर आपल्याला अशा तऱ्हेचे ज्ञान आकळते असे गुरूबद्दल सार्थ अभिमानाने त्यांनी म्हटले आहे. ही विनम्र भावना त्यांनी गुरूबद्दल अनेक कवनांतून व्यक्त केली आहे. पठ्ठे बापूराव म्हणतात,

*'नम्र होऊनी जावे शरण त्या सद्‌गुरू रायाला ।'*

# १२. आणिले कवित्व रणांगणावर

पठ्ठे बापूरावांचे दिवस रिते रिते असे चालले होते. या झोपडीत जसे दिवस आले तसे ते त्यांनी झेलले. कधी उपाशी, कधी अर्धपोटी. पण त्यांची तंद्री लागली की लेखणीला मोहर फुटे. एखादी भुरळ घालणारी लावणी रूप घेई. मनाला भूल पाडील अशी 'गौळण' साकार होई. एखादा भेदिकातील 'गण' आकाराला येई. एखादी काळजाला चटका लावणारी 'फक्कड' शब्दरूप घेई. एखादा फार्स जन्म पावे. वगाची अटकळ बांधता बांधता फुललेल्या गांजाची चिलीम विझत जाई. अंगी मुरलेला तमाशाचा खेळ भूतकाळातल्या सोनेरी दिवसांचा आठव करून देई.

कधी पुण्यातील जंगली महाराजांच्या मठाकडे जाऊन बसत. आर्यभूषण थिएटरवर येत. तिथं जीव रमविण्याचा प्रयत्न करीत. तिथल्या तमाशा फडांची विषण्ण अवस्था त्यांना अस्वस्थ करी. आपल्या अपुऱ्या राहिलेल्या डावाची खुपणारी जखम सोसत रहात असायचे.

इथेच बापूसाहेब जिंतीकर या भल्या माणसाची आणि बापूरावांची भेट झाली. जिंतीकर हे गुरव समाजातील. पोष्टमनचे काम करणारे. त्यांचे जीवनही खडतर होते. बालवयातच घरातून उघड्या जगात यावे लागले. सकाळी चित्रे व वर्तमानपत्रे विकायचे, दुपारी माधुकरी मागून आणायची. पुढे सतरंजीवाला चौकात तमाशाच्या थिएटरात चौघडा वाजंत्र्यांच्या ताफ्यात वाजविण्यास जाऊ लागले. तिथे त्यांनी भेदिकाचे सामने पाहिले. नंतर दौंड स्टेशनवर हमाल, बॅटरीमन अशी कामे केली. पुन्हा पुण्यास येऊन तार प्यून म्हणून दत्ताच्या देवळाजवळील पोष्टात लागले. येथेच पोष्टमन म्हणून गणेश पेठेत पत्रे वाटपाचे काम करू लागले. याचवेळी आर्यभूषण थिएटरवर पठ्ठे बापूरावांना एक पत्र आले. ते देण्यासाठी तेथे गेले. पठ्ठे बापूराव यांची ओळख या निमित्ताने झाली. ओळखीचे रूपांतर स्नेहात झाले.

दोघांत आत्मीयता निर्माण झाली. जिंतीकर श्रद्धाशील भावाने पठ्ठे

बापूरावांवर प्रेम करू लागले. त्यांच्या सतत गाठीभेटी होऊ लागल्या. बापूरावांसारखा कीर्तिमान शाहीर झोपडपट्टीत राहतो हे जिंतीकरांना बरे वाटले नाही. त्यांनी बापूरावांना विनंती केली. झोपडपट्टी सोडायला लावली. तीन रुपये महिना भाडे असलेली २३८, गणेश पेठ ह्या घरातील खोली बघून दिली. बापूराव तेथे ताईंसह राहायला आले. आता त्यांच्या रोज भेटी होऊ लागल्या. जिंतीकर कामावरून आले की बापूरावांशी संवाद चाले. बापूराव आपल्या लावण्या बापूसाहेब जिंतीकर यांना सांगत. जिंतीकर त्या लिहून घेत. बापूराव स्वत: नव्या लावण्या लिहीत. लावण्यांनी वही भरली की एखादा तमासगिराला ती वही देत. तमासगीर वही घेऊन जाई. पण परत करण्याचे नाव नसे. अशा कितीतरी लावण्या अनेक तमासगिरांकडे असत. बापूरावांनी 'फार्स' हा वेगळा प्रकार मराठी तमाशात आणला. त्यामुळे तमाशाची रंगत वाढली. असे फार्स व वग लिहिलेल्या वह्या तमासगिरांच्याकडे गेल्या.

बापूसाहेब जिंतीकर यांचे द्रोण-पत्रावळ्यांचे दुकान होते. त्या दुकानात बापूराव बसत. एकदा त्यांनी जिंतीकर यांच्या दुकानातील शिल्लक मोजून पाहिली. ती शिल्लक पाहून जिंतीकरांना ते म्हणाले, 'बापूसाहेब, तमाशा कला चांगली आहे. सर्वसामान्य लोकांचे रंजन करते. शहाणपण शिकवते. पण ही सेवा करणारे तमासगीर मात्र कर्जबाजारी असतात. तमाशा फडवाले या कर्जाने हैराण होतात. पठाणसावकार रुपयाला दोन आणे व्याज घेतात. त्यामुळे तमासगिरांचे फार नुकसान होते. तुम्ही हे पैसे तमासगिरांना द्या. त्यांना वेळप्रसंगाला पैसे उपयोगी पडतील. त्रस्त झालेल्या तमासगिरांना आधार मिळेल. मी पैसे वसूल करून देईन. ती माझी जबाबदारी.

पठ्ठे बापूरावांनी तमाशा कलेच्या प्रेमापोटी आणि तमासगिरांच्या भल्यासाठी ही जोखीम पत्करली. बापूराव व्यवहारज्ञानात तसे कच्चेच होते. पुढे ही सावकारी तोट्यात आली.

काही असेच प्रसंग घडले. त्यांपैकी एक असा :

पठ्ठे बापूरावांच्या सांगण्यावरून जिंतीकरांनी एका तमासगिराला सामुदायिक फडावर ९०० रु. दिले होते. त्यावेळची ही रक्कम काही थोडीथोडकी नव्हती. हे पैसे देताना रोज ९ रु.चा हप्ता भागवायचा असे ठरले होते. पण तो तमासगीर हप्ता भागवायला टाळाटाळ करू लागला. पैसे भागवेनासा झाला. बापूरावांच्या मनाला ही गोष्ट लागली. त्यांनीच तमासगिरांच्याच हितासाठी जिंतीकरांना या व्यवहारात भरीस घातले होते. बापूराव तसे तापट होते. त्यांनी

गांजाची चिलीम भरली. जिंतीकरांना घेऊन पैसे मागायला गेले. तमाशाचा खेळ संपला होता. मिळालेल्या मिळकतीचा हिशेब करून कलाकारांत वाटण्या चालल्या होत्या. बापूराव त्या तमासगिराला म्हणाले, 'हे जिंतीकर मोठे सावकार नाहीत. द्रोण-पत्रावळ्यांच्या विक्रीतून आलेले पैसे तमासगिरांना पठाणाच्या तावडीतून सोडविण्यासाठी ते देतात. पदरमोड करतात. त्यांचे पैसे आधी देऊन टाक.' तो तमासगीर उर्मट होता. त्याला उपकाराची जाणीव नव्हती. तो बापूरावांना म्हणाला,

'तमाशात तुझं गाणं म्हणतोय म्हणून तुझं बोलणं ऐकून घ्यायचं काय? यापुढं तुझं गाणंच म्हणणार नाही. अनेक कवींची गाणी पडलीत.'

पठ्ठे बापूरावांना त्याच्या या उलट बोलण्याने राग आला. चिलमीचा झुरका ओढून ते म्हणाले,

'मी कुठं म्हण म्हणतोय. पण एक लक्षात ठेव, तू तमाशात माझं गाणं म्हटल्याशिवाय, माझं नाव घेतल्याशिवाय तुझा तमाशा चालणार नाही. टिकणारही नाही.'

पठ्ठे बापूरावांच्या सात्त्विक संतापाने उच्चारलेली ती वाणी खरी ठरली. त्या तमासगिराचा तमाशा बंद पडला. त्याची वाताहत झाली.

पठ्ठे बापूरावांच्या लावण्यांचा फार मोठा प्रभाव रसिक मनावर होता. त्यांच्या लावणीशिवाय तमाशा बेचव वाटे. बापूरावांच्या शृंगारिक लावण्यांची मोहकता वेगळीच असे, तर भेदिक लावण्यांतील अध्यात्म लौकिकरित्या मराठी मनाला लुभावित असे. अशा असंख्य लावण्या बापूरावांनी लिहिल्या होत्या. काही जवळ होत्या, काही तमाशगिरांनी नेल्या होत्या. या प्रचंड संख्येने लिहिलेल्या लावण्यांचे काय करावे असा प्रश्न त्यांना छेडीत रहायचा. त्या मन:स्थितीचे यथार्थ वर्णन

*'पन्नास वर्षे केली मुशाफिरी पुरी लोटली मुदत कुडी।*
*दुसरे रामायण भारत बनलें, ग्रंथ रचिले अचल थडी।*
*बहुत वर्षे लोटली म्हणूनी भलती मनी उद्भवली अढी।*
*हाती धरूनी लेखणी लिहिले कवित्व केवढे कडोविकडी।*
*ग्रंथ साठले नजरेबाहेर, छाती धडकली चिंता बडी।*
*काय करू त्याला, किती लिहावे, कुठे ठेवावे लावून थडी।*

या 'चरित्रपर' लावणीत केले आहे. ते म्हणतात,

*'दोन लक्ष आम्ही केली लावणी, केवढी म्हणावी बात बडी'*

अशा असंख्य लावण्या त्यांनी केल्या. त्यांचे काय करावे अशी चिंता त्यांना भेडसावीत होती. इतर कुणाचा आधार नव्हता. स्वत: दरिद्रीनारायण बनलेले. आयुष्यातील अखेरीचे दिवस, साराच धीर सुटलेला. जीव ओतून, जीवन झोकून लिहिलेल्या लावण्या, कवने वाऱ्यावर उडून जातील या भावनेने पठ्ठे बापूराव तगमगत होते.

मात्र ज्या जिंतीकरांनी पठ्ठे बापूरावांच्या अमोघ कर्तृत्त्वावर, कवनांवर जीव लावला त्यांनी आपली कुवत नसताही लावण्यांचे पुस्तक काढण्याचे ठरविले. रात्ररात्र पठ्ठे बापूराव यांच्याबरोबर बसून लावण्यांचे हस्तलिखित तयार केले. शीघ्र कविराज श्रीधर कृष्ण ऊर्फ 'पठ्ठे बापूराव कुलकर्णीकृत गण-गौळण-लावण्या-पोवाडेसह' भाग १ला छापून तयार झाला. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचा अभिप्राय लाभला होता. त्यांच्याच हस्ते प्रकाशन करावयाचे निश्चित झाले होते. तशी वार्ता सर्वत्र जाहीर झाली. ठिकठिकाणी जाहीर निवेदने लावली गेली. पण याचवेळी पठ्ठे बापूराव यांची आर्थिक स्थिती बिकट होती. अंगावर चांगले कपडे नव्हते. अशा अवस्थेत एका चांगल्या समारंभाला आपल्यामुळे गालबोट लागायला नको म्हणून बापूरावांनी पुणे सोडले. ते ताई परिंचेकरबरोबर चालत परिंच्याला निघून गेले. जिंतीकरांना हे कळताच वाईट वाटले. या समारंभाला बापूराव असणे आवश्यक होते. त्यांचा सत्कारही करावयाचे त्यांचे नियोजन होते. जिंतीकर अस्वस्थ झाले. त्यांनी २५ रु. भाडे देऊन एक टॅक्सी ठरवली. श्री. नानासाहेब थोरात या मित्रांना घेऊन परिंचे गावच्या वाटेला लागले. रात्री ३ वा. परिंचे येथे पोचले. पण तिथे बापूराव भेटले नाहीत. ते रात्रीच पायी चालत पुण्याला गेल्याचे कळले. जिंतीकर परत पुण्याच्या मार्गी लागले. बापूरावांना भेटले. सगळा वृत्तान्त सांगितला. पण बापूरावांना पूर्वीचे शाही थाटाचे दिवस आठवले. ते जिंतीकरांना म्हणाले, 'बापूसाहेब, तुमचे फार उपकार आहेत माझ्यावर. एक चांगला समारंभ महत्प्रयासाने तुम्ही घडवून आणलाय. मी हा असा; दरिद्रीनारायण. अंगावर धड कपडे नाहीत. मी या अशा अवस्थेत समारंभात असणे मला बरे वाटत नाही. तुम्ही समारंभ करा. मला आनंदच आहे. मी भरून पावलो असं समजा. पण मला गळ घालू नका.'

जिंतीकर हे स्वत:ला पठ्ठे बापूरावांचे शिष्य समजत होते. बापूरावांवर त्यांची भक्ती होती. निष्ठा होती. ते म्हणाले,

'मी करतो नवीन कपडे. काळजी करू नका. पण तुम्ही यायला हवं.' बापूराव म्हणाले.

'बापूसाहेब, मला पूर्वीप्रमाणे पोशाख करत असशील तर मी येईन.'

जिंतीकरांनी कबूल केले. त्यांनी बापूरावांना हवा तसा पोशाख घेतला.

दि. १-२-१९४२ रोजी हा प्रकाशन समारंभ व बापूरावांचा सत्कारसोहळा तात्यासाहेब केळकर काही अपरिहार्य कारणाने उपस्थित राहू न शकल्याने आबासाहेब मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखाली जॉन स्मॉल मेमोरिअल हॉल, पुणे येथे थाटामाटात साजरा झाला.

याप्रसंगी संगीततज्ज्ञ गंगाधरराव नारायणराव मुजुमदार ऊर्फ आबासाहेब मुजुमदार आपल्या भाषणात म्हणाले,

'पठ्ठे बापूराव कुलकर्णी हे सुप्रसिद्ध तमासगीर व स्वयंसिद्ध कवि आहेत. त्यांनी सुमारे सव्वा लाख लावणी लिहिली आहे, असे ते म्हणतात. इतर लावण्यांमध्ये आणि त्यांच्या लावण्यांमध्ये फरक पाहिला असता त्यांच्या लावण्यांत शब्दरचना अगदी खेड्यापाड्यांतून वापरल्या जाणाऱ्या शुद्ध मराठी भाषेत आहेत. संस्कृत शब्द फार कमी असतात. त्यामुळे त्या सर्वांस प्रिय असतात.

लावणी म्हटली म्हणजे तीमध्ये शृंगार हा असणारच, तथापि तो उत्तान शब्दात न दाखविता गूढ शब्दांत दाखविणे ही गोष्ट विशेष असते. व त्यांची कविता व वग जरी शृंगारपर असले तरी अखेर अत्यंत बोधपर आहेत. बहुजन समाजाला खरी शिकवण तमाशानेच होईल; तमाशा हाच खरा राष्ट्रोन्नतीचा मार्ग आहे. जास्तीत जास्त जनता साक्षर होईल तर ती ह्या तमाशानेच.'

पठ्ठे बापूराव आपल्या सत्काराबद्दल केलेल्या भाषणात म्हणाले,

'मी तमाशाचा व्यवसाय ५२ वर्षे केला व तोही महार-मांग यांच्यात राहून. ह्या वर्गाकडे आपण वेगळ्या दृष्टीने पाहतो. परंतु हा समाज फुटक्या रांजणात भरलेल्या माणिक मोत्याप्रमाणे आहे. बाह्य देखाव्याकडे न पाहता, त्यांच्या निर्मल अंत:करणात ह्या समाजाने डोकावून पहावे, म्हणजे तिथे निर्मल पाण्याचा झरा सापडेल.'

एकूण सामाजिक जीवनातील एका समस्येविषयीच त्यांनी त्या काळी वाचा फोडली.

पुढे जिंतीकरांनी पठ्ठे बापूरावांच्या लावण्यांचे पाच भाग पुस्तकरूपाने

प्रसिद्ध केले. जिंतीकर व शाहीर नानिवडेकर यांच्याबद्दल आत्यंतिक कृतज्ञतेने त्यांनी उद्‌गार काढलेत,

*'विद्याप्रसारक रत्ने मिळाली।*
*दोन माणसे गिरीएवढी।*
*मोती अंधारात लपून राहिलेले*
*आणले उजेडात, भले गडी।*

*मित्र मिळाले नानिवडेकर*
*शाहीर प्रख्यात चंद्रचुडी*
*जिंतीकर ते बापूराव गुरव*
*दिला डांगोरा लावुनी गुढी।*
*आणिले कवित्व रणांगणावर*
*भर चौकात दिली बुडी।*
*बरा केला उपकार दादानों।*
*भल्या मर्दानो बांधली मढी।'*

निखळ अंत:करणाचे बापूराव या हितकर्त्यांचे ऋण मनमोकळेपणाने व्यक्त करतात.

या काळात पुण्यामध्ये केशवराव जेधे, काकासाहेब गाडगीळ, प्रा. गोडे, कवी मनमोहन नातू, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीमंत आबासाहेब मुजुमदार, न्यायरत्न विनोद, दत्तो वामन पोतदार, पोपटलाल शहा, काकासाहेब शिंगरे या विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींचा पठ्ठे बापूरावांशी संपर्क आला. भेटी झाल्या. तात्यासाहेब केळकरांनी तर त्यांना 'शीघ्रकवी' असा किताब दिला.

मात्र पठ्ठे बापूरावांचा हा अखेरचा काळ होता. दिवस हलाखीचे होते. हतबल करणारी विवंचना सतत डंख मारीत होती. त्यांच्या या दिवसांची आठवण नानासाहेब साठे यांनी लिहून ठेवली आहे.

'आम्हाला कळू लागल्यापासून पठ्ठे बापूराव म्हणून नामांकित तमाशावाला आहे असे ऐकून होतो. पुढे ते ब्राह्मण असूनही बाटले होते हेही ऐकले. नंतर त्यांचे तमाशे पाहिले. ते त्यांच्या अस्तमानातीलच होत. त्या तमाशात गंभीरता होती. अश्लीलता मुळीच दिसली नाही. अगदी कथेकऱ्यांप्रमाणे पूर्वरंग, उत्तररंग होता.

त्यानंतर सुमारे ४ वर्षांखाली आम्ही आर्यभूषण थिएटरमध्ये तमाशास गेलो होतो. तमाशा सुटल्यावर आम्ही बाहेर पडलो तो दारापुढे एक अत्यंत वृद्ध, पांढरी दाढी, पांढरा रुमाल गळ्यात व हातात रुद्राक्षाच्या माळा, अंगात एक भला मोठा कोट, जवळ दोन-तीन मराठे व इतर जातीची माणसे, जरा पलीकडे चिलीम तयार करीत होती. तेव्हा मला वाटले, असेल एखादा साधू अथवा फकीर झाले. म्हणून खरोखरच मी त्यांना २ पैसे दिले. नंतर जवळच विचारता कळले की, हेच ते पठ्ठे बापूराव! छे! मला पटेनाच ते. तेव्हा समक्षच विचारण्याचे धाडस केले व विचारले,

'आपणच का ते पठ्ठे बापूराव?'

चकीत होऊन खोल आवाजात पठ्ठे बापूराव म्हणाले,

'होय.'

मग मात्र मी थक्क झालो. मनात म्हणालो,

'अरेरे, एवढ्या नामांकित माणसाला ही स्थिती यावी ना?' मला मोठेच वाईट वाटले. आणि पठ्ठे बापूरावांचे आपण काही भले करू शकू का, अशी इच्छा मनात आली व त्या दृष्टीने त्यांचा घरचा पत्ता विचारून घेऊन एका रविवारी दुपारी त्यांचे घरी गेलो. तेथेही मनात तेथील परिस्थिती पाहून सौख्याऐवजी दु:खच झाले.

त्या पहिल्याच बैठकीत मोठ्या आदराने त्यांनी स्वत: लिहिलेल्या लावण्या व काव्ये दाखविली. व त्या छापण्याचे काय करावे या विवंचनेतच होते. शिवाय जिंतीकर यांनी बापूरावांच्या काही निवडक लावण्या छापल्याचे वृत्तही त्यांनी सांगितले. पठ्ठे बापूराव म्हणाले, 'माझी खरोखरच शिष्यापेक्षाही जास्त सेवा हे जिंतीकर करतात.'

अशा परिस्थिती बापूरावांना पाहून माझ्या जीवास त्यांची ती विपन्नावस्था पाहून तर चैनच पडेना. पुण्यातील साहित्यिक म्हणविणाऱ्या एका मित्रास पत्र टाकले. पण बापूरावांचे दुर्दैव. त्यांना उत्तर द्यावे एवढीदेखील बापूरावांची व माझ्या लिखाणाची किंमत त्याला वाटली नाही. धन्य आहे.'

या नानासाहेब साठे यांनीच आचार्य अत्रे यांना पठ्ठे बापूरावांच्या दु:स्थितीबद्दल सांगितले. नंतर आचार्य अत्रे यांनी १९४२ साली पंधरा रुपयांची मनीऑर्डर पाठविली. आचार्य अत्रे यांनी पाठविलेली ती मनीऑर्डर पाहून

बापूरावांच्या डोळ्यात प्रेमाश्रू उभे राहिले. ते म्हणाले,

'अत्रेसाहेबांना मी शेर (वाघ) या नात्यानेच लांबून ओळखतो. खरोखरच त्यांनी शेरपणा दाखवला. मला दिलेले पंधरा रुपये हे लाखाच्या ठिकाणी आहेत; कारण ते थोर माणुसकीने आणि एका गुणीजनाचे गुण पाहून दिलेत. त्या गुणाची किंमत, कलावंताची अमूल्य किंमत त्यात आहे.'

आचार्य अत्रे या कदरदार साहित्यिकाने एकेकाळच्या दिलदार माणसाविषयी दाखविलेली ती मनस्वी आस्था होती. नंतर आचार्य अत्रे पठ्ठे बापूरावांना भेटलेही. 'दहा हजार वर्षांत मागे आणि दहा हजार वर्षांत पुढे न जन्मणाऱ्या' त्या आचार्य अत्रे यांच्याच भाषेत अशा या दोन थोर कलावंताची ती एक अंत:करण गदगदून टाकणारी भेट होती.

बापूसाहेब जिंतीकर यांनी पठ्ठे बापूरावांची खूप काळजी घेतली होती. त्यांच्यासाठी त्यांनी धोतर जोडी रुपये एकोणीसची, रेशमी उपकरणे ७ रुपयांचे, दोन शर्ट रुपये साडेनऊचे, जरीकाठी फेटा रुपये एकशेत्र्याण्णवचा, ब्राह्मणी जोडा रुपये साडेपाचचा, पांघरण्यास पिवळी शाल रुपये अकरा किंमतीची, हे सर्व पी. गेंगणे, बुधवार चौक आगीचे बंबासमोर, पुणे येथे घेतले. पठ्ठे बापूरावांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई कुलकर्णी यांना जांभळ्या काठाचे चौकडी लुगडे व ताराबाई परिंचेकर नाईक-नवरे यांना टोपपदरी लुगडे कुमठेकर दुकान, चोळखण आळी, बुधवार पेठ येथे १९४२ साली घेतल्याची नोंद आहे.

पठ्ठे बापूरावांची पत्नी सौ. सरस्वतीबाई श्रीधर कुलकर्णी या पुण्यातच रहायला आल्या होत्या. त्या आपला भाऊ नाना याच्या सोबतीने दारुवाला ब्रीजजवळ भाड्याच्या खोल्यात रहात होत्या. जुन्या पद्धतीच्या कडीकपाटाच्या खोल्या होत्या. मागे अंगण होते. तेथे बकुळीचे झाड होते. बकुळीच्या फुलांचा रंग आणि गंध त्यांना आवडे. आपली जीवनभराची एकाकी वाटचाल करता करता त्या थकल्या होत्या. त्या श्री साईबाबांच्या भक्त होत्या. त्यांच्या पूजेत आपल्या मनीचे कोंडलेले दु:ख विसरण्याचा प्रयत्न करीत. सायंकाळी दारुवाला पुलाजवळच्या मारुतीच्या दर्शनासाठी जात. नित्यनेम चुकत नसे. त्या गोऱ्या, मध्यम उंचीच्या, गालावर तीळ असलेल्या, गोल चेहऱ्याच्या, शांत आणि प्रेमळ होत्या. त्या अबोल असत. आपल्या काळजातला जीवघेणा संघर्ष त्यांनी कधीच व्यक्त केला नाही. ती भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची उपासना करणारी स्त्री होती. काळाचे आणि उपेक्षेचे सारे आघात सोसण्याची शक्ती तिच्यात होती. बापूरावांबरोबर विवाहवेदीवर सात पावले टाकली असतील

एवढीच त्यांची जीवनसोबत. अशा त्या सौ. सरस्वतीबाईंचा आवाज मृदू होता. पठ्ठे बापूराव त्यांना कायमचे दुरावले तरी त्यांचे भांडण कुणाशीच नव्हते.

कधी कधी बापूराव तिथे येत. उंबऱ्याच्या बाहेरच बहिष्कृतासारखे बसत. या सोशिक, संयमी सरस्वतींनी त्राग्याची एखादी छटाही कधी चेहऱ्यावर उमटू दिली नाही, किंवा असह्य कोंडमारा झाला असताही आपल्या निर्धारापासून त्याही ढळल्या नाहीत. दोन उभ्या आयुष्यांचा भावव्याकुळ मूक संवाद होई तेवढाच!

बापूसाहेब जिंतीकर यांनी पठ्ठे बापूरावांच्या लावण्या लिहून घेतल्या होत्या. कित्येक पाठ होत्या. पठ्ठे बापूरावांनी त्या लावण्यांच्या चाली जिंतीकरांना शिकविल्या होत्या. जिंतीकरांना तमाशा कलेचे आकर्षण होतेच. पूर्वी त्यांनी नाटकात कामे केली होती. वयाच्या चौदाव्या वर्षी तमाशातील वगामध्ये कामेही केली होती. पुढे तर एका नामांकित तमाशा कलावंताचे पठ्ठे बापूरावांचे शिष्यत्वच पत्करले होते. यातून प्रेरणा घेऊन जिंतीकरांनी तमाशा फड उभा केला. १९४३ साली बुधवार पेठेत, ढमढेरे बोळात माळ्याच्या धर्मशाळेत तिसऱ्या मजल्यावर तमाशाचा खेळ केला. त्या खेळास डॉ. देशपांडे, गंगाराम पाषाणकर, आबासाहेब मुजुमदार, काकासाहेब गाडगीळ, प्रो. दत्तोपंत पोतदार, न्याय-विनोद, पोपटलाल शहा, श्रीमती शकुंतलाबाई परांजपे, नानासाहेब साठे, हुंडीवाले व पठ्ठे बापूराव उपस्थित होते. गण झाला, गौळण झाली. फार्स संपला. तमाशा कला रक्तात भिनलेल्या पठ्ठे बापूरावांना राहवेना. ते उठले आणि म्हणाले,

'ज्याच्या लावण्या ऐकण्यासाठी तुम्ही जमला आहात, तो मी जिवंत आहे. मी म्हणू का लावण्या?'

टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्या दाद देणाऱ्या टाळ्यांच्या गजरात पठ्ठे बापूरावांनी आपल्या हाती डफ घेतला. डफावर पूर्वीच्या उत्साहाने थाप मारली. वाद्यांवर सूर-मेळ झणझणू लागला आणि याच वेळी आपल्या पहाडी आवाजात हा लोकशाहीर लावण्या पेश करू लागला. सारा श्रोतृवर्ग रोमांचित झाला. मंत्रमुग्ध बनला. एकेका ढंगदार लावणीने तमाशा चढत गेला. तात्याबापूचा वग पठ्ठे बापूरावांनी पूर्वीच्याच थाटात रंगविला. पठ्ठे बापूरावांचा तमाशाचा कैफ सर्वांनी अनुभवला.

पठ्ठे बापूरावांची ही डफावरची शेवटचीच थाप होती. त्यांच्या पहाडी

आवाजाची किमया ही अखेरचीच होती. पठ्ठे बापूरावांची तमाशाची चढलेली नशा ही अंतकाळाचीच होती. पठ्ठे बापूरावांचा तो शेवटचा काळ होता. ते आर्यभूषण थिएटरवर नित्य जात. भोगलेल्या ऐश्वर्याची धुंदी चिलमीच्या झुरक्याबरोबर त्यांच्या नसानसात भिनत जाई. कोपऱ्यात, अंधाऱ्या वलसावलीत बसलेले असत. अशावेळी शाहीर बाबूराव घोलप त्यांना भेटायला एकदा आर्यभूषण थिएटरवर गेले होते. त्यावेळची त्यांची स्थिती त्यांनी लिहून ठेवली आहे.

'पठ्ठे बापूराव थकले होते. आजारी अवस्था होती. दुसऱ्या हातात जुनाट, फुटकी चिलीम होती. अंगात मांजरपाटाचा सदरा होता. गुडघ्याच्या थोडेसे खाली असलेले धोतर होते. डोक्यावर भला मोठा फेटा. लांबलचक दाढी आणि पायात पुणेरी जोडा होता. खोकत होते. औषधाला पैसे नव्हते. गांजाची चिलीम रिकामीच होती. आणि हातात कागदाचे भेंडोळे होते...'

पठ्ठे बापूराव यांना भविष्याची जाण होती. बरेच लोक भविष्य विचारायला त्यांच्याकडे येत. त्यांना स्वत:चे मरणही कळले होते. मरणापूर्वी दोन दिवस आधी त्यांनी जिंतीकरांना बोलावून घेतले. त्यांना म्हणाले,

'बापूसाहेब, एक-दोन दिवसात माझा अंतकाळ आहे. मला माझा मृत्यू दिसतो आहे. मला वाटते आहे, आपण आपल्या जन्मभूमीत प्राण ठेवावा. काही झाले तरी हरणाक्ष रेठरे येथील मातीत माझी नाळ पुरलीय. अखेरचा श्वास घ्यायला तिथे जाईन म्हणतोय. खूप फिरलो. मराठी मातीनं माझ्यावर प्रेम केलं. तुम्ही तर खूप सांभाळलं. पण जन्मभूमीची ओढ सुटत नाही. मला पंचवीस रुपये द्या. मी हरणाक्ष रेठऱ्याला जातो. तुम्ही माझा सत्कार केला. कसा उतराई होऊ मी? मी माझ्या गावी गेलो की तुम्हाला इनाम देईन.' त्यांना गावी जाण्याची तळमळ लागून राहिली होती. जिंतीकरांनी बापूरावांचे म्हणणे ऐकले. पंचवीस रुपयांची जमवाजमव केली. पण पठ्ठे बापूराव यांना जन्म दिलेल्या गावाची कितीही ओढ असली, तरी त्यांचे थकलेले शरीर साथ देईनासे झाले होते. अखेरीस १०४७ रविवार पेठ, पुणे येथे शके १८६७ पौष वद्य, शनिवार सकाळी ६ वा दि. २२-१२-१९४५ रोजी ते इहलोक सोडून गेले. रेठरे हरणाक्ष येथे कृष्णाकाठी जन्माला आलेल्या बापूरावांनी काळा-स्थळावर मात करून पुणे येथे मुळामुठेच्या काठी विश्रांती घेतली.

बापूरावांनी जिंतीकर यांना मृत्यूपूर्वी सांगितले होते, 'बापूसाहेब, माझा

अंत्यसंस्कार तूच कर. ब्राह्मण मंडळींचा रोष यायला नको म्हणून ओंकारेश्वर स्मशानभूमीत नेऊ नको. माझा लकडी पूल स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करा.'

पठ्ठे बापूरावांनी 'पुण्याच्या लावणी'त पवळाला उद्देशून म्हटले होते;

'तुला देतो लकडी पूल।
तिथे चांगली हवा।'

अखेर त्यांनी याच लकडी पुलाच्या स्मशानभूमीत अखेरचा विसावा घेतला.

अलौकिक अशा काव्यप्रांतात भरारी मारणाऱ्या पठ्ठे बापूरावांनी मात्र लौकिक जीवनातील रुक्ष व्यवहार कधी जपला नाही. ते त्यात गुंतलेही नाहीत. तमाशा कलेच्या वेडापायी त्यांनी सांसारिक जीवनाकडे दुर्लक्ष केले. त्याची खंत त्यांनी आपल्या 'जीवनचरित्र' या कवनात व्यक्त केली आहे.

*'मंडळ भरता सोडले पारायण, वाराणशीमध्ये गंगाथडी।*
*दोन लक्ष आम्ही केली लावणी, केवढी म्हणावी बात बडी।'*

पण यासाठी कसले दान नियतीच्या पदरात टाकावे लागले ते मांडतात,

*चैन भोगली घडोघडी, पण संसार झाला पडापडी*
*लग्न लावले, कुटुंब केले, कळत असोनी टाकली उडी।*
*पायात बेडी बळे अडकवली, येऊन बसल्या बारा नडी*
*दिल्या झुगारुनी सगळ्या एकीकडे, त्यामुळे रुसले खेळगडी।'*

संसार मोडला. पण त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई या धीराच्या होत्या. सती सावित्रीच्या वंशातल्या होत्या. पठ्ठे बापूराव श्रीकृष्ण जन्माचे कौतुक

'कोकुळामध्ये नंदाच्या घरी श्रीहरी अवतरला'

असे आपल्या काव्यात करीत असले तरी 'श्रीधर कृष्ण कुलकर्णी' या आपल्यातील सांसारिकाला हा अपत्य जन्मसोहळा साजरा करण्याचे भाग्य दिलं नाही. अखेर त्यांच्या पत्नीने कराडच्या गोविंद कुलकर्णी यांना १९५१ साली दत्तक घेऊन पुत्रप्रेमाची तहान भागविली. गोविंद हे त्यावेळी बावीस वर्षांचे होते. सरस्वतीबाई १९६८ साली पुणे येथेच निवर्तल्या.

# १३. सहज समाधी साक्षात्काराची

लोकशाहीर पठ्ठे बापूराव यांनी स्पर्श केला नाही असा विषय राहिलेला नाही. ते 'समाजसुधारक' म्हणून होते असे नाही, पण त्यांच्या जीवनाची आंतरिक तळमळ आणि धारणा तीच होती. लावणीचा अस्सल बाज त्यांनी चित्रित केला. खालच्या समाजातील आवडत्या महार-मांग समाजात ते वावरले. मिसळले. गानकुशल पवळाबरोबर जगले. अनेक शाहिरांनी जीवनाच्या अखेरीस शाहिरी सोडली. कीर्तनकार बनले. उफ फोडला. चिपळ्या हाती घेतल्या. पण बापूरावांनी घेतलेला वसा अखेरच्या श्वासापर्यंत सांभाळला. त्यांचा पुण्यात बापूराव जिंतीकरांनी सत्कार केला तेव्हा त्यांनी महार समाजातील कवन-चातुरीची प्रशंसा केली. घराने, गावाने बहिष्कार टाकला तरी ते घाबरले नाहीत. शुद्धीकरणाला तयार झाले नाहीत. ते मानवतावादी होते. लेखणीबरोबर डफ हातात धरला ते मानवी कैवारासाठीच. तमाशासारख्या अनगड कलेतून लोकप्रबोधन करता येईल ही त्यांची भूमिका होती. कलावंताचे ठायी असणारा हट्टीपणा, निर्धार आणि कलंदरपणा त्यांच्याही ठायी होता.

शीघ्रकवित्व, सुंदर शृंगार आणि समाजप्रबोधन या वैशिष्ट्यांबरोबरच विनोदाची झालर, खमंग संवाद, लावणीतील लावण्य आणि अध्यात्माचे तत्त्वचिंतन हेही महत्त्वाचे होते.

१८६०च्या दरम्यान 'बुकीश' नाटके रंगभूमीवर आली. त्यात आधी 'फार्स' असे. पठ्ठे बापूरावांनी हा लोकमनाला रंजकपणे खुलवत नेणारा नवा फार्स मराठी तमाशात आणला. समाजातील ढोंगावर प्रकाश टाकत विनोदगर्भतेने पेश केला जाणारा हा प्रकार लोकांना फार आवडला.

पठ्ठे बापूरावांनी 'छक्कड' हा प्रकारही अधिक लोकप्रिय केला. हा पद्यमय पण खटकेबाज संवादात्मक असे. यातून नीतीचाच बोध केला जात असे. उदाहरणार्थ, 'खट्याळ आहे माझा नवरा' ही छक्कड मूळातून वाचली तर याची साक्ष पटेल.

याशिवाय कवाली, पोवाडा, गण, गौळण, वग, शृंगारिक व भेदिक लावण्या, झगड्याच्या लावण्या, भजनीपदे, संगीत पदे, बोधपर फटके इ. प्रकारांनी तमाशा कला गोमटी आणि साजरी केली. तिला भूषविले. एक नवे चैतन्य दिले. म्हणूनच मराठी रंगभूमीलाही तमाशातील पदांच्या चाली उचलणे अपरिहार्य झाले. 'लावणी कशी असावी?' (पान ३१) याविषयीचे चिंतन एका जाणत्या सर्जनशील कवीचे वाटावे असेच आहे.

'मिठाराणीचा वग' तर गाजलाच. पण मुंबईची लावणी, पुण्याची लावणी, कोल्हापूरची लावणी, तीर्थांची लावणी, धान्यांची लावणी आणि भेदिक लावण्या यांनी मराठी मनाची पकड घेतली होती. मग

*'माझ्या मतीचा प्रकाश कैसा। बारा कळेचा सूर्य जैसा*
*भानू उगवला उत्तम खासा, अज्ञान अंधार पडला फडशा।'*

असा त्यांनी व्यक्त केलेला अभिमान सार्थ वाटतो. त्यांच्या लावण्यांत म्हणणी, टाकणीची-वगाची चाल, बालेघाटी, जुनरी, झडती, झगडा अशा सरस आणि काळजाला भिडणाऱ्या चाली होत्या. नित्य नव्या लावणीतील नवा विषय, नवे रंग आणि मनमोहक तालढंग असल्याने ते मराठी रसिकांच्या गळ्यातील ताईत बनले होते.

तमाशाचा आद्यवग सांगली जिल्ह्यातील उमा बाबाजी मांग-सावळजकर (१८७० ते ७५) यांनी 'मोहनाबटाव' हा लिहिला. त्यांचा 'चंद्रावळ' हा वगही गाजला. पुढे पठ्ठे बापूरावांनीच आपल्या उत्कर्षाच्या (१९०० ते १९१५) काळात वगाला साजरे रूप दिले. तमाशाचे ते महत्त्वाचे अंग झाले.

पठ्ठे बापूरावांनी नीतिमूल्यांचे शिक्षण देणारे वगनाट्य लोकप्रिय केले. सामाजिक प्रश्न हाताळले. अनिष्ट प्रथांवर प्रहार केले. एवढेच नव्हे तर त्यावर उपायही सुचविले. अडाणी जनसमुदायाचे प्रबोधन केले. कुटुंबातील ताणतणाव, सासू-सून संघर्ष यांसारखे तत्कालीन प्रश्नही लावण्यांतून चितारले. आचार-विचार शुद्धता असेल तर एकूण कौटुंबिक व सामाजिक जीवनात स्वास्थ्य निर्माण होते नी त्यातच मानवी जीवनाचे कल्याण आहे हे अनेक लावण्यांतून त्यांनी मांडले. निर्भेळ मनोरंजनाबरोबर लोकशिक्षण आणि लोकप्रबोधन साधले. आचरणात तर त्यांनी ते आणलेच. त्यांनी खेड्यावाड्यांतील अशिक्षित लोकांना तमाशाच्या माध्यमातून बोध केला. खालच्या समाजातील लोकांत आपले जीवन घालविले. त्यांनी मराठी तमाशाला, लोकशाहिरीला संजीवनी दिली. ते केवळ लोकशाहीरच होते असे नाही, तर समाजाच्या दांभिकपणावर प्रहार करणारे

समाजसुधारक असावेत असे त्यांच्या जीवनचरित्रावरून जाणवल्याशिवाय राहात नाही. समाजासंबंधी एक आच त्यांच्या कवनात होतीच. म्हणूनच ते आपल्या जीवनचरित्रपर लावणीत

*'महत्त्वाकांक्षा मनात एवढी । ठेवूनी बाजूला हजार नडी*
*आपुण तरोनी कैक तरावे, भवबंधाच्या पैलथडी ।'*

असे म्हणतात. अशी जाणीवपूर्वक समाजावर संस्कार करण्याची भूमिका त्यांनी अखेरपर्यंत पाळली होती. संसारात निरर्थकपणे जगणाऱ्या माणसाला त्याच्या खऱ्या जगण्याची जाणीव त्यांनी आपल्या -

*'आलासी जन्मा शतवर्षाचे आयुष्य ठरविले ।*
*कसे रे मूर्खा केले वाटोळे ।'*

या लावणीत झोपेत, अज्ञानात, मदनज्वारेत आणि इतरांना छळण्यातच घालविलेस असे खड्या, त्वेषपूर्ण वाणीने म्हटले आहे.

भेदिकपर लावणीत

*'अति भयंकर आहे प्राण्यांनो मायेचा भवरा ।*
*जाऊ नका गर्वाने फुगुनी फसाल आपले मन आवरा ।'*

असा मनभाव व्यक्त केला आहे, एका बोधपर संगीत पदात

*'नको मक्का मदिना काशी रे । तुझा नारायण तुजपाशी'*

असा आत्मशोध घेण्यासाठी विनविले आहे.

समाजात चाललेल्या 'बुवाबाजी'च्या दांभिकपणावर तर त्यांनी कोरडे ओढले आहेत.

*'बुवाबाजीचा थाट मनाचा । डोई राखल्या जटा जटा*
*सोंग घेऊनी ढोंग दावितो । जग भुलले अशा नटा ।'*

अशी ही पठ्ठे बापूरावांची भैदिक-अध्यात्मिक लावणी म्हणजे

*'पठ्ठे बापूराव कवीची ही गीता ।*
*भाव तयांचा सार काढला - भगवंताची जाण ।'*

सामाजिक दंभावर आघात करीत खऱ्या नैतिक मूल्यांची पेरणी त्यांच्या कवनांनी केली आहे.

पठ्ठे बापूरावांचा समग्र मराठी मनावर ठसा उमटला होता. त्यांच्या काव्याने मराठमोळी माणसे झपाटून गेली होती. त्याहीपेक्षा महाराष्ट्रातील त्या काळात विविध क्षेत्रांतील नामवंतांनी पठ्ठे बापूरावांच्याविषयी गौरवाचे उद्‌गार काढले आहेत.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांनी म्हटले आहे,

'महाराष्ट्राला अभिमान वाटेल असे लावणी वाङ्मय ज्यांनी महाराष्ट्राच्या पदरात टाकले आणि सह्याद्रीच्या कानाकोपऱ्यातील मराठमोळ्या जीवास ऋणाईत केले, ते मन मानेल तसे प्रतिभेला नाचविणारे सर्वश्रेष्ठ शीघ्र कवी होते. श्री. पठ्ठे बापूरावांची व माझी अनेकदा भेट झाली होती...

समाजाशी निगडित असलेल्या सर्व अंगांच्या विषयांची आपल्या काव्यातून उत्कृष्ट रीतीने मादक, मोहक किंवा प्रसंगी कठोर शब्दांत गुंफण करून बहुजन समाजास शिकवण देण्याचे अतिथोर कार्य त्यांनी केले आणि स्वतः अंगिकारले.'

न्यायमूर्ती धुं. गो. विनोद यांना तर पठ्ठे बापूराव फारच भावले होते. ते म्हणतात,

'पठ्ठे बापूराव कुलकर्णी यांचे लावणी वाङ्मय हे साऱ्या महाराष्ट्रास एक भाग्यभूषण आहे, पेशवाईत झळकलेल्या प्रतिभेची परंपरा पठ्ठे बापूरावांनी पुनरावृत्त करून आजकालच्या महाराष्ट्राला ऋणाईत केले आहे..... पठ्ठे बापूराव यांच्या आंतरजीवनाला एक धार होती. ते नेहमीच पर्वताच्या कड्यावर झेप घेण्यासाठी उभे असलेले दिसत.'

या न्यायमूर्तींनी त्यांना 'गानगंधर्व' म्हटले आहे.

साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी तर पठ्ठे बापूरावांना 'शीघ्र कवी' अशी पदवी बहाल केली आणि त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये मोजक्या शब्दांत सांगितली आहेत,

'पठ्ठे बापूराव यांच्या लावण्यांत मुख्य व ठळक अशा गोष्टी किंवा लक्षणे कोणती दिसतात ती सांगतो. पंडितगिरीचा अभाव व तिजविषयी बेपर्वाई, काव्यविषयात वेदान्त व शृंगार यांची सरमिसळ, पण त्यातल्या त्यात शृंगारावर अधिक भर. श्लीलाश्लीलतेचा विवेक न करता प्रसंग असेल त्याप्रमाणे

ठसकेदार व समर्पक असे शब्द घालण्याची तयारी. शृंगार वर्णनातही कथित निषेधपूर्वक अनीतीची निंदा व विडंबन, सांगोपांग स्त्रीपुरुष वर्णन, थोडाबहुत उपहासकारक विनोद, मध्येच वेदान्तात चक्कर मारून येण्याची लहर, शास्त्रीपुराणिकांच्या तोंडी येणारे सिद्धान्त, न्याय, दाखले, दृष्टांत यांची पेरणी. पौराणिक किंवा काल्पनिक कथानकांचे चुटके, राजे-रजवाडे, सरदार-दरकदार यांच्या प्रतिष्ठेचा परामर्श, कृष्णलीलावर्णन, क्षेत्रयात्रावर्णन, काव्यारंभी गणपतीस्तवन, कलगी व तुरा यांचे झगडे, रूढी, म्हणींचा वापर इत्यादी.'

संगीततज्ज्ञ आबासाहेब मुजुमदार यांनी तर पठ्ठे बापूराव यांच्या पुस्तकांचे प्रकाशन केलेच; शिवाय यांच्याविषयी गौरवोद्‌गार काढले, 'पठ्ठे बापूराव कुलकर्णी सुप्रसिद्ध तमासगीर व स्वयंसिद्ध कवी आहेत. सुमारे दोन लाख लावणी त्यांनी रचलेली आहे असे ते म्हणतात. इतर लावण्यांमध्ये आणि त्यांच्या लावण्यांमध्ये फरक पाहिला असता त्यांच्या लावणीत शब्दरचना खेड्यापाड्यांतून वापरल्या जाणाऱ्या शुद्ध भाषेत आहे. संस्कृत शब्द कमी असतात. त्यामुळे ती सर्वांस प्रिय वाटते... त्यांची कविता व वग शृंगारपर असले तरी अखेर अत्यंत बोधपर आहेत... महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास नाटक किंवा ललिते ह्यांपेक्षाही मराठीतील लावण्यांनीच मराठी रंगभूमी शृंगारलेली होती.'

कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या दरबारचे व त्यांच्या मर्जीतील कवी आणि पठ्ठे बापूरावांचे स्नेही शीघ्र कवी लहरी हैदर यांनी उद्‌गार काढले आहेत,

'कै. पठ्ठे बापूराव यांच्या निवडक लावणीसंग्रहातील लिखाणास दुधारी पोलादी पट्ट्यासारखी धार्मिक, लवचिक, चरचरीत, चुरचुरीत, रसभरीत, सामाजिक, आध्यात्मिक, नवोदित, विनोदित या सर्व विषयांची गुंफण मादक आणि मोहक शब्दांत केलेली दिसून येते. कै. पठ्ठे बापूराव हे कट्टर सनातनी जातीयवाद्यांशी टक्कर देऊन पक्के सुधारकमतवादी झाले होते.' (१५ मार्च १९५८)

देशभक्त खासदार केशवराव जेधे यांचा पिंड तर कर्त्या समाजसुधारकाचा व सुसंस्कृत राजकारणाचा. त्यांनीही दि. ५-८-५८ रोजी पठ्ठे बापूरावांची प्रशंसा केली आहे. ते लिहितात,

'केवळ कलेकरिता कला म्हणून नव्हे तर, लोकरंजनातून लोकशिक्षण

देण्यासाठी उभ्या महाराष्ट्रात तत्कालीन परिस्थितीचे अवलोकन करून पठ्ठे बापूरावांनी लावणी हेच साधन हाती घेतले. लोकजागृतीची तळमळ नी जनताजनार्दनाची सेवा हेच ध्येय त्यांच्या काव्यातून प्रतिबिंबित झालेले दिसते. महाराष्ट्राला सुंदर आदर्श त्यांनी आपल्या काव्यांतून आणि आपल्या चारित्र्यातून निर्माण केला आहे.'

पठ्ठे बापूरावांचे चाहते मा. गोविंद डांगे, पुणे यांनी आपल्या लेखात म्हटले आहे.

'आपलं सारं जीवन 'तमाशा' या तीन शब्दात ज्यांनी साठवले ते लोकशाहीर आणि कविराज पठ्ठे बापूराव यांनी मराठी भाषेचे अत्यंत सोज्वळ, सुंदर आणि जिवंत रूप 'लावणी' या लोकप्रिय वाङ्मयाच्या द्वारे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतील बहुजन समाजापुढे उभे केले.'

पठ्ठे बापूरावांच्या वाङ्मयाचे अभ्यासक प्रा. द. दि. परचुरे पठ्ठे बापूरावांना चतुरस्त्र प्रतिभेचे लोकशाहीर असे संबोधून आपले विचार व्यक्त करतात, 'बापूरावाने मानवी स्वभावाचे सूक्ष्म अवलोकन व जगाचे उत्तम निरीक्षण केले होते. सामान्य व्यावहारिक नीतीची अनेक वचने त्याच्या कवनांत पदोपदी आढळून येतात. व त्याचमुळे बापूरावाचे कवन म्हणजे केवळ तमाशाचे साधन असे न वाटता ते श्रेष्ठ साहित्य वाटते.'

पठ्ठे बापूरावांच्या लावणी वाङ्मयावर प्रेम करणारे दादर (मुंबई) चे वि. कृ. जोशी यांनी पठ्ठे बापूरावांच्या लावणीतील वेगळेपण नेमकेपणाने सांगितले आहे. ते लिहितात,

'बापूरावांनी आपल्या तमाशासाठी अनेक गौळणीही रचल्या. परंतु इतर शाहिरांच्या गौळणी जशा ठराविक साच्याच्या वाटतात, तशा बापूरावांच्या वाटत नाहीत. याचे कारण असे की बापूरावाने या गौळणींच्या प्रसंगांकडे आधुनिक दृष्टीने पाहिले व जसा प्रसंग असेल त्याला अनुरूप अशी गौळणींची रचना केली. इतकेच नव्हे तर ज्या ऋतूत तमाशा चाललेला असेल त्या ऋतूतीलच एखादा प्रसंग गौळणींसाठी त्यांनी निवडला.'

असे चतुरस्त्र पठ्ठे बापूराव. अलौकिक कीर्ती लाभलेला. स्वत:च्या जीवनापेक्षाही लोकजीवनाची काळजी वाहण्यात हयात घालवलेल्या पठ्ठे बापूरावांना त्यांच्याच जन्मभूमीत बहिष्कृत केले होते. त्यावेळी गावाचा विरोध पत्करून ज्यांच्या घराण्याने आपल्या शेतमळ्यात धीराने आश्रय दिला, त्या

मोरे घराण्यातील शामराव मनोहर मोरे आपल्या लेखात या लोकशाहिराची गौरवपूर्ण नोंद करतात, 'ज्याने दोन लाख चाळीस हजार लावण्यांची झुंबरे मराठी शारदा मंदिरात लावली आणि तमाशासारख्या मराठमोळ्या सांस्कृतिक कलेच्या उद्धाराकरिता स्वत:चे कूल व संसारावर तुळशीपत्र ठेवले तो कलाकार एक सामान्य धंदेवाईक तमासगीर कसा असू शकेल? हे मुळीच शक्य नाही... ...एकीकडे बालगंधर्व रंगभूमी गाजवीत होते तर दुसरीकडे पठ्ठे बापूराव तमाशाचे फड जिंकीत होते.'

पठ्ठे बापूराव यांच्या लावण्या अनमोल आणि विपुल आहेत. आजची लावणी उद्या म्हणायची नाही अशी त्यांची प्रतिज्ञा होती. अशा निर्मितीच्या सर्जनक्षम क्षणांविषयी पठ्ठे बापूरावांना

*'तुम्ही शीघ्रकवी । जडण करता नवी । मला तुमची ववी ।*
*पसंत पडल्या चवी । तुम्ही अनुभवी । आत्मज्ञान लाघवी*
*सांगा तुमच्या देहामध्ये कोण शब्द बोलवी?'*

असे विचारले तर ते उत्तर देतात,

*'सहज समाधी साक्षात्काराची । मग साहित्य नको आणि ।*
*देह असूनी मग विदेही तो नर । नसे नाश मग तया जनी ॥*
*पठ्ठे बापूराव कवीची कहाणी । ऐक नवी जुनी नित सजणी ।'*

# संदर्भ ग्रंथ


१) पठ्ठे बापूराव कुलकर्णीकृत 'गण, गौळण, लावण्या पोवाडेसह भाग १ला. संपादक : बापूसाहेब महादेव जिंतीकर (आवृती ३री, १९७७)

२) पठ्ठे बापूराव कुलकर्णीकृत 'रंगबाजी लावण्या.' संपादक : बापूराव महादेव जिंतीकर (दिनांक ०३-०८-१९५४)

३) पठ्ठे बापूराव यांच्या 'ढोलकीवरील लावण्या' (१९५८) संपादक : बापूराव महादेव जिंतीकर

४) पठ्ठे बापूराव कुलकर्णीकृत 'रंग-बाजी' लावण्या (१९६९) संपादक : बापूसाहेब महादेव जिंतीकर

५) मिठाराणीचा वग, संपादक : बा. म. जिंतीकर (मार्च १९७७)

६) वगनाट्य : बा. म. जिंतीकर (१९७५)

७) मराठीचे लोकनाट्य तमाशा : कला आणि साहित्य : नामदेव व्हटकर

८) मराठी शाहिरी वाङ्मय : म. ना. सहस्रबुद्धे

९) मराठी गौळण : डॉ. वसंत जोशी

१०) पठ्ठे बापूराव व पवळा हिवरगावकर : आबासाहेब आचरेकर

११) लावणी पठ्ठे बापूरावांची : डॉ. रामचंद्र देखणे (दैनिक केसरी, २०-०८-१९८७)

१२) मुंबैतला तमाशा कुठे हरवला? : शिल्पा शिवलकर (साप्ताहिक सकाळ १३ मे १९९५)

१३) तमाशा : कालचा आणि आजचा : उत्तम कांबळे (रविवार सकाळ १४ मे १९८९)

१४) तमाशा-सौदामिनी पवळाबाई अशी होती : नामचंद पवळाबाई : बी. एम्. घोलप (लोकसत्ता, ०७-१२-१९७५)

१५) अशी होती 'पवळा' : प्रा. भिमाजी दहातोंडे (केसरी, दिवाळी अंक ९९)

१६) रंगतदार, ढंगदार 'मिठ्ठाराणी' : कमलाकर नाडकर्णी (महाराष्ट्र टाइम्स (२७-४-९५)

१७) शृंगाररस हा जीवन आणि संसारामधील मधू : आचार्य अत्रे

१८) रंगभूमी आणि लोककलाविष्कार : प्रकाश खांडगे (सकाळ, २६-१२-८६)

१९) तमाशा अंतर्बाह्य बदलतोय : प्रा. माणिक माने (केसरी)

२०) पठ्ठे बापूरावांची पवळा : मुलाखत राम कदम यांची (केसरी, २९-१०-८७) : शब्दांकन : डॉ. रामचंद्र ढेकणे

२१) अस्ताला निघालेली अस्सल लोककला तमाशा. (पुढारी, १५ जुलै ८४)

२२) तमाशा : शंकर खंडू पाटील (पुढारी)

२३) लावणीवर जीव टाकणंच संपलं : उत्तम कांबळे (सकाळ)

२४) खंदा लावणीकार : बा. म. जिंतीकर. (लेख)

२५) पठ्ठे बापूराव : नारायण गणेश साठे

२६) पठ्ठे बापूरावांच्या शोधात : चंद्रकुमार नलगे.

२७) कोल्हापूरदर्शन ग्रंथ.

## मुलाखती

१) विठा भाऊ नारायणगावकर, नारायणगाव.

२) जिंतीकर बंधू, पुणे

३) ना. वा. उत्पात. पंढरपूर

४) पठ्ठे बापूराव यांचे दत्तकपुत्र गोविंद श्रीधर कुलकर्णी, कराड

५) शामराव मनोहर मोरे, रेठरे हरणाक्ष

६) वासुदेव दत्तात्रय कुलकर्णी, पठ्ठे बापूराव यांचे चुलतबंधू, रेठरे हरणाक्ष

७) सदानंद वासुदेव कुलकर्णी, रेठरे हरणाक्ष

८) चंद्रभागा बापूराव घोलप, वाघापूर, जिल्हा नगर

९) नाथा गोविंद जाधव, मुंबई

१०) पवळाच्या भावांच्या सुना : हिवरगाव.

११) प्रा. शिवाजीराव चव्हाण : वाई.

१२) परींचे या गावचे गावकरी.

१३) लालासाहेब पाटील (मारुती पाटील-कवठेकर यांचे पणतू) मसूर कवठे.

१४) आर्यभूषण थिएटरमधील कलावंत (तमाशा)

१५) डॉ. आनंद घाटुगडे, पुणे.

१६) विठ्ठल पाटील, कराड.

१७) ग्रामस्थ, संगरनेर, भंडारदरा, जिल्हा नगर.

१८) विशेष साहाय्य : माननीय खासदार श्रीनिवास पाटील, कराड

# पठ्ठे बापूराव यांचे कवन प्रकार

: १ :

## पद : नांदी

*आम्ही इंद्राघरच्या वारांगना ॥ नाचुनिया खुश करू सकल जना ।*
*तक थै तक थै तक थै वाजे पैजणाची घाई नुपुरे आवाज देई ॥*
*छुंम चक छूंम चक छनानाना ॥ १ ॥ धृ० ॥ आम्ही इन्द्राच्या ॥*

*देव जमले तेहतीस कोटी ॥ मधी बैसले श्रीजगजेठी ॥*
*परमेष्टीला दिपविले चतुरानना ॥ २ ॥ इन्द्रा घरच्या ॥*

*झुमचक झुमचक झुमचक झुमचक छनानाना ॥*
*ताल मृदंगाचा वाजे खणखण खणाखणा ॥ ३ ॥ आम्ही इन्द्राच्या ।*

*मेघ मल्हाराचा मारा पर्जन्याच्या उसळती धारा ॥*
*पठ्ठे बापूराव कवींचा कोरा छंद जुना ॥ ४ ॥ आम्ही इन्द्राच्या ।*

: २ :

## गण

आज आम्ही नमीला पुत्र गौरीचा ॥ मान मिळविळा छत्र चौरीचा ॥
मंडप दिधला नवरानवरीचा ॥ दिवा लाविला चंद्र-सूर्याचा ॥
नवलाख तारा करीती फेरा ॥ मेरू भोवती दोन रात्रीचा ॥ १ ॥

शुक्ल पक्ष आणि कृष्ण पक्ष ॥ झाले तिथवार नक्षत्रांचा ॥
ऋतुमास । आणि वर्षे झाली मग आरंभ केला सृष्टी सूत्राचा ॥ २ ॥

पठ्ठे बापूराव कवीचे कवन ॥ कडाका जणू सर्प सत्राचा ॥
पुष्प पत्राने गौरविला हारी ॥ घट बसविला नवरात्री ॥ ३ ॥

## गण

लवकर यावे सिद्धगणेशा ॥ आतमधी कीर्तन वरून तमाशा ॥ धृ० ॥
माझा भरवसा तुम्हावर सारा ॥ विघ्न पिटविशी दाही दिशा ॥
झेंडा मिरविशी आकाश पाताळी ॥ वैरी करीतीं खाली मिशा ॥ १ ॥

विद्या चतुर दक्ष उदार भरण्या ताठी ॥
परी ब्रह्मविद्येची वेगळी निशा ॥
महाकाळालाही मारील दंडा ॥
भीती नाही तया दाही दिशा ॥ २ ॥

पठ्ठे बापूराव कवीच्या कवनी ॥ सरस खडीचा खरा नकाशा ।
सुंदर खाशा जडणी जडल्या ॥ बाजारबुणग्यांचा झाला हशा ॥ ३ ॥

## गण

जय जय जय जय गरुडध्वजा। आमची राखावी तू लज्या ॥ धृ ॥
(चढा सूर) अनंत नामे अनंत रूपे। अनंत अवतार आहे तुझा।
अनंत कामे अनंत धर्मे। सज्जन दुर्जन करी पूजा ॥ १ ॥

मधु मेरू मारुती भूमी अंतरली। अस्ती त्याची मजवर विखुरली।
मांस शोणिताची। नदी पूर भरली। चिखल मासाचा हा समजा ॥ २ ॥ धृ ॥

पठ्ठे बापूराव कवी कुलकर्णी। झाली केल्याची अनुकूल करणी।
नवरस गायन वतीले करणी। चक्रधारी नक्रधारी चतुरभुजा ॥ ३ ॥ धृ ॥
असंख्य कविच्या कथन सज्जावरी। जणु चमकल्या सहस्त्र वीजा।
त्यांत माझी लेखणी नाचता। कविचा हंकार होतो वजा ॥ ४ ॥ धृ ॥

: ३ :

## गणपतीस्तवन

आधि गणाला रणी आणला
नाही तर रंग पुन्हा सुना सुना
ध्यन्य शारदा ब्रह्मकन्यका घेऊन येईल रुद्रविणा
साहिशास्त्राचा मंत्र अस्त्राचा दाविल यंत्र खुणा खुणा
सद्‌गुरू माझा स्वामी जगत्‌गुरू
मेरूवरचा गुरू आणा आणा
ब्रह्मांडा भवता। तो एक सवता
दिवाच लाविल म्हणा म्हणा.
माझ्या मनाचा। मी-तू पणचा
वाळुनि केला चुना चुना.
पठ्ठे बापूराव कवीच्या कवनाचा हा एक तुकडा जुना जुना।

:४:

## गौळण

तुझ्यावरती हुकूम आहे माझा ग। मी गोकुळाचा या राजा ॥ १ ॥ धृ ॥
प्रथम मच्छ अवतारी शंकासुर मारला। दुसऱ्या कूर्म अवतारी पृथ्वीचा भार पाठीवर तारला। तिसऱ्या वराह अवतारी हिरण्यकश्यपूला ताणून मारला। चौथ्या नरसिंह अवतारी हिरण्यकश्यपूला मांडीवर घेवून चरचर चिरला। पाचव्या वामन अवतारी बळीराजा पाताळांत घालून उद्धार। (चाल) बळी घालूनिया पाताळी। त्याची पाहून भक्ती भोळी। उभा राहिलो दरवाज्याजवळी। (चाल १ली) पापाचा भार जेंव्हा होतो ग पृथ्वीवरूनी। तेंव्हा कांपू लागली ही धरणी। मग तिथे मी अवतार धरूनी। दैत्यांचा शिरच्छेद करूनी। (चाल) हा दानधर्म आहे जुना-करतो तसा पुन्हा। आणखी नवा ताजा गे ॥ २ ॥ धृ ॥
मी सहाव्या परशुराम अवतारी। एकवीस वेळां पृथ्वीतील क्षत्रियांचा गर्व हरला। आणि चौदा ताळ समुद्र मार्गे सारला। नवा कोकण प्रांत उभारला। सातव्या रामअवतारी रावण राजा दशकंठ लंकेमध्ये मारला। आणि आतां हा गोकुळामध्ये कृष्ण आठवा अवतार धरला। (चाल १ली) आलो कौंसा ठार माराया। काळयवनाची रक्षा कराया जरासंघ उभा चिराया। (चाल) त्या दुर्योधनाची मांडी मी फोडून टाकीन। त्या शंभर कौरवांची मुंडकी मी कापून टाकीन। त्या भीमा-अर्जुनाचे घोडे रणांमध्ये हाकीन। म्हणे पठ्ठे बापूराव कवी। करीन यादवी। जिंकीन पैंजा ॥ ३ ॥ धृ ॥

:५:

## तात्या बापूचा फार्स

तात्या बापूचा जमाव फाकडा। मराठी शाही कोल्हापुरी आकडा ग।
मुंडाशाला उरफाटा तिडा। पेच वाकडा ग आग नारी जी॥ १॥
एकाचा पंचकल्याणी घोडा। दुसऱ्याचा सारंग फाकडा ग।
भरजरी जीन रिकाम्या जोडा। पायामधी तोडा ग आग नारी जी॥ २॥
मुंडास्यात खवला केवडा। कानी भिकबाळीचा चौकडा ग।
पाटीलकीचा हक्क दिवाणीचा।
बेडी आणि खोडा ग आग नारी जी॥ ३॥
तात्या बापूची मैत्री ठिकडा। जसा का नामी बर्फीचा तुकडा ग।
दोघांच्या नावाचा शाहणा वेडा। गातोय पोवाडा आग नारी जी॥ ४॥
दोघांचा शेजाशेजारी वाडा। दोघांचा एक मोटाचा नाडा ग।
दोघांचा एकसुबा। गावावर पगडा ग आग नारी
दोघे उचलती पैजेचा विडा। पाहुणे वैरी घालीती मुडा ग।
दोघांच्यामध्ये शब्द वाकडा। न तेडा वाकडा ग अग नारी जी॥ ६॥
दोघांचा बाणा अगदी करडा। कंबरेला बंदुक तलवार फरडा ग।
दोघांनी मारला कोरडा। उडविला घोडा आग नारी॥ ७॥
तात्या बापूचा जोडा ठिकवा। जसा काय आंगठीवरला खडा ग।
पठ्ठे बापूराव कवी चडाला चढवी गाडा ग आग नारी जी॥ ८॥

:६:

## तुरेवाल्याच्या चला पोरांनो

पठ्ठे बापूराव कवीचा घोडा शामकर्ण आज सुटला खरा
तुरेवाल्यांच्या चला पोरांनो, कुणी तरी येऊन बघू धरा.

तीन ताळी आणि सप्त पाताळी घोडा उधळे चौखुरा
एकवीस स्वर्ग उडून गेला कुठेंच उभा राहिना जरा.

माझ्या घोड्याचा साज घडला सोनार मूळचा चतुर खरा
तेहतीस कोटी देव गुंफिले गेंद जोडिला एक सरा.

ब्रह्मदेवाचा केला तोबरा शंकराचा खरारा
तुरेवाल्याच्या चला पोरांनो, कुणी तरी येऊन बघू धरा.

महाविष्णूचा तंग घोड्याला पार्वतीचा कोरडा बरा
चंद्रसूर्याचा केला बिजौरा शिवशक्तीचा माथिं तुरा.

घोडा उधळला सात समुद्र चौदा भुवनांचा केला चुरा
इंद्रदेवाचा जीन बनविला बृहस्पतीचा नीट दोरा.

शेष तक्षकाचा वाळा बजाविला दोनी पायामंधी
घोडा फरिला गगनमंडळी सूर्य चंद्राचा दरारा.

कुठे तरी बांधुन घाला तयाला वला हरभरा द्या चारा.
सैरावैरा पळू लागला चार युगे गेली भराभरा

तरी अजुनि नाही हाति सापडला कैक जणांनी दिल्या टकरा
धरी गुरूचा पुत्र आसल तो नाही तर वरकड वाराहुरा.

घोड्याच्या पायामधे तोडा नारदाचा न बळी दुसरा
जेरबंद केला वासुकीचा नवलुखा ताऱ्याचा पिसारा.

काटेरी लगाम कुणी तरी घाला धरून आणा माघारा.
ठाणावरती बांधुन घालिल तोच गुरूचा शिष्य खरा.

पठ्ठेबापुराव म्हणे नको वटवट एका सवालात करू कचरा
तुरेवाल्याच्या चला पोरांनो, कुणी तरी येऊन बघू धरा.

:७:

## 'आत्म्याशी गुज' (भेदीक लावणी)

कुडी आत्म्याला अंतरीचे सांगती गूज ॥
सोडून जातानाही कशी तुम्हाला लाज ॥ धृ. ॥
तुला चारिली मी नित्य पाची पक्वान्नं ।
ऊन सूर्याचे नाही दिले मुळीच लागून ॥
तू करसी चोरी मला नेऊनी बांधिती जन ।
कष्ट सोशिले मी तुझ्यासाठी दारुण ॥
कामधंद्याला नाही लागत माझे मन ।
चिंता करून मी गेले कष्टी होऊन ॥
भेसूर दिसते जग सारे मजला आज ॥ १ ॥
तुमच्यावरती प्रीती जडली माझी भारी ।
दोघेजण आलो संगतीने मायाबाजारी ॥
का हो निघाला मला सोडून वनांतरी ।
कुठे मी जाऊ काळजी माझ्या अंतरी ॥
आजवर नाही दिलें दुःख तुम्हा तिळभरी ।
दुष्मना तू कसा बेईमान झालास तरी ॥
कळवळून बोले मग कुडीस आत्मराज ॥२॥
सुंदरी ऐक मी खरे सांगतो तुजला ।
यमरायाचे मूळ आले न्यावया मजला ॥
तांतडी जाणे आता आहे ग उशीर झाला ।
तुझ्या आमच्या संगतीत बसला घाला ॥
दोघेजण रडती लावूनी गळा गळ्याला ।
तिळभर माया येईना कशी काळाला ॥
तुटल्या गाठी झाली ताटातूट आज सहज ॥ ३ ॥
ऐक तू नारी जा निघून आपल्या माहेरी ।
माहेर तुझ आहे जवळ गावाबाहेरी ॥
तुझ्या जाण्याची केली आहे सारी तयारी ।

भालदार चोपदार येतील तुझ्या बरोबरी ॥
पालखीमधून तुला नेतील ते तिथवरी ।
खुशाल रहा जा तुझ्या मायबापाच्या घरी ॥
पठ्ठे बापूराव म्हणे कथिले तुज ॥ ४ ॥

: ८ :

## 'नऊ आकड्याची' भेदीक लावणी

नऊ अंकींचा पाढा सांगतो तुजला कविराया।
स्वस्थ करूनिया चित्ती ऐकावा शास्त्राचा पर्या ॥ धृ. ॥
नऊ एके नऊ रस; रस हे असती गायनाचे।
चतुर पंडिता शोधून पहा मत छंद शास्त्राचे॥
नऊ दुणें अठरा हाव भाव हे असती स्त्रियांचे।
प्रताप रुद्र ग्रंथ शोधिता कळेल नेमाचें॥
नऊ त्रिक सत्तावीस पिढ्या त्या सांबाच्या पहा या ॥ १ ॥
नऊ चौक छत्तिस, छत्तिस राण्या होत्या कश्यपासी।
असत्य वाटें तरी पहावें भूगोल पुराणांतरी॥
नवा पंचे पंचेचाळीस सरिता कलिंग देशासी।
भागवतामधीं पाहातां कळेल कविश्रेष्ठा तुजसी॥
विवेकविरहित ज्ञान फुकट ते जायाचे वाया ॥ २ ॥
नऊ सक चोपन्न कोटी साठ लक्षावर।
नामदेवकृत अभंग असती एक साचार॥
नऊ सत्ते त्रेसष्ट, त्रेसष्ट योजनेपर्यंत अति दूर।
तक्षक मुखीची विष ज्वाळा ती जात असे-पार॥
नऊ अठ्ठे बहात्तर खोडी असती त्या अश्वाच्या ठाया ॥ ३ ॥
नवे नवे एक्याऐंशी लक्ष बळ त्या हत्तीचें।
शंखासुर दैत्याशी होते जाण नेमाचे॥
नऊ दाही नव्वद हजार ग्रहणे चहु युगे साचे।
चंद्र सूर्याला लागतात मन आगळकांडाचें॥ ४ ॥

:९:

## बोधपर लावणी

## 'जाऊ नका गर्वाने फुगूनी फसाल आपले मन आवरा'

अति भयंकर आहे प्राण्यांनो मायेचा भवरा।
जावू नका गर्वाने फुगूनी फसाल आपले मन आवरा॥ धृ.॥
नम्र होऊनी वाग बेतानें प्रसंग पाहून।
गर्व सोडुनी साखर खावी मुंगी होऊन॥
हत्तीप्रमाणें काष्टे मोडू नकोस जावून।
महापुरामध्ये मोठी झाडे जाती वाहून॥
लहान लव्हाळे त्यांत वाचती वाकूनी चराचर॥ १॥
ऐरावती हे रत्न थोर त्या मार दारुण।
क्षणोक्षणी बहु दुःखची देती अंकुश मारून॥
थोरपण आहे ज्यांचे अंगी त्यासी जाच कठीण।
लहानपण हे उत्तम दिसते व्हावे सदा लहान॥
अंहकाराचा लागू नये रे मना कधी वारा॥ २॥
महापराक्रमी रावण त्यासी गर्व फार झाला।
बंदी घातलें देव सर्व मग कुळक्षय झाला॥
अति बलाढ्य कीचक त्याचा प्राण कसा गेला।
दुर्योधनाची दशा होऊन दीनवाणे मेला।
झाली कैकांची दशा मानवा काय तुझा थारा॥ ३॥
धनसंपत्ती आली जरी तरी भोग तिला भजून।
दांभिकपण व पोकळी डौलची दे सर्व त्यजून॥
क्षणं चितं क्षणं वित्तं मग जाईल विझून।
पठ्ठे बापूराव म्हणे कळेना का तुजला अजून॥
सद्गुरुचरणी रत होता तुज समजेल हा होरा॥ ४॥

## :१०:
## तीर्थाची लावणी

पुत्र नाही पोटी माझ्या वंशाला।
म्हणून मी करते हजारो नवसाला ॥ धृ ॥
केली तीनशेसाठ तीर्थे मी बारा मासाला।
भ्रताराला घेऊन हिंडले चोहू देशाला ॥ १ ॥ धृ ॥
प्रथम गेले करवीर कोल्हापूरी। लक्ष्मी पुजली रंकाळ्यावरी ॥
पंचगंगा प्रयाग क्षेत्री म्या वंसा पूजला।
गुलाल खोबरे उधळीले मी जोतीबाला ॥ २ ॥ धृ ॥
नरसोबाची वाडी औदुंबरी। दत्तात्रयदेव कृष्णातीरी ॥
गेले तसेच गाणगापुरी दूर प्रवासाला।
कान्होबाचे मढीला जाऊन भंडारा केला ॥ ३ ॥ धृ ॥
पुढें मग पाहिली पैठणपुरी। एकनाथस्वामीची नगरी ॥
ज्याच्या घरी कावडीने पाणी वाहतो हरीदेव पूजेला।
चंदन नित्य रोजी घासून पाहिला ॥ ४ ॥ धृ ॥
पंचवटी नाशिक गोदावरी। गंगास्नान करूनी त्रिंबकेश्वरी ॥
ब्रह्मगिरीवर नाथ निवृत्तीदेव बसला।
कुशावर्ताची आंघोळ करता थंड जीव झाला ॥ ५ ॥ धृ ॥
पुढे गेलें चित्रकुटपर्वती। पाहिली श्रीरामचंद्राची मूर्ती ॥
मग गेले प्रयागावरती आलाहाबादेला।
वेणीमाधव त्रिवेणीवरती पिंड अर्पिला ॥ ६ ॥
पुढे गेले काशी वाराणशींत। पाहिला शंकर विश्वनाथ ॥
स्नान करता भागिरथींत पुनीत जीव झाला।
पाच हजार रुपयाने देवाचा पाऊल भरीला ॥ ७ ॥ धृ ॥
मग आले अयोध्या कांचनपुरी। मथुरा माया यमुना तिरी ॥
खेळ खेळला गोकुळात हरीदेव अवतरला।
धलवगिरी अवंतीचा म्हंकाळेश्वर पूजिला ॥ ८ ॥ धृ ॥

श्रीकृष्णाची द्वारकापुरी। समुद्रात एका खांबावरी॥
हरीद्वाराची यात्रा करूनी बद्रीकेदारला।
पाणी गंगोत्रीचे आणुनी अभिषेक केला॥ ९॥
पाहिले धाम ओढ्या जगन्नाथ। दुनिया भाताला पसरीती हात॥
महाकाली कलकत्त्यात बलिदान तिला।
मग पूजले कमरू कामाक्षीला॥ १०॥
सोरटी सोमनाथाची करूनी पूजा। चढविला वेल गरुडध्वजा॥
नर्मदा तापीचे स्नान करूनी गिरनारला।
जुनागडावर गेले साधूच्या दर्शनाला।
व्यंकोबाची पाण्यात रत्नागिरी। गेले गोकर्ण महाबळेश्वरी॥
आले चिपळूण बंदरावरी दर्याकिनारीला।
देव परशुराम तीत नांदे महाशूर अवघ्याला॥ १२॥ धृ॥
आले जेजुरी गडावरी। म्हाळसा खंडोबाच्या दरबारी॥
घातली जागरण मुरळीवाघ्या बोलाविला।
भंडार खोबरें उधळून देव भुलविला॥ १३॥ धृ॥
नागनाथदेव मल्लिकाअर्जुन। किष्कांदा बाली सुनवाचे॥
केले पंपासरोवरी स्नान तुंगभद्रेला।
पंपावती महादेव पूजिला उल्हास जीव झाला॥ १४॥ धृ॥
भवानी तुळजापूरची पूजली। औंधच्या यमाईला भोगी केली॥
चंद्रभागेची आंघोळ झाली त्या पंढरपूरला।
श्रीपांडुरंग रुक्मिणीचा जोडा पाहिला॥ १५॥ धृ॥
झाले पुंडलीकाचे दर्शन। गोपाळपुरात कथाकीर्तन॥
मग द्वादशी सोडून आधी नैवैद्य केला।
ब्राह्मणाला दक्षणा देया जीव माझा झाला॥ १६॥ धृ॥
तीनशेंसाठ तीर्थांकोट लिंगाला। प्रदक्षणा कृष्णा गोदावरीला।
सरतेशेवटी मुंबईचा भुलेश्वर पावला।
माझिया वंशी मुलगा एक दिला दिवा लावायला॥ १७॥ धृ॥
बारा दिवसांनी बारशे केले। मुलाचे नाव फंची ठेवले॥
कागवडच्या सटवाईला नवस फेडीयला॥
कवी पठ्ठे बापुराव बोले कलगीवाला॥ १८॥ धृ॥

:११:

## धान्याची लावणी

पुण्यापासुनी कोल्हापुरी कृष्णा थडीवरी
आहे महशूर चहू मुलखांत काळ्या जमिनीत पीक येते भारी ॥ १ ॥

गहू हरभरे तांदूळ मूग ज्वारी आणि तुरी।
हिरवीगार बाजरी करडी तीळ हावरी मटकी पांढरी ॥ २ ॥ धृ ॥

काळा हुलगा उडीद आंबाडा उसाला पीक दुहेरी ॥
तंबाखू, हळद, गूळ, मिरची अगदी हुकमाची फायदा देणारी ॥ ३ ॥

भूईमूग, चवळी, वाटाणा, ग तांबडी मसुरी।
मका, पावटा, वरी आणि राळा साळीचा भात निराळा चवदारी ॥ ४ ॥

याशिवाय सातू आणि जवस खपली ग कोरी।
राजगिरे आणिक नाचणे कारळे ग धर्णेवरी आणि डुकरी ॥ ५ ॥ धृ ॥

लाखाची डाळ झुणक्याला घालून मोहरी।
हिंगजिरे खोबरे किसून फोडणीला लसूण फणक्या मारी ॥ ६ ॥ धृ ॥

या सगळ्यांचा ग राजा शाळू त्याची चव न्यारी।
एरंडी आणखी ताग तुमच्याकडे महाग कापूस भारी ॥ ७ ॥ धृ ॥

करवंदे, रताळे, जांभळे, बकुळी आणि बोरी।
शाळूचा ग हुरडा कोवळा लोंब्या आणि हावळा जिन्नववारी ॥ ८ ॥

हे सगळे पिकते एक मेघराजाच्या आधारी।
मेघाशिवाय पिकायला मोठा अगदी नाही तोटा न निवडूंग भारी ॥ ९ ॥

म्हणे पठ्ठे बापूराव कवी अशीच कर दुसरी।
रेठरें कृष्णाथडी गांव तिकडे तरी जावं शिकवतील अज्ञान पोरी ॥ १० ॥

: १२ :

## शेवटची प्रार्थना

प्रार्थना संतसज्जना। दुष्टदुर्जना आबालवृद्धांना ॥
नमस्कार माझा। नित्य नवा ताजा ॥ धृ. ॥

रणखांब रोवला खडा। बांधिला घोडा टाकुनि तिडा ॥
जिंकिल्या पैजा। आम्ही सैजा सैजा ॥ २ ॥

(चाल) नऊ खंडावर नगारा पिटला। नरनारीचा जीव लंपटला ॥
शामकर्ण मग आमचा सुटला। पळविल्या पळविल्या।
लाखो आम्ही फौजा। नित्य नवा ताजा ॥ ३ ॥

नौबत वाजूनी चौघडा झडला ॥ चौदा दर्यापुढे घोडा भिडला ॥
वैरी आडल्यावर मचाळा उडाला। खणखणाट-खणखणाट ॥
वाजला रणबाजा। नित्य नवा ताजा ॥ ४ ॥

जरीपटक्याचा हत्ती मिरविला। शहाण्णव कुळीचा हट्ट पुरविला ॥
दुष्मनाचा काटा जिरविला। पठ्ठे बापूराव कवीच्या मौजा ॥
नित्य नवा ताजा ॥ ५ ॥

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्राचा इतिहास प्रागैतिहासिक महाराष्ट्र (खंड पहिला भाग-१) | शां. भा. देव | रु. १२७/- |
| २) | महाराष्ट्राचा इतिहास (मध्ययुगीन कालखंड भाग-१) | संपादक : गो. त्र्यं. कुलकर्णी | रु. १४५/- |
| ३) | मध्ययुगीन महाराष्ट्र (सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन). | प्रा. म. श्री. माटे | रु. ७५/- |
| ४) | समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह (भाग पहिला) | अनुवादक : हेमकांत बळकुंदी | रु. २९५/- |
| ५) | प्रासाद मंडन | डॉ. र. पु. कुलकर्णी | रु. ११४/- |
| ६) | शिल्पप्रकाश | डॉ. र. पु. कुलकर्णी | रु. १६७/- |
| ७) | एक होता गंधर्व | डॉ. राम म्हैसाळकर | रु. ९३/- |
| ८) | गजाआडच्या कविता | श्री. उत्तम कांबळे | रु. ३०/- |
| ९) | पं. जवाहरलाल नेहरू व्यक्ती आणि कार्य | संपादक : बा. ह. कल्याणकर | रु. १४०/- |
| १०) | भारताचा स्वातंत्र्यलढा | डॉ. वा. ना. कुबेर | रु. १०९/- |
| ११) | मराठी वाङ्मयकोश खंड-४ | समन्वय संपादक डॉ. विजया राजाध्यक्ष | रु. ३२०/- |
| १२) | दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तृत्व | संपादक मंडळ | रु. ६०/- |
| १३) | भारतातील आदिवासी वंश | प्रा. वि. श्री. कुलकर्णी | रु. १२५/- |
| १४) | खानदेशातील कृषक जीवन | डॉ. रमेश सूर्यवंशी | रु. ६०/- |
| १५) | चरियापिटक | डॉ. शेषराव मेश्राम | रु. ३३/- |
| १६) | चिरकालीन सिरॅमिक्स | डॉ. प्रकाश दळवी | रु. ४५/- |
| १७) | छत्रपती शिवाजी महाराज | श्री. प्र. न. देशपांडे | रु. ४८/- |
| १८) | सर्वज्ञ चक्रधर | प्रा. पुरुषोत्तम नागपुरे | रु. ३७/- |
| १९) | संत जनाबाई | डॉ. सुहासिनी इर्लेकर | रु. ५०/- |
| २०) | मराठ्यांची प्रशासन व्यवस्था | सौ. विजया कुलकर्णी | रु. १४५/- |
| २१) | लैंगिक नीती आणि समाज | श्रीमती शकुंतला क्षीरसागर | रु. १४५/- |
| २२) | मराठी वाङ्मयकोश खंड २, भाग १ | डॉ. गो. म. कुलकर्णी | रु. १३०/- |

***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे*** | ***अधिक माहिती/चौकशीसाठी***

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला,
दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेअंतर्गत चरित्रग्रंथ

### मलिकेतील चरित्रग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १) एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहांगीरदार | रु. ४५/- |
| १३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |

*मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे*

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

*अधिक माहिती/चौकशीसाठी*

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५



प्रा. चंद्रकुमार नलगे हे मराठीतले ख्यातकीर्त कथाकार आहेत. कथालेखनाचं त्यांचं दालन समृद्ध आहे. बदलत्या खेड्यांचं, तिथल्या नव्याजुन्या माणसांचं, प्रगतीतूनच प्रसवलेल्या समकालीन प्रश्नांचं चित्रण त्यांनी आपल्या सर्जनशील लेखनातून केलेलं आहे. आधुनिक मराठी ललितगद्यातही त्यांनी मोलाची भर टाकली आहे. ग्रामजीवन आणि ग्रामसंस्कृती यांची वीण त्यांच्या ललितगद्यातून अगदी अनोख्या अंगानं आविष्कार पावलेली आहे. महत्त्वाचे समकालीन लेखक म्हणून त्यांची मान्यता मोठी आहे. दक्षिण महाराष्ट्राचे 'साने गुरुजी' असा त्यांचा सार्थ उल्लेख होतो!

ग्रामीण आणि दलित साहित्याची निवडक संपादनं त्यांनी सिद्ध करून विद्यापीठीय अभ्यासक्रमाला उंची प्राप्त करून दिली. वाचकांतही ही संपादनं लोकप्रिय आहेत. मोजकंच परंतु मौलिक असं टीकालेखनही त्यांनी केलं. वाङ्मयातील नव्या प्रवाहांचे, नव्या जाणिवांचे आकलन त्यांच्या इतिहासलेखनातून फार नीटपणाने येतं.

लोकशाहीर पठ्ठे बापूराव यांची जीवनगाथा गाणारं हे पुस्तक म्हणजे चरित्रलेखनाची उत्तम पावती आहे. सुबोध आणि रसमय शैलीचा तो नमुना आहे. पठ्ठे बापूराव यांचं जगणं जितकं सर्जनाचं तितकं ते संघर्षाचंही आहे. बंडखोर मनाला बंधनं बांधून नाही ठेवू शकत. त्याच्यापोटीही मग खूप काही सोसणं येतं. जगण्यातले सगळे ताण या लेखनात अनुभवता येतात. अशा चरित्राला चतुःसीमा नसतात. पार क्षितिजापर्यंत जावं लागतं. प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी तसा वेध इथं घेतला आहे. लेखनातून मनात उतरणारी [illegible] म्हणूनच हृद्य झाली आहे!

शिंदे

४